साप्ताहिक २२ जून १९८५ / २ रुपये

# माणूस



## घोडदौड कुणीकडे ?

मानस प्रतिमांची छायाचित्रे

मानसशास्त्रीय लेख



## चार वर्षात १६५० वेळा लष्कर वेठीला.. पुढे ?

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : पंचविसावे
अंक : चौथा

¤

२२ जून १९८५

किंमत : दोन रुपये

¤

संपादक
श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ
सुरेश नावडकर

## सप्रेम नमस्कार, माणूस

¤ मी सा. माणूसचा अगदी सुरुवातीपासूनचा वाचक आहे. अनेक वेळा माणूसमधील लेखांबद्दल आपल्याला पत्रेही लिहिलेली आहेत. साधारणतः माणूसचे कौतुक किंवा अभिनंदन करणारीच पत्रे आपण प्रसिद्ध करता. दोष, त्रुटी दर्शविणारी किंवा टीका असलेली पत्रे (आपण) फारशी प्रसिद्ध करीत नाही, असे अनेकवेळा अनुभवास आलेले आहे. माझ्या याही पत्रात टीका–टिप्पणी आहेच. तेव्हा पूर्वीचाच अनुभव याही वेळेला येणार नाही ना? असो!

प्रथम साप्ताहिक माणूस आणि आपले प्रतिनिधी श्री. सुभाष काळे, यांचे दि. २० एप्रिलच्या अंकात 'बॉबेचे मुंबई' या प्रश्नाला चालना दिल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन. 'मुंबई'च्या नावाबद्दल वृत्तपत्रातून आज जी काही चर्चा चालू आहे किंवा मुंबईचे नवनिर्वाचित महापौर आ. छगन भुजबळ यांनी या संदर्भात जे काही निर्णय घेतले आहेत, त्याचे सर्व श्रेय आपले प्रतिनिधी श्री. सुभाष काळे यांच्याकडे जाते. वृत्तपत्रे पत्रकार एखाद्या सामाजिक प्रश्नाला कशा प्रकारे चालना देऊ शकतात याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. श्री. सुभाष काळे व शिवसेना प्रमुख श्री. ठाकरे यांच्या झालेल्या प्रश्नोत्तरात...

'आपण मुंबई केंद्रशासित होणार म्हणून एवढा गदारोळ करता. बॉम्बेचे मुंबई करायला केंद्राचा विरोध आहे. अशा वेळी शिवसेना गप्प का?' असा प्रश्न श्री. काळे यांनी ठाकरेंना विचारल्यावर–– 'गप्प नव्हे! बॉम्बेचे मुंबई करायचा निर्णय, महाराष्ट्राने केंद्राला विनंती करायची ही पद्धत चुकीची आहे. विनंती काय म्हणून करायची? अंतुल्यांनी जिल्ह्याची नावे 'रायगड' 'सिंधुदुर्ग' ठेवली ती काय केंद्राला विचारून? म्हैसूर स्टेटचे कर्नाटक झाले किंवा मद्रासचे तामिळनाडू झाले ते काय केंद्राच्या संमतीवरून? पण आपले नेते म्हणजे लोळागोळा झालेले. स्वाभिमान यांना ठाऊकच नाही. दिल्लीला ठणकावून सांगणारा, मनगटात नेट असलेला नेता आपल्याकडे कोणीच नाही. महाराष्ट्र सरकारने एका वटहुकुमाच्या फटकाऱ्यात 'बॉम्बेचे' 'मुंबई' केले तर बघू कोणाची हिंमत आहे ते बदलण्याची. अहो आपल्या पोराबाळांची नावे काय तुम्ही इतरांना विचारून ठेवणार? येत्या १ मे ला महाराष्ट्राच्या स्थापनेला पंचवीस वर्षे पूर्ण होतात. राज्यकारभार पूर्णपणे मराठी करण्याचा निर्णय शासनाने घेतलेलाच आहे. तेव्हा मुख्यमंत्री वसंतदादा पाटलांनी महाराष्ट्राच्या राजधानीचे नाव 'बॉम्बे' ऐवजी 'मुंबई' अस्तित्वात आल्याची जाहीर घोषणा करावी. बघू यात एकदा दिल्ली काय करते ते. आज ना उद्या कधी तरी हे आपल्याला करावेच लागेल' हे शिवसेनाप्रमुखांचे उत्तर. तेव्हा प्रश्न उपस्थित करून मूळ चालना दिली ती काळे यांनीच. त्याचे श्रेय त्यांना द्यायलाच हवे.

दुसरा भाग असा की, वृत्तपत्रातून या नावावर सध्या जोरदार चर्चा चालू असली तरी ती कालांतराने बंद पडणार यात शंका नाही; पण बॉम्बेचे मुंबई होत नाही तोपर्यंत त्याचा पाठपुरावा सा. माणूसने करायला हवा. आजपर्यंत 'माणूस' ने अनेक सामाजिक प्रश्नांना हात घातलेला आहे. नाही असे नाही. पण नेहमीचा अनुभव असा की, एखादा प्रश्न उपस्थित केल्यानंतर साप्ताहिक माणूसकडून त्याचा पाठपुरावा होत नाही. त्याला आपण जबाबदार आहात की आपले प्रतिनिधी हे समजणे कठीण आहे; पण प्रतिनिधींना सतत सूचना देऊन त्या प्रश्नांचा पाठपुरावा करणे, संपादक या नात्याने आपल्याला अवघड नाही असे वाटते. बॉम्ले-

सवाई रिहॅबिलिटेशन सेंटरचा प्रश्न, त्याच-प्रमाणे मिरजेतील अरबांचा विषय माणूसने कुठलाही आडपडदा न ठेवता सडेतोड व निर्भीडपणे हाताळला हे खरे; पण त्याचा पाठपुरावा न केला गेल्याने संबंधितावरील वचक कमी झाला. एखादा दुसरा लेख लिहिण्यापलिकडे पत्रकार आपले काहीही वाकडे करू शकत नाहीत, असा ठाम ग्रह या मंडळींचा झालेला आहे आणि त्यामुळेच 'खैरुन्निसा' सारखी गुन्हेगार बाई राजरोज-पणे कोर्टातून 'स्टे' आणून उजळ माथ्याने मिरजेत ठाण मांडून बसली आहे. नगरपरि-षदेत दोन वॉर्डातून एकाच वेळी निवडून येण्याची तिने किमया दाखवलेली आहे. थोड-क्यात चुकले, नसता ती आज नगराध्यक्षा म्हणून मिरवताना दिसली असती.

अरब प्रकरणाच्या बाबतीत जे घडले तोच प्रकार 'रिहॅबिलिटेशन' सेंटरच्या बाबतीतही घडला. माणूसच्या लेखानंतर वॉन्लेसवाडी ते इटलीतील व्हॅटिकन चर्चच्या पोपपर्यंत अनेक उलथा-पालथी घडल्या. मिरज मिशन हॉस्पिटल व वॉन्लेसवाडी या ठिकाणच्या व्यवस्थेत अनेक बदल घडून आले इतर वेळी ते अवघड होते. त्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागले असते. ते माणूसच्या एका लेखासरशी घडून आले. पण माणूसमध्ये परत त्यावर एक ओळदेखील आली नाही. माणूसने या प्रकर-णात थोडा फार पाठपुरावा केला असता तर कायमची कीड गेली असती.

वृत्तपत्रांनी आपल्या अंकाच्या खपासाठी नाविन्यपूर्ण विषय म्हणून किंवा सहज गंमत म्हणून नव्हे तर सामाजिक समस्यांची तड लावून घेण्यासाठी म्हणून विविध विषय हाताळावेत अशी आम्हा वाचकांची अपेक्षा असते. कारण नोकरशाही आणि सत्ताधारी यांच्यात जी एक भ्रष्टाचाराची साखळी आहे, तिला पार करून जाण्यासाठी सर्व-सामान्यांपुढे वृत्तपत्राखेरीज अन्य पर्याय नाही. सा. माणूसने या अपेक्षा पूर्ण का करू नयेत ?

माणूसमधून प्रसिद्ध झालेल्या अनेक लेख-माला नंतर ग्रंथरूपाने लाखो मराठी वाच-कांच्या हातात गेल्या आहेत. 'नाझी भस्मा-सुराचा उदयास्त'पासून अलीकडच्या 'नाट्य पंढरी'पर्यंतचे ग्रंथ ही त्याची उदाहरणे. अरब लेखमालाही ग्रंथरूपाने वाचकांपुढे येईल असे वाटले होते. त्यानंतरच्या 'आपली मुलं' 'कुंपण आणि आकाश' किंवा 'नाट्य पंढरी'सारख्या सर्वसाधारण लेखमाला ग्रंथ-रूपाने बाहेर पडल्या; पण अरब विषया-सारख्या देश आणि समाजहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विषय 'माणूस'ने टाळावा याचे आश्चर्य वाटते. ठिकठिकाणी सत्ता व पैसा यांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दडपणे पत्र-कारावर वाढत आहेत. अरबाचा प्रश्न तर आंतरराष्ट्रीय पातळीवरचा आहे. अनेक राजकारण्यांचे त्यात हात गुंतलेले आहेत. शिवाय ही मंडळी गडगंज पैसेवाली आहेत तेव्हा यांपैकी एखाद्या दडपणाला सा. माणूस बळी तर पडलेला नाही ?

## ग्रंथरूपाची घाई का ?

हजारो लोकांचे संसार उध्वस्त करणाऱ्या अरबांची कृष्णकृत्ये सा. माणूसने ग्रंथरूपाने वाचकांपुढे ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. अजून वेळ गेलेली नाही. त्याचा पुनर्विचार व्हावा. अरब लेखमालेसारखा महत्त्वाचा विषय ग्रंथ रूपाने प्रसिद्ध करण्याऐवजी 'वाट चुकलेली माणसं' सारखे ग्रंथ झटपट वेगाने पुढे यावेत याचे आश्चर्य वाटते. सर्वसाधारणपणे एखादे प्रकरण कोर्टातून पूर्णपणे निकालात निघते तेव्हाच त्यावर ग्रंथ लिहिले जातात. कारण एफ. आय. आर. सेशन कमिट, हायकोर्ट, सुप्रिम हायकोर्ट या स्टेप्सनी दोन्ही बाजू व त्या अनुषंगाने अनेक गोष्टी उजेडात आलेल्या असतात. हेरगिरी व इंदिरा गांधी हत्या प्रकरणासारखे अत्यंत महत्त्वाचे विषय सदर प्रकरण कोर्टात दाखल होण्यापूर्वी 'वाट चुकलेली माणसे' ग्रंथ रूपाने माणूसने प्रसिद्ध करावे याचे आश्चर्य वाटते. शिरीष सहस्रबुद्धे यांची ही लेखमाला ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्याची एवढी घाई माणूसने का केली ? माणूस सवंगतेकडे चालला आहे, असा तर त्याचा अर्थ नव्हे का ?

काट-छाट न करता माझ्या या पत्राला माणूसमध्ये प्रसिद्धी व उत्तर मिळेल अशी अपेक्षा आहे.

• द. स पवार
सांगली


['दोष, त्रुटी दर्शविणारी किंवा टीका असलेली पत्रे (माणूस) फारशी प्रसिद्ध करीत नाही.' असे आपण लिहिले आहे. पण 'काटछाट' न करता आपले वरील पत्र माणूसने जसेच्या तसे प्रसिद्ध केले आहे यावरून आपला आरोप किती चुकीचा आहे हे सहज लक्षात यावे.

वरील पत्र टंकलिखित आहे. याचा अर्थ आपण पाठवलेली मागील पत्रेही-ज्यात माणूसवर टीका-टिप्पणी आहे असे आपण म्हणता- टंकलिखित स्वरूपाची असतील. टंकलिखिताच्या प्रती आपल्याजवळ असणार. त्या पाठवून द्याव्यात. त्यातील टीका, दोष-दिग्दर्शन व इतर मजकूर शिळा झाला नसल्यास अजूनही माणूसमध्ये छापण्याची तयारी आहे

संपादक, वृत्तपत्राचे प्रतिनिधी यांच्याकडून सर्वसामान्य वाचकांच्या काय अपेक्षा आहेत हे आपण खूपच विस्ताराने कळविले. वाचकां-वरही काही जबाबदारी असते-असावी असे आपल्याला जरासुद्धा वाटत नाही का ? उदाहरणार्थ, मिरजेचा माणूसद्वारा पुढे मांडला गेलेला अरब प्रश्न. तो पुन्हा डोके वर काढतो असे दिसल्यावर एखादी सभा, वृत्तपत्रातून पत्रलेखन, अधिकाऱ्यांना जाग आणणे या गोष्टी स्थानिक पातळीवर का घडून येऊ नयेत ?

-संपादक ]


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा
मला निसटलंच पाहिजे !
अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०



# मुंबापुरी

### □ बरबादियोंके मशवरे

ऐन रौप्यमहोत्सवी वर्षात या महाराष्ट्राची काय हल्लख हालत झालीये पहा! नव्या मुख्यमंत्र्यांनी आल्या आल्या हॉस्पिटलाची वाट धरली. नंतर मंत्रालयात समजलं की दोन दिवसांचे सगळे कार्यक्रम मुख्यमंत्र्यांनी रद्द करून टाकले.

नव्या सरकारचं पॉलिसी स्टेटमेंट नुकतंच आलं. 'मेघदूत'ची दारं–खिडक्या जाम बंद करून शिवाजीराव टी. व्ही. कॅमेऱ्यासमोर कसं ( अन् काय काय ) बोलायचं त्याच्या तालमीत रगड दंग होते म्हणतात. तालीम नीट न झाल्यामुळे तेंडुलकरांच्या 'विठ्ठला'ला नाट लागला हे नव्या मुख्यमंत्र्यांना ठाऊक असणारच. थँक्स टू सुशिलकुमार शिंदे! तेव्हा मुख्यमंत्र्यांनी तालीम नीट केली हे बरेच झाले.. सरतेशेवटी काय, नाटक नीट वठल्याशी कारण!

विरोधी पक्षांचंही काही नीट जमून येईलसं दिसत नाही. पवार परदेशाहून परत आल्यानंतर त्यांनी जाहीर करून टाकलं की आपण कॉंग्रेस ( आय ) मध्ये जाणार नाही. तरीही जनता–भाजपवाले अजून चितातूर आहेत. शेवटी 'ही इज पवार, यू नो', असं एका जनतावाल्याने आम्हाला सांगितलं ते आम्हाला पटलं.

विधान परिषदेच्या आठ जागांच्या निवडणुका चार जुलैला आहेत. ह्यासाठी आपापसातला समझोता करण्यात पुलोदचे नेते सध्या गुंतलेत. 'पण सरतेशेवटी आमचे नेते पवार', असं प्रमोद महाजन म्हणाले. जनतावालेही पवारांना भरपूर शेंदूर फासण्यात लीन आहेत. यत्र, तत्र सर्वत्र पवारांच्या विरोधी–पक्ष–नेतृत्वाचे पडघम घुमतायेत, तो तो पवार अस्वस्थ होताहेत. 'पुलोदके नेता, शरद पवार', ही स्लोगन कुणीही देऊ नये अशी ताकीद पवारांनी आपल्या टिळक भवनातल्या कार्यकर्त्यांना देऊन ठेवली आहे म्हणतात.

म्हणून मघाशी म्हटलं की महाराष्ट्राची हालत बुरी झालीये. अंतुले तिकडे कोर्टाच्या तगाद्यात. वसंतदादांना तर राहायला घरच नाही. ताईंना कुठं थारा नाही. बाबासाहेब भोसल्यांनी विवाह–मंडळ काढलंय. गुरू ग्रंथ साहिबचं मराठी भाषांतरही करण्याचा भोसल्यांचा मानस आहे असं ऐकतोय. पाऊसपाणी ठीक नाही. धड वादळही नीट येत नाही. हुलकावण्या देऊन वेरावळला पळ काढतं. सगळा मामलाच बेहिशेबी, मुसीबतीचा. इकबालचा एक बढ़िया शेर आहे :

वतन का फिक्र कर नादाँ,
मुसीबत आनेवाली है
तेरी बरबादियोंके मशवरे हैं
आसमानोंमें.

हे नादान माणसा, तू आणि तुझं वतन हे सगळं बरबाद कसं करायचं याची मसलत करण्यासाठी सगळे देव आकाशात जमलेत. तेव्हा– वतनका फिक्र कर नादाँ!

### □ गृहप्रवेश लांबणीवर

शरद पवारांच्या कॉंग्रेस प्रवेशावर अखिल महाराष्ट्राचे भवितव्य अवलंबून आहे असे तुमच्याप्रमाणे आम्हालाही वाटते. महाराष्ट्र टाइम्सला खास मुलाखत देऊन पवारांनी आपण कॉंग्रेस आयमध्ये जाणार नसल्याचे स्पष्ट केले तेव्हा तर ते राष्ट्रीय प्रवाहात उडी ठोकणार याची आम्हाला खात्री पटली. लोकांचे सोडा, शरद पवारांसाठी म. टा. हे पत्र नव्हे मित्र आहे.

विधानसभेचे पावसाळी अधिवेशन तोंडावर आले आहे. पवारांच्या गृहप्रवेशाबद्दलच्या उलटसुलट बातम्या ऐकून विरोधी पक्ष फारच हताश झाले आहेत. परवा विधान भवनातील चौथ्या मजल्यावरील कार्यालयात खेदाने मान हलवीत राम नाईक आम्हाला म्हणाले, 'अरेरे ते जाणार वाटतं.' आम्ही काळजीने 'कोण?' म्हणून विचारले तर ते म्हणाले, 'मी शरद पवारांबद्दल बोलतो आहे.'

तसे गेली सहा वर्षे पवार प्रवाहापासून फारसे दूर नव्हते. गुढघाभर पाण्यातच उभे होते. आता राजीव गांधींनीच हा गंगेचा प्रवाह असल्याचे जाहीर केले असल्याने पवारांना आत्मशुद्धीचा मार्ग स्वीकारायचा असल्यास नवल नाही. दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर ३८ वर्षांतही आपल्याकडे लोकशाहीला पोषक अशी विरोधी पक्षांची वाढ झाली नाही. सत्तेवर असल्याखेरीज समाजकार्य करता येत नाही हाच समज वेळोवेळी दृढ होत गेला आहे. विरोधीपक्ष नेता म्हणून आपली न्यूसन्स व्हॅल्यू इतकी वाढवायची की शेवटी यांना पक्षात घेतलेले बरे असे हायकमांडला वाटले पाहिजे, अशी मूळ कॉंग्रेसमधून बाहेर पडलेल्या बहुसंख्य नेत्यांची भूमिका असते.

दादांनी अचानक राजिनामा देऊन शिवाजीरावांना मुख्यमंत्रीपदावर बसविले असल्याने, आता पवारांचा कॉंग्रेस प्रवेश लांबणार असे म्हटले जाते. असो. साखरपुडा तर झाला आहे, आता प्रत्यक्ष विवाहास ते किती अवधी लावतात ते पहावयाचे!

### □ सत्तांतर – काय हे!

व्यंकटेश माडगूळकरांच्या सत्तांतर ह्या ८२ पानांच्या कादंबरीवरून साराह ब्लॉफर होर्डी ह्या अमेरिकन लेखिकेने 'दि लंगूर्स ऑफ अबू' हा ३६१ पानांचा प्रबंध लिहिला आणि त्यात माडगूळकरांचा साधा उल्लेखही केला नाही यामुळे पुण्याच्या लेखक वर्तुळात सध्या वादळ उठले आहे असे आम्ही ऐकत आहोत आणि ते योग्यच आहे. लेखक जेव्हा मनापासून लिहितो त्यावेळी त्या अक्षरात तो आयुष्याचे सार ओतीत असतो. अशा लिखाणाचा वापर करताना भाषांतर वा रूपांतरकर्त्याने मूळ लेखकाला त्याचे श्रेय देणे हे त्याचे आद्य कर्तव्य आहे. माडगूळकरांच्या पुस्तकाला तर आता साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले आहे. तेव्हा अशा नावाजलेल्या पुस्तकातील माहिती बाईंनी वापरल्यावर मूळ लेखकाचा उल्लेख टाळावा हे केव्हाही निषेधार्हच! माडगूळकरांच्या पुस्तकातील माकडे माणदेशातली आणि साराहबाईंच्या प्रबंधातली माकडे अबू पर्वतावरील, असे असताना माकडे इथून तिथून सारखीच असे म्हणून गप्प कसे बसता येईल?

भाषांतर किंवा रूपांतर ही मूळ लेखनाइतकीच कठीण आणि अत्यावश्यक कला आहे. त्यामुळे एखाद्या पुस्तकाचे भाषांतर अथवा रूपांतर करणे ह्यात लेखकाला कमीपणा वाटण्याचे काहीच कारण नाही. आमची बाईंना नम्र विनंती आहे की, त्यांनी जाहीरपणे मराठी वाचकांना विश्वासात घ्यावे. केवळ हुप्प म्हणून गप्प बसले म्हणजे वाचकांचे चित्कार कसे थांबतील?

–विष्णू जयदेव

सांस्कृतिक डोंबिवली

# शाळा प्रवेश : दरवर्षीचे दिव्य

इ. स. १९४७ साली जेमतेम दहा–बारा हजार लोकवस्ती असणाऱ्या, टुमदार हवेशीर गावाचे, गिरगावापासून गुरगावपर्यंतच्या, कोकणापासून केरळपर्यंतच्या महाराष्ट्राच्या, भारताच्या विविध विभागातून, प्रांतातून आलेल्या माणसांच्या लाटानी ह्या गावाचे रंगरूप पार बदलून गेले आहे. मुंबई आणि दिल्लीला येणाऱ्या मानवी लोंढ्याबद्दल भलेभले चिंता करीत आहेत; पण डोंबिवली नावाच्या गल्लीतील बेसुमार वाढत्या लोकसंख्येने निर्माण केलेल्या असंख्य प्रश्नाची ना कोणाला खंत ना खेद ! ना घेत कोणी दाद ना ऐकत फिर्याद. आज जवळजवळ दीड लाखाहून अधिक लोकवस्ती असणाऱ्या; पण अनेक समस्यांनी ग्रासलेल्या ह्या शहराचे दुनियेभर 'साक्षरतेत महाराष्ट्रात अव्वल', 'सांस्कृतिक क्षेत्रात आघाडीवरचे' शहर म्हणून कौतुक होत आहे. ज्या वेगाने हॉटेल्सची संख्या वाढते आहे, त्या तुलनेने साऱ्या सुसंस्कृतपणाचे मूळपीठ शाळा, त्यांची संख्या मात्र त्या गतीने वाढत नाही. त्यामुळे अशा ह्या साक्षर, अग्रेसर शहरातील शाळा प्रवेशावर, त्यासाठी कराव्या लागणाऱ्या दिव्यावर, दिव्याखाली असणाऱ्या अंधारावर लिहिणे कालोचित ठरावे.

येथील शाळांच्या परीक्षांचे निकाल की ज्या पालकाची मुले चवथी पास झालेली असतात, त्यांचा आनंद निर्भेळ नसतो. त्याला पाचवीच्या प्रवेशाची काळी किनार लागलेली असते. विनोदाला कारुण्याची किनार असली की त्याचे मोल वाढते; पण हा यशाचा आनंद मात्र गढूळ बनतो. चवथीपर्यंतचा एक टप्पा यशस्वीरीत्या ओलांडला पण दुसऱ्या टप्प्याचे, पावलाचे काय ? ते पाऊल कोठे म्हणजे कोणत्या शाळेत पडणार ? हव्या त्या, म्हणजे शक्यतो घराजवळच्या की मिळेल त्या ? बळीराजाच्या कथेतील वामनालासुद्धा हा पेच पडला नव्हता. आता 'नेमेचि येतो मग पावसाळा' हे पालुपद जाऊन 'नेमेचि येतो मग शाळाप्रवेशाचा घोळ काळा' असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. चवथीतून पाचवीत, दहावीतून अकरावीत आणि बारावीतून तेरावीत (खरे म्हणजे बी. ए., बी. एस्. सी. पार्टवन असे आपल्या दुसऱ्या मातृभाषेत, इंग्रजीतून तोंडभरून बोलण्याऐवजी साऱ्यांनी ह्या तेरावी, चवदावीचा पाढा का लावला आहे ते कळत नाही ?) किंवा वैद्यकीसाठी, अभियांत्रिकीसाठी प्रवेश घेणे अशी ही पावले आजच्या विद्यार्थ्याला टाकावीच लागतात. तूर्त दहावीचा निकाल लागावयाचा आहे म्हणून त्या दोन पावलाना, चार पावले, चार हात दूरच ठेवतो आहे.

ज्या शाळांतून (पूर्व प्राथमिक) प्राथमिक ते उच्च माध्यमिकपर्यंतचे वर्ग आहेत तिथे फक्त पहिल्या प्रवेशालाच अटीतटीने आणि भरल्या खिशाने झुंज द्यावी लागते. अगदी बाजीप्रभूच्या आवेशात ही खिंड लढवावी लागते. त्यासाठी पाच–सात हजाराचा तरी दारुगोळा लागतो. एकदा का प्रवेश मिळाला की एका मुलापुरता तरी बारावीपर्यंतचा प्रश्न मिटतो. मग तो पालक भरल्या अंतःकरणाने आणि रिकाम्या झालेल्या खिशाने घराकडे चालू लागतो. अशा शाळांची संख्या जास्त आहे, हळूहळू वाढते आहे; पण होते काय की अनेक पालक आपल्या मुलाना सोयीस्कर म्हणून पूर्वप्राथमिक प्रवेशाच्या वेळी घराजवळच्या कोणी घरीच चालविलेल्या, एखाद्याने हौसेने चालविल्या जाणाऱ्या किंवा सुस्थापित अशा 'कुंज', 'विहार', 'वाटिका' इ. नावाने ओळखल्या जाणाऱ्या पूर्वप्राथमिक, प्राथमिक शाळेत घालतात. मग चवथी पास झाल्यानतर पाचवीसाठी धावपळ सुरू होते; पण काही धोरणी, दूरदर्शी, नाना फडणीसाच्या कुळात शोभतील असे मात्र अगोदरपासूनच फार फार पुढचे लक्षात ठेवून जो काही नेटाने प्रयत्न करायचा तो सुरुवातीलाच करतात. त्यासाठी भल्यामोठ्या देणगीची तयारी आणि त्याला पूरक जोड म्हणून कोण्या मोठ्याची चिठ्ठीही मिळवतात व आपल्या प्रतिष्ठेप्रमाणे आपल्या मुलाला शाळा मिळवून देतात. जाती (त्यातील उच्चनीचतेसह) काय फक्त माणसाच्या असतात ! त्या माणसांनी निर्माण केलेल्या, साऱ्याच अशा भिन्नभिन्न जातीच्या होतात. अर्थात इंग्रजी माध्यमाची शाळा म्हणजे आजकाल साऱ्याच पांढरपेशाच्या–आणि म्हणून त्यांचे अनुकरण करणाऱ्या इतरांच्या–मराठी अस्मितेचा मानबिंदू झाला आहे. त्यामुळे मुबईच्या पावलावर पाऊल टाकून- नाहीतरी डोंबिवलीकर मुबईवरच जगतात ना ?–डोंबिवलीतही मराठी माध्यमाची शाळा ही हळूहळू जुन्या चाळीप्रमाणेच अस्तंगत, नाहीशी होत आहे. चाळीऐवजी सारे जीवन बंदिस्त करणारी फ्लॅट, ब्लॉक नामक खुराडी तयार होत आहेत त्याप्रमाणेच आता इंग्रजी माध्यमाची शाळा बहराला येत आहे. त्या मोठेपणाची किंमत पाच हजाराहून अधिक प्रवेश देणगी देऊन मोठेपणा सार्थ होत आहे. अनेकजण वरकमी हसत हसत देतात आणि कृतकृत्य होतात.

तरीसुद्धा काही शाळा मराठी माध्यमाचा ढासळता किल्ला लढवीत आहेत. तेथेसुद्धा प्रवेशासाठी अशीच परिस्थिती आहे. 'शाळा प्रवेशासाठी आम्ही देणगी घेतो' असे खरे सांगणारे चालक भेटत नाहीत. एका जुन्या शाळेच्या संस्थाचालकानी काही वर्षांपूर्वी वृत्तपत्रातून जाहीर केले की आमच्या शाळेत देणगी घेत नाहीत. वस्तुस्थिती वेगळी, शब्द फक्त वेगळा इतकाच त्याचा अर्थ. फक्त नव्या शाळेची सुरुवात मात्र 'आम्ही प्रवेश देणगी घेत नाही' असा फलक लावून होते. आज सरसहा साऱ्या जुन्या शाळा कमीअधिक देणगी घेतातच. तरीसुद्धा शाळेत प्रवेश मिळणे हे एक दिव्यच होऊन बसले आहे काही शाळातून दोन–तीन 'मे'ला प्रवेश अर्ज देण्यात येतील अशी सूचना लावली जाते. त्या शाळेतून पहाटे पाच साडेपाच वाजल्यापासून प्रवेश अर्ज मिळविण्यासाठी पालक रांग लावून उभे राहतात अर्ज वाटले जाणार असतात जेमतेम दोनशे वा अडीचशे आणि अर्थात रांग असते त्याहीपेक्षा अधिक संख्येची. मग प्रवेश अर्ज भरून देणे, टक्केवारीप्रमाणे नावाची यादी लागणे, प्रवेशासाठी पैसे, फी भरणे असा हा चांगला चार–पाच नैमित्तिक रजा खाणारा कार्यक्रम सुरू होतो. ही मंडळी कमी पैशात–अर्थात ती मराठी माध्यमवाली असतात हे वेगळे सांगायला नको प्रवेश घेणारी असतात. इतरत्र काही हजाराचा

पृष्ठ २९ वर

# राजीव गांधींची घोडदौड

विश्राम राजहंस, डोंबिवली

राजीव गांधी सत्तेवर आल्यावर आणि त्यातल्या त्यात निवडणुकांत प्रचंड बहुमत मिळवून आल्यावर भारतातील सर्वच क्षेत्रात प्रचंड हालचाली चालू आहेत. इंदिरा हत्येनंतरच्या राजीव गांधींच्या रेडिओ व दूरदर्शनवरच्या भाषणाने सर्व भारतीय भारावून गेले. साधा भोळा वाटणारा, स्थिर नजरेचा, समोरच्या माणसावर विश्वास टाकणारा आणि मुख्य म्हणजे छक्केपंजे न लढवता सरळ प्रामाणिक बोलणारा हा नवीन पंतप्रधान भारतीय जनतेला प्रचंड आवडला. लोकांनी त्याच्या गळ्यात प्रचंड बहुमताची माळ घातली व सिंहासनावर बसवून सर्व भार त्याच्यावर टाकून दिला. राजीव गांधी देखील या देशाच्या उद्धाराचे काम आता आपल्याच हातून होणार आहे या जाणिवेनं घोड्यावर स्वार झाले आहेत. हा घोडा दिग्विजयी घोडा ठरतो की चौखुर उधळतो, हे आता बघायचं.

भारताचं आर्थिक धोरण उजवीकडे की, डावीकडे की, मध्यममार्ग बरा, या कोणत्याच वादात न पडता, त्यांनी आपली पिशवी उघडली आणि औद्योगिक वाढीसाठी प्रचंड सवलती उधळल्या. अनेक बंधनं काढून टाकली किंवा सैल केली. औद्योगिक क्षेत्रातली मक्तेदारी वाढली तर मोठे उद्योगपती ही नवीन सत्तास्थाने निर्माण होऊन आपल्या खुर्चीला शह देतील ही आतापर्यंतच्या सर्व राज्यकर्त्यांची भीती होती. राजीव गांधींनी ही मक्तेदारीवरची बंधनं खूप प्रमाणात सैल करून टाकली. यामुळे मक्तेदारी वाढून काही विशिष्ट उद्योगपतींचं प्रस्थ खूप वाढणार हे सरळच आहे. पण त्याची तमा राजीव गांधी बाळगत नाहीत, असं दिसतंय. उद्योगपतींचे सत्ताधाऱ्यांशी संबंध हे बहुसंख्य वेळा उद्योगधंद्याच्या परवान्यासाठी किंवा आयात-निर्यात धोरणावर अंकुश ठेवण्यासाठी असतात, त्यांचे स्वतःचे हितसंबंध धोक्यात आले की, ते सत्ताबदल करण्यासाठी धडपड करु लागतात. याचा धोका राजीव गांधींना सतत रहाणार आहे. आयात परवाने व उद्योगधंद्यांचे परवाने शिथिल करून हा दबाव आणण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतोय.

संपत्तीची समान वाटणी महत्त्वाची की सर्वसाधारण राष्ट्रीय उत्पन्न वाढवणं महत्त्वाचं असा वाद लवकरच सुरू होणार आहे. याबाबतीत रशिया व अमेरिका ही दोन उदाहरणे आपल्यासमोर आहेत. समान आर्थिक वाटणी करायची तर लोकांच्या नैसर्गिक उर्मीला आवर घालण्यासाठी बळाचा वापर करावा लागतो आणि मग लोकशाही उरत नाही. राजीव गांधींनी सर्वसाधारण राष्ट्रीय उत्पन्न वाढवण्याचं ठरलेलं दिसतय ! आणि असं करताना भांडवलशाहीकडे काटा भरपूर झुकवला आहे अमेरिकेची एकंदर प्रकृतीच स्वातंत्र्यवादी आहे. त्यामुळे तेथे भांडवलशाहीवाचून पर्यायच नाही. भारताबद्दल तसे म्हणणे धोक्याचं आहे. नेहरू, इंदिरा गांधी आणि जनता राजवट या तिघांनी मध्यममार्ग चोखाळला. भांडवलशाही अर्थरचनेत कामगार चळवळीची भीती असते. भारतात साम्यवादाचे मूळ धरले होते. कामगार चळवळ पूर्णपणे साम्यवाद्यांच्या हातात होती. लोकशाही तर हवी, साम्यवाद नको. या भानगडीत मध्यममार्गच बरा असंच सर्वांना वाटत असावं. इंदिरा गांधींच्या कालखंडात साम्यवादी पक्षांचा बराच बिमोड झाला.

राजीव गांधींच्या अमेरिकावादी धोरणाने दोन समस्या उभ्या रहाणार आहेत. एक म्हणजे रशियाची नाराजी व दुसरं म्हणजे साम्यवादाचा पुनरोदय. राजीव गांधींच्या रशिया भेटीमुळे सध्या निदान नाराजी तरी नाही असं चित्र दिसतंय. रशियातली गोर्बाचेव्ह यांचीदेखील राजवट नवीच आहे. त्यामुळे आत्ताच काही अनुमान काढणं घाईचं होईल. पण भारताची अमेरिकेबरोबरची वाढती मैत्री व संबंध रशियाच्या डोळ्यात सलत रहाणार आहेत. रशियाची एक सीमा काश्मिर खोऱ्याजवळ आहे आणि काश्मिर व पंजाब सध्या आपल्याला अडचणीच्या जागी गळूप्रमाणे झालेले आहेत. हे लक्षात घेतलं तर रशियाबरोबरच्या संबंधाला महत्त्व कळू शकेल.

रशियाच्या राजीव गांधींच्या दौऱ्यानंतर भारत–रशिया यांच्यातील संयुक्त पत्रकात अफगाणिस्तानचा अप्रत्यक्ष उल्लेख आहे. कोणत्याही देशाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप होऊ नये, असं आवाहनही त्यात आहे. हा आतापर्यंतच्या परराष्ट्रधोरणातील बदल आहे. इंदिरा गांधींच्या राजवटीत अफगाणिस्तानबद्दल कधी शब्द देखील निघत नव्हता. अलिप्त राष्ट्रांच्या परिषदेतदेखील भारताने रशियाचा निषेध होऊ दिला नाही. रशियाबरोबरच्या मैत्रीला भारत नेहमीच जागला आहे. भारतातील पश्चिम किनाऱ्यावर सापडवून दिलेले तेलही रशियाची देणगी आहे. त्या अगोदरच्या अमेरिकन पथकाने या भागात कुठेही तेल नाही, असं प्रमाणपत्र दिलं होतं आणि भारताला अडचणीत आणलं होतं ! भारत–पाकिस्तान युद्धात फक्त रशियाच भारताच्या बाजूला उभा राहिला होता.

राजीव गांधींनी या रशिया भेटीत भारताचं अलिप्ततावादी धोरण व्यवस्थित राबवलेलं आहे. भारतानं आपल्या पायरीवर रहावं यासाठी रशिया काय पावलं उचलतो, ते बघायचं. एक तर भरपूर मदत करून उपकाराचं ओझं भारतावर टाकेल किंवा मदत बंद करून दमदाटी करेल. इतके दिवस इंदिरा सरकारशी मिळतं-जुळतं घ्या, असे संदेश सतत रशियाकडून इथल्या कम्युनिस्ट पक्षास मिळत होते. भारत आणि अमेरिका जर फार जवळ आले तर कदाचित संघर्षाचे आदेश येतील. भांडवलशाहीमध्ये सुरुवातीस संपत्तीचं केंद्रीकरण होतं. श्रीमंत अधिक श्रीमंत होतात. ही संपत्ती कामगार वा खालच्या वर्गापर्यंत झिरपायला वेळ लागतो. त्याच काळात कम्युनिस्ट पक्ष संधी साधण्याचा प्रयत्न करील. तेव्हा नजिकच्या काळात

कामगार व्यवस्थापन संघर्ष पराकोटीला पोहोचण्याची शक्यता आहे.

### राजीव–ग्राहक राजा

भारतातील सरकारी क्षेत्रातील कारखाने सदैव लाडक्या मुलाप्रमाणे लाडावून बसलेले आहेत. राजीव गांधींनी आतापर्यंत या सरकारी क्षेत्राच्या तीन बैठका घेऊन, सरकारी क्षेत्रातला आळस व लाड नष्ट करण्याचा चग बांधलेला आहे. येत्या २–३ वर्षांत बहुतेक कारखाने भरपूर नफ्यात चालू असतील असा अंदाज आहे. सरकारी क्षेत्रातील भारताची गुंतवणूक प्रचंड असल्याने त्यांच्या कार्यक्षमतेला भारताच्या अर्थव्यवस्थेवरील परिणाम उघड आहे. शिस्त, सदाचार आणि वाढतं उत्पादन याचा आग्रह धरल्याने या सार्वजनिक क्षेत्रातले लाडावलेले कामगार प्रथम दंड थोपटून उभे रहातील. त्यांना व्यवस्थित कामाला लावून उत्पादन वाढवणे ही सरकारची व सरकारी उद्योगाची मोठीच कसोटी ठरेल. कदाचित साम्यवादाच्या उठावास येथून सुरुवात होईल.

अमेरिका व भारत याच्यातील संबंध मात्र अभूतपूर्वरित्या बदलणार आहेत. भारताच्या बदललेल्या धोरणाचं सर्व अमेरिकन लोकांनी मन:पूर्वक स्वागत केल आहे. भारतात भांडवल गुंतविण्यास उत्सुक असलेल्या अमेरिकन उद्योगपतींची सख्या हजाराच्या वर जाईल. इंडिया इंटर नॅशनल ही अमेरिकेतली कंपनी भारतातील गुंतवणूक व कारखानदारीतलं सहकार्य यावाबत सल्ला देण्याचं काम करते. आज या कंपनीकडे हजारो अमेरिकन कंपन्या भारताबद्दल चौकशी करीत आहेत भारताच्या तंत्रज्ञान आयातीतल्या सवलतीचा मुख्यत: हा परिणाम आहे. भारताची रशियाशी कितीही मैत्री असली तरी, भारताचा व्यापार हा मुख्यत: अमेरिकेशीच चालतो. भारतातली गुंतवणूक आज ७५० कोटी रुपयाच्या आसपास आहे आणि एकूण व्यापार ५००० कोटी रुपये आहे तो यापुढील काही वर्षात काही पटींनी वाढणार आहे. इंदिरा गांधींच्या कारकिर्दीत अमेरिकेतील तंत्रज्ञान आयात करण्यास खरा प्रारंभ झाला; पण येत्या काही वर्षात त्याचे स्वरूप, आकार आणि व्याप्ती खूप प्रमाणात बदलणार आहे.

मात्र या सर्व व्यापारात भारताची भूमिका निव्वळ देवाण-घेवाणीची असणार आहे, हे राजीव गांधींनी अमेरिकेला जाण्यापूर्वीच स्पष्ट केलं आहे, 'आम्ही काहीही मागण्यासाठी अमेरिकेला जाणार नाही.' असं त्याचं म्हणणं आहे. यातून हे स्पष्ट आहे की, भारताला अमेरिकेचे उपकार नको आहेत. कोणतीही 'मदत' किंवा देणगी नको आहे. भारताला अमेरिकेच्या तंत्रज्ञानाची गरज आहे. अमेरिकेला ग्राहक हवा आहे. बस्स. सबंध इथे संपले. मात्र अमेरिका एवढी सरळ नाही. त्याना भारत आपल्या अंकीत व्हायला हवा आहे. यासाठी ते भारतावर जास्तीत जास्त दबाव टाकायचा प्रयत्न करतील. रोनाल्ड रीगन कडक भूमिका स्वीकारण्याबाबत प्रख्यात आहेत; पण यावेळी भारताच्या बाबतीत राजकीय दबावापेक्षाही भारतातील अमेरिकेची गुंतवणूक त्यांना जास्त महत्त्वाची वाटत आहे. त्यामुळेच 'राजकीय मतभेद' कायमच रहातील; पण त्याचा या व्यापार-सबंधावर परिणाम होऊ नये अशी आज अमेरिकेची इच्छा आहे. याबाबत अमेरिकेतील अनेक उद्योगपती व राज्यसरकारे रीगन सरकारवर दबाव आणीत आहेत. रीगन सरकारनेदेखील भारताशी सर्व प्रकारचे सबंध वाढवण्याची इच्छा जाहीरपणे प्रकट केली आहे.

राजीव गांधी आणि इंदिरा गांधी यांच्या दोघांच्या व्यक्तिमत्त्वात प्रचंड फरक असल्याने राजीव गांधीच्या शब्दाला वजन प्राप्त झाल आहे. इंदिरा गांधी एक बोलणार व दुसरंच करणार. कोणावरही त्या विश्वास टाकणार नाहीत. मतलबी, राजकारणी, धूर्त व कारस्थानी बाई अशी त्यांची प्रतिमा. त्यामुळेच त्यांच्या शब्दाला आतरराष्ट्रीय संबंधात वजन नव्हतं! उलट त्यांच्याविषयी जरा अविश्वास व भीतीच होती. राजीव गांधीच्या बाबतीत नेमकं उलटं आहे, त्यांनी पंजाब प्रश्न सोडवण्याबाबत घेतलेला पवित्रा, त्याचं आर्थिक धोरण, स्मगलराविरुद्ध किंवा आर्थिक गुन्हेगारांविरुद्ध केलेल्या उपाययोजना, या सर्वांमुळे त्यांची भारतातील प्रतिमा तर खूप उजळ झालेलीच आहे. पण परदेशातसुद्धा त्यांच्याभोवती एक वलय तयार झालं आहे. राजीव गांधींच्या अमेरिका भेटीस तेथील प्रसिद्धी माध्यमांनी इतकी प्रसिद्धी दिली आहे की, इतर राष्ट्रांना सुद्धा हेवा वाटावा.

रशियासारख्या साम्राज्यवादी हेकेखोर बलाढ्य राष्ट्राकडूनही राजीव गांधींनी आपल्याला पाहिजे त्या निवेदनावर सही मिळवली, हे त्यांचं प्रचंड यश आहे. भारत व रशिया याच्या सबंधाला कदाचित नवं वळण लागेलही. त्यामुळेच फ्रान्सकडून पाकिस्तानला लष्करी मदत मिळणार नाही. अगदी तंत्रज्ञानसुद्धा– हे आश्वासन मिळवण्यात राजीव गांधींना काहीच अडचण आली नाही. भारत देश सध्या मोठा ग्राहक आहे, आणि ग्राहक राजा असतो. हे राजीव गांधींनी ओळखलं आहे ह्याच डाव ते अमेरिकेत खेळून काही दान आपल्या पदरात पाडून घेऊ पाहत आहेत.

राजीव गांधींची परराष्ट्र संबंधातील पावलं अधिकाधिक जोमानं पडताहेत. भारतातील अंतर्गत धोरणातही त्यांची गती आश्वासक आहे; पण तरीही भारताचं भवितव्य आता निर्धोक आहे, असं म्हणवत नाही. त्याचं मुख्य कारण त्यांनी त्यांच्याभोवती जी माणसं जमवली आहेत, ती जरी केंब्रिजमध्ये शिकलेली, व्यावसायिक व्यवस्थापक व सचोटीची असली तरी मुळात माणसं आहेत त्यामुळं त्यांच्या अंगात सत्तेचं भूत शिरणार नाही कशावरून? उद्या कदाचित हीच मंडळी शिरजोर होऊन ७५ ते ७७ काळातल्या चांडाळचौकडीसारख्या चौकडीचा उदय होईल व त्यांना बाजूला करणं राजीव गांधींना जड जाईल. दुसरं म्हणजे भारतातल्या लोकशाहीची पुनर्स्थापना करणं हे फारच अवघड होऊन बसलं आहे. राजीव गांधी हे मुरलेले राजकारणी नसल्याने किंवा स्वातंत्र्य चळवळीशी अजिबात संबंध नसलेले असल्याने पक्षातली लोकशाही किंवा कारभारातली लोकशाही यांचं त्यांना फारसं महत्त्व वाटत असल्याचं अजूनपर्यंत दिसलं नाही. केवळ प्रगत तंत्रज्ञान वापरून समाजाला पुढे नेता येत नाही. तसच लोकांचं दारिद्र्य दूर झाल म्हणजे त्यांचे सर्व प्रश्न दूर झाले, असंही होणार नाही. समाज फार हळूहळू पुढे जात असतो. सर्व समाजाला बरोबर घेऊन जाणं ही सगळ्यात अवघड पण सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे. अजूनही मुख्यमंत्र्याची नेमणूक होते व ती दिल्लीतूनच केली जाते, ही अतिशय वाईट गोष्ट आहे. सर्व समाजाला चुचकारून, समजूत

घालून, मन वळवून पुढे पावलं टाकायला लावणं राजीव गांधीना जमणार आहे की नाही ? त्याची कसोटी अजूनतरी लागलेली नाही. नाहीतर कदाचित काहीच लोक पुढे जातील. बहुसख्य समाज मागे राहील आणि तोच बहुसंख्य समाज रागाने राजीव गांधीना सत्तेवरून दूर करेल. त्यावेळी कदाचित नव्या पतप्रधानाना लोकशाही तंत्राचं महत्त्व पटेल; पण तोपर्यंत कदाचित फार उशीर झालेला असेल. □

# महिना १५,००० रुपये मिळविणारे पत्रकार

पैसा मिळवून देणारं क्षेत्र अशी काही पत्रव्यवसायाची ख्याती नाही. या आधी तर मास्तरकीला जवळच असं हे एक भिकार क्षेत्र आहे, असा बऱ्याच जणांचा समज होता. त्याग, लढाऊपणा यांची खुमखुमी असेल त्याने या क्षेत्रात जावे. पैसा मिळवायचा असेल तर मात्र वैद्यकी वा अभियांत्रिकी या व्यवसायांची कास पकडावी. या अशा वातावरणात 'फ्रीलान्सर' वा मुक्त पत्रकार हा प्राणी तर अस्तित्वातच नव्हता पत्रव्यवसायात जायचे म्हणजे एखाद्या प्रस्थापित दैनिकात वार्ताहर वा उपसंपादक म्हणून चिटकायचे, वर्षानुवर्षं एकाच पत्रात राहिल्यामुळे जे काही फायदे वा नाव मिळेल, त्याच्यावर समाधान मानायचे असा प्रकार होता. हीच परिस्थिती इंग्रजी पत्रकारांबाबतही होती. पत्रव्यवसायातील सर्व नामवंतानी मिळविलेल्या नावलौकिकात ते काम करीत असलेल्या सघटनाच्या प्रतिष्ठेचा फार मोठा वाटा होता. उदा. इंडियन एक्स्प्रेसमुळे कुलदीप नायर, द इलेस्ट्रेटेड विकली व हिंदुस्तान टाइम्समुळे खुशवतसिंग, अमृतबजार पत्रिकेमुळे जनार्दन ठाकूर वगैरे.

पण आणीबाणीनंतरच्या काळात पत्रकारितेत बऱ्याच उलथापालथी झाल्या. फ्रीलान्सिगची सुरुवात ही त्यातील एक. आज सहकारी तत्त्वावर स्तंभलेखन करणारे वा स्वतंत्रपणे वृत्तसेवा देणारे काही फ्रीलान्सर्स पूर्वीपेक्षा पाच ते सहा पट अधिक कमाई करतात. फायदेशीरपणामुळे अधिकाधिकजण इकडे आकर्षित होत आहेत. अलीकडेच एस. वेंकटनारायणन आणि सईद नकवी या क्षेत्रात उतरले आहेत. वेंकटनारायणन पूर्वी 'इंडिया ट्रेड'चे कार्यकारी संपादक होते तर सईद नकवी इंडियन एक्स्प्रेसच्या मद्रास आवृत्तीचे संपादक होते.

भाषिक पत्रव्यवसायाची फार मोठी बाजारपेठ फ्रीलान्सर्सना मिळालेली आहे. बरीचशी भाषिक पत्रे पूर्णवेळ स्तंभलेखक वा विशेष वार्ताहर ठेवण्याच्या स्थितीत नव्हती; पण त्यांना अशा विशेष स्तंभलेखकाची जरूर होती. अट फक्त एकच, ते स्तंभलेखन त्यांच्या भागात त्यांच्या पत्रापुरतेच मर्यादित हवे. उदा. दक्षिणेतील मल्याळी भाषिक पत्राची उत्तरेतील हिंदी भाषिक पत्राशी स्पर्धा असायचं काहीच कारण नाही. तेव्हा दोन्हीतही एकच स्तभ यायला त्यांची हरकत नव्हती. आणि यातूनच सहकारी तत्त्वावर स्तंभलेखन करणाऱ्याचा जन्म झाला. जनार्दन ठाकूर आणि कुलदीप नायर हे या क्षेत्रातले बीनीचे शिलेदार. याच्याव्यतिरिक्त इतर काही महत्त्वाची नावे म्हणजे के. आर. सुदरराजन, राजींदर पुरी, अबू अब्राहम, खुशवंतसिग इ.

आनंदबजार समूहाच्या 'न्यू देल्ही' या मासिकाच्या सपादकत्वाचा राजिनामा देऊन जनार्दन ठाकूर १९७९ त जेव्हा बाहेर पडले तेव्हा त्यांच्यासमोर भविष्याबाबत कोणतीही योजना नव्हती. सर्व काही संपल्यासारखे त्याना वाटत होते; पण अचानक साप्ताहिक स्तंभ चालविण्याचा विचार त्यांच्या मनात आला व तो त्यानी डझनभर सपादकांना कळवला. बऱ्याच संपादकानी त्याच्या या विचाराचे स्वागत केले व मुक्त पत्रकारितेची कल्पना आकारास आली. सुरवातीला एनेडू (तेलगू), प्रजावाणी (कन्नड), नई दुनिया (हिंदी) मिड–डे (इंग्लिश) यांनी त्यांचे स्तंभलेखन स्वीकारले. 'ओव्हरसीज टाइम्स' या अमेरिकन पत्रातही ते स्तभलेखन करायचे. सहा महिन्यातच त्यांची कमाई पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने जास्त वाढली.

स्तभलेखनाबरोबरच वृत्तातसेवेची मागणी झाल्यामुळे ठाकूरांनी 'ऋचा फोचर्स'द्वारे ती सेवाही सुरू केली. ३७ वृत्तपत्रांना ती वृत्तांत पुरविते ४० लाख लोक ती वाचतात. कुलदीप नायर जेव्हा ह्या क्षेत्रात उतरले तेव्हा हे क्षेत्र इतके आश्वासक असेल असे त्यांना वाटले नव्हते सध्या त्याचा स्तंभ १४ भारतीय भाषीक वृत्तपत्रातून येतो. 'बिट्वीन द लाइन्स' हे त्याच्या स्तंभाचे नाव. या व्यतिरिक्त पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळ ह्या देशातील एकेक पत्रातून ते स्तंभलेखन करतात व स्वतःची वृत्तसेवाही चालवतात. नायर यानीच त्यांचे एके काळी शिक्षक असलेल्या खुशवतसिंग याना या क्षेत्रात येण्याचा सल्ला दिला. खुशवतसिंग हे सध्याचे सर्वात लोकप्रिय स्तंभलेखक आहेत. स्वत ची मिळकत ते सांगू इच्छित नसले तरी त्यांच्या मते या क्षेत्रातील कोणीही दरमहा रु. ६००० च्या खाली मिळवत नाही.

घरीच टॅलेक्स मशीन असल्यामुळे वेंकटनारायणन हे अधिक चागली सेवा देऊ शकतात. ते सपादकीय टीकाटिप्पणी देण्यापेक्षा 'ऑन दी स्पॉट' रिपोर्ट देणे अधिक पसंत करतात· ते अधूनमधून लंडन येथील दूरदर्शनसाठीही काम करतात. चिलीतील एक साप्ताहिकही त्याचे वृत्त घेते. स्वतःच्या उत्पन्नाचा अंदाज त्यांनी महिना १५००० रु. असा सांगितला.

सईद नकवीनी नुकतीच 'वर्ल्ड रिपोर्ट' ही वृत्तसेवा सुरू केली. ते आपले सहसंपादक अरुण चाको यांना १०००० रु. पगार देऊ शकतात. ह्या धाडसामागील त्यांची कल्पना अशी की ते किंवा त्यांचे सहकारी जगातील विविध घडामोडीच्या केंद्रांना भेटी देतील आणि भारतीय वृत्तपत्रे, मासिके तसेच आकाशवाणी व दूरदर्शन यांना ताजा वृत्तांत पाठवतील. त्यांच्या कल्पनेला उत्साहजनक प्रतिसाद मिळाला आहे. मद्रासमधील विल्सन कपनी त्यांची भागिदार झाली आहे. नकवीनी दूरदर्शला गार्बाचेव्ह, मिट्टरअँड होस्नी मुबारक याच्या मुलाखतीची योजना सादर केली. पण त्याच्या मते नोकरशाहीच्या अडथळ्यांमुळे अजून ती प्रत्यक्षात आलेली नाही.

या सर्व फ्रीलान्सर्सच्या यशामागील कारणे काय असावीत, याची चिकित्सा त्याच्यापैकीच काहींनी केलेली आहे. यू. एन. आय. आणि पी.टी.आय.या वृत्तसंस्था बहुतांश पठडी-

तला मजकूर पुरवतात. भाषिक पत्रे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने झपाट्याने सरसावतायत. त्यांना वाचनीय मजकुराची निकड जाणवतेय. कोणी असा मजकूर पुरवत असेल तर तो विकत घ्यायला ती तयार आहेत. बरे याचा फायदा दोघानाही आहे. एखादा स्तंभलेखक दहा वृत्तपत्रातून प्रत्येकी १००० रु. साठी स्तंभलेखन करत असेल तर त्याला महिना १०,००० रु. प्राप्ती होते. ही त्याच्या पगाराच्या रकमेहून किती तरी अधिक असते, तर वृत्तपत्रांना १००० रु. त साप्ताहिक वाचनीय मजकूर मिळतो.

पण आता हे क्षेत्र अशा एका अवस्थेला आलं आहे की येथून पुढे त्याची वाढ होऊ शकत नाही. फ्रीलान्सर्सना त्याच त्या वृत्तपत्र वा पत्रिकांवर अवलंबून राहावे लागते, कारण प्रादेशिक बंधनांमुळे बाजारपेठ मर्यादित आहे. दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे प्रमुख वृत्तपत्रात काम करणारी माणसे बाहेरच्याना इतके महत्त्व देण्याच्या विरुद्ध आहेत. पण हे हरहुन्नरी पत्रकार यातूनही निश्चितपणे मार्ग काढतील.

ही सर्व अद्‌भूत माहिती वाचल्यानंतर नकळत भाषिक पत्रव्यवसायाचा विचार मनात येतो. त्यात फ्रीलान्सिगला, कितपत वाव आहे ? फ्रीलान्सिगसाठी नोकरी सोडून बाहेर पडण्याइतका धाडसीपणा त्यानी दाखविला आहे का ? बरेच भाषिक पत्रकार गेली दोन–तीन वर्षे पालेकर वेतन निवाडा सरकार केव्हा मान्य करते याची वाट पाहात होते. तो मान्य झाल्यावर ते आपापल्या खुर्च्यांना जास्तच चिकटले. पण एकदरीतच मानधन हा प्रकार मराठी पत्रव्यवसायातही अपवादात्मक आहे. तीन–चार हेलपाट्यानंतर तुमचा लेख छापला म्हणजे तुमच्यावर कृपाच केली अशी बऱ्याच पत्राची वृत्ती. अशा वातावरणात फ्रीलान्सिगचे बीज रुजणे अवघडच.

ते काही का असेना. इंग्रजी पत्रकारांमुळे का होईना, पण 'महिना १५००० रु. मिळविणारे, देशीविदेशी हिंडणारे पत्रकार' ही जी पत्रकाराची 'क्रेझ' तयार होत आहे, ती निश्चित स्वागतार्ह आहे. या बारावीच्या परीक्षेतील यशवत विद्यार्थ्यांपैकी एकानेही पत्रकार होण्याची इच्छा व्यक्त केलेली नाही; पण अभियांत्रिकी वा वैद्यकी शाखात प्रवेश न मिळाल्यास एखाद्या कार्टर्याने पत्रकारितेत धडपडायला हरकत नाही. कारण हरहुन्नरीपणा दाखवल्यास या क्षेत्रातही आता १५,००० रु. महिना मिळू शकतात.

—संजय डोंगरे

## धम्माल गाणी, खच्चून दंगा आणि स्वच्छ गोरीपान स्टेजवर मोकळेपणानं वावरणारी मुलामुलींची गर्दी यातून व्यक्त होतो आम्ही ?

# आमचे पडघम 'असे' बडवायचे ?

अस्मिता दीक्षित

मी खूप लहान असतानाची गोष्ट आहे. म्हणजे काही बोलता–सांगतासुद्धा यायचं नाही तेव्हाची. मला साभाळणाऱ्या बाईच्या तावडीत सोडून आई ऑफिसला जायची. संध्याकाळी ती परत येताक्षणी मला रडायलाच यायचं. दिवसभरचा एकटेपणा, कंटाळा, सांभाळणाऱ्या बाईबद्दल तक्रारी, मला टाकून गेल्याबद्दल राग, मला झालेला त्रास असं बरच काही तिच्यापर्यंत पोचवायचा हा प्रयत्न असायचा; पण त्याचा फारसा उपयोग झाल्याचं मला आठवत नाही. 'दिवसभर खेळते, मी आले की रडणं सुरू', या भावनेतून आईची चिडचिड आणि दिवसभरातलं काय–काय आठवून माझं रडणं क्रमा–क्रमानं वाढत जायचं मग कधी एखादा धपाटा तर कधी कसला तरी खाऊ– नाही तर खेळणं देऊन माझं तोंड बंद केलं जायचं.

(आता मधूनच कधी हे आठवलं की, जखम वाळायच्या आत तिच्यावरची खपली काढायला गेलं की त्या जागी जशी वेदनेची लाट उसळते, तसं काहीसं होतं. 'खोटं होतं का माझं दुःख ?'

'मला नीट व्यक्त करता कसं आलं नाही ते ?'

'मला समजून घ्यायला कमी पडली का मोठी माणसं ?')

'पडघम' पाहिलं आणि परत एकदा तोच अनुभव ! वाटलं, त्यावेळी माझ्या रडण्याचे आपल्याच डोक्यानं काही तरी अर्थ काढून मोठी माणसं खोटं खोटं, लाड लाडं वागायची तसलंच काही तरी पुन्हा सुरू झालंय्.

'एका राजकीय युवक नेत्याची अशीही जडण–घडण', किंवा 'एका सत्यकथेवर आधारित' अशी टीप असती तर प्रश्न नव्हता; पण हे नाटक आजच्या युवापिढीचं–युवानेत्याच प्रतिनिधीक–प्रतिकात्मक नाटक आहे, असा समज होताना दिसला म्हणून तर...!

जे विचार करतात त्याचा प्रश्न नाही; पण आमच्यातल्याच काहीजणाना हे नाटक 'खास', 'आपलंच' वाटावं ? धम्माल गाणी, खच्चून दंगा आणि स्वच्छ–गोरीपान, स्टेजवर मोकळेपणानं वावरणारी मुला–मुलींची गर्दी– यातून व्यक्त होतो आम्ही ?

मोठ्यानाही वाटतय्– 'खरंच, अशी घडते आहे तर आजची तरुण पिढी !'

त्रास या गोष्टीचा होतोय मला ! असं नाहीये. या नाटकात आम्ही कुठेच नाही. आमचं नाटक नाहीये हे !

वर्तमानपत्रातल्या बातम्यांचा, आजूबाजूच्या घटनाचा तर्कानं अर्थ लावून आणि थोडी फार मानसशास्त्रीय तत्त्वं लावून आमच्याशी संवाद साधणं, आमच्या व्यथा–समस्या–सुख दुःख वगैरे व्यक्त करणं शक्य होईल असं वाटतं ?

आमच्या तोंडची हजरजबाबी, स्मार्ट–समोरच्याला गप्प बसवणारी वाक्यं आमच्या हुशारीच–धीटपणाचं द्योतक असतील; पण त्यातून आम्ही पूर्ण व्यक्त होतो असं समजणं

कितपत बरोबर ?

की तरुण म्हटलं की चापल्य–वेग–हालचाल–आवाज–आवेग असच काही तरी दाखवावं सतत ?

'मनाचे पीळ' आणि 'मानसिक संघर्ष' कधी कधी *अत्यंत व्यक्तिगत* पातळीवरचे असतात म्हणून बाजूला ठेवू आपण एकवेळ; पण तरीही, '*आमच आयुष्य आम्ही* इतके वरवरचे सघर्ष करण्यात नक्कीच घालवत *नाही आहोत.*' इतक्या तोकड्या नाहीयेत आमच्या जाणिवा !

अगदी वरवरच्या घटना घडत रहातात, ठोक–घाऊक भावात घडल्यासारख्या आणि तरुण–तरुणीचा एक कळप त्यात भाग घेतो. सगळच फसवणुकीच्या पातळीवर ! दिशाभूल करणारं–खोट खोटं–भडक ! अपेक्षित!

नाटकात वापरलेली तत्रे, साधने आणि इतर चमकदार गोष्टीवर चर्चाच नको, असं ठरवलं तरी, उरलेल्या गोष्टीतही फारसं वाखाणण्याजोगं काही सापडत नाही.

माणस नेहमीच तर्कसंगत वागतात असं नाही आणि नाटकात, किंवा अगदी जीवनातही काहीही घडू शकत या दोन्ही गोष्टी स्वीकारल्या तरी, नायकाच्या व्यक्तिमत्त्वाची घडण एकसघ नाही हे जाणवत रहातंच. विस्कळीत, दुभंगलेल, तडे गेलेलं व्यक्तिमत्त्व *स्वत:शीही प्रामाणिक वाटत नाही* एकेकाळी ज्याच्या जाणिवा अत्यंत धारदार होत्या, तो तरुण, राजकारणामुळे स्वत:मध्ये घडलेल्या बदलाच्या जाणिवेनं निर्माण होणारी अस्वस्थता–दु.ख काय, 'नव्हते व्हायचे तरीही झालो पुढारी', अशा बोथटपणानं व्यक्त करत राहील ? इतके अप्रामाणिक आहोत आम्ही स्वत:शीच ? आत्मपरीक्षणाची कुवत नाही का आमच्यात ? राजकारणात सज्जनाचा दुर्जन होणं स्वीकारलंच आहे आपण एव्हाना ! तरीही स्वत:वर ती वेळ येईल तेव्हा तडफड नाही होणार आमची ? की सहज स्वाभाविकतेन स्वीकारू आम्ही हे *सगळं ?* इतके निर्ढावलो नाही आहोत आम्ही !

आमची एकूण संवेदनाक्षमताच लिलावात काढलीय् या नाटकात ! 'डिग्री–नोकरी–छोकरी' एवढ्याच समस्या आहेत आमच्या? हेच जाणवतं आम्हाला तीव्रतेनं ? की यापलिकडे विचार करणं झेपत नाही आम्हाला अशी समजूत आहे लेखकाची ? 'आम्ही केवळ सामान्य युवकांच्या समान समस्या विचारात घेतल्या', हे समर्थन अपुरं आहे.

प्रवीण नेर्लेकरच्या मागे मागे जाणारा एक कळप– हे प्रतीक नाही होऊ शकत *आजच्या सामान्य युवकांचं ! त्याना वेळ नाहीये* असलं काही करत बसायला ! विशेषत: *इतक्या तीव्रतेनं प्रतिक्रिया व्यक्त* करायला ! आजचे युवक धर्मश्रद्ध असल्याचा *आभास निर्माण करण्याचा प्रयत्नही* चुकीचा वाटतो (एकतर आम्हाला धर्माबद्दल फारशी, *व्यक्त करण्याइतकी आस्था वगैरे नसते* आणि जी असते ती फक्त दगल उसळल्यानतर *उफाळून येते.*)

इतकं मेंढरासारखं, विवेकशून्य–विचारहीन व्यक्तिमत्व आहे आजच्या युवकांचं ? ( नाटक संख्यात्मकतेचं आहे की गुणात्मकतेच ? ) आमची घुसमट काय केवळ शारिरीक आहे, पोलिसाच्या लाठीमारामुळे होणारी ? जाणिवा, विचार वगैरेशी काही सबध नाही आमचा ? की सारखं राजकारणच खेळत असतो आम्ही ?

हे युवकाचं नाटक आहे की युवकांच्या गर्दीचं, तेच कळेनासं झालंय. गर्दी बऱ्याचदा दिशाहीन असते. पण एखादी पिढीच दिशाहीन ठरवायची आणि तिच्या दिशाहीनतेचं हे.'असं' समर्थन द्यायचं ? उथळ आणि धोपटमार्गी !

तरुणाची प्रेमाची व्याख्या इतकी उथळ का वाटते लेखकाला ? वरवरची–निर्बुद्ध–अविचारी ? कारखानदार–मध्यमवर्गी, कम्युनिस्ट–अपक्ष असले फिल्मी–पुस्तकी सघर्ष *असतात आमच्या प्रेमात*, हे कुणी ठरवलं ? प्रेमभावनेची उंची किंवा खोली म्हणा हव तर, आम्हाला जाणवत नाही हा निष्कर्ष कशाच्या आधारावर निघाला ? आम्ही इतक वरवर, अर्थहीन, ध्येयहीन जगत नाही आहोत इतक सरळ–ठसठशीत ठळकपणे आखता येईल अस जगणं कोणाला तरी शक्य आहे का आजकाल ?

सगळ जग कुणी तरी चिरफाड केल्यासारखं उलगडत जात असतं. आजवरचे संस्कार–आदर्श धडाधड निरुपयोगी ठरत *असतात* क्षणोक्षणी धक्कादायक घटनांना, घडामोडींना सामोरं जावं लागत असतं. खरं–खोट कळेनास होतं, लोकाच्या वागण्याचे निरनिराळे अर्थ जाणवून घेण अंगवळणी पडलेल नसतं. त्यात आपल काही तरी स्थान, आपल जग, आपली माणसं निर्माण करायची धडपड करणारे आम्ही.

आमचं हे अस चित्रण ? आमच्या वागण्याची ही अशी समर्थनं ? अशी संगती ? असे नाही आहोत आम्ही !

हे आमचं नाटक नाहीये.

**हे त्यांचं आहे जे केवळ वर्तमानपत्रातल्या बातम्या वाचून ठळक घटना निवडून, स्वत च्या कल्पनाशक्तीनं आमचं चित्रण करतात आणि त्यांचं आहे, जे वास्तवाला भव्य-दिव्य, चमकदार, डोळे दिपवणारं, संगीत-नृत्यमय बनवून त्याचा आत्माच गमावतात.**

आमच्या जगात हे घडत नाहीये असं नाही; पण हेच महत्त्वाच किंवा, सगळ्यापर्यंत पोचवाव असं नाहीये. 'एवढ्यालाच' तोंड द्यावं लागत नाहीये आम्हाला ! अजून लाखो गोष्टी आहेत. उगाच आपलं, राजकारणावरच्या टीकेला चागली आणि उत्स्फूर्त *प्रसिद्धी मिळते म्हणून* काही तरी चटपटीत–खुसखुशीत सवाद लिहून युवकाना राजकारणाचे बळी सिद्ध करण घातक नाही वाटत ? काय कारण आहे असली काही तरी हवा निर्माण करायचं ?

निदान आपल्याकडे तरी तरुण रक्ताला राजकारणात कितपत वाव आहे, हे नव्यानं *सागायची गरज नाही.* आणि असं असूनही आम्ही आमच्या आयुष्याचा महत्त्वाचा काळ राजकारणात लुडबूड करण्यात घालवतो असं वाटतं ? राजकारण–आदोलन आमच्या जीवनाचं प्रमुख अंग वगैरे नाहीये.

चारित्र्य, पावित्र्य वगैरेच्या जुनाट संकल्पना आणि निर्बंध जीवन घेऊन येणारं आधुनिक, विस्तारित जग. आम्ही अजून याचाच आम्हाला परवडेलसा मध्य काढण्याचा प्रयत्नात आहोत आमची आपापसातली नाती 'क्लिअर' होत नाहीयेत. स्वप्नीलपणे काहीतरी करायला जातो, मग प्रचंड गोंधळ आणि गुता. तो मग सहनशीलतेन, गभीरपणे मोठं व्हायचा प्रयत्न करत सोडवत बसायचं. सोप नाहीये हे ! कुणा मोठ्यांची मदत होत नाही याच्यात.

जे काही थोड्या फार वर्षांनंतर आमच्यातून आकाराला येणारं आहे ना, ते कणाकणानं घडून बनलेलं असणार नाही, तर कणाकणानं झिजून 'उरलेल' असणार आहे.

राजकारण आणि त्यातले धडाधड घडणारे प्रचड मोठे *बदल आणि अपघात*, प्रचंड परिणाम वगैरे करत नाहीयेत आमच्यावर, बऱ्याचदा तर ते आमच्याशी संबंधीत वाटतही नाहीत

आमच्या आयुष्यात सतत येणारे छोटे–छोटे पण अटळ सघर्ष, जपलेल्या–जुळवलेल्या व्यक्तीकडून होणारे विश्वासघात, परिस्थितीचे आपघात याचा परिणाम होतो आमच्यावर.

येणारा प्रत्येक दिवस बदलवत जातो आम्हाला.

आणि असं असताना, आमचे 'पडघम' असे बडवण्याचा प्रयत्न ? □



# लष्कराचा सतत वापर एक अघोरी इलाज

● प्रा. बी. वाय. कुलकर्णी, जालना ●

संसदेत गेल्यावर्षी (१९८४) एका प्रश्नाला दिलेल्या उत्तराचा आधार घेऊन नानी पालखीवालांनी मुंबईत केलेल्या एका भाषणात म्हटले आहे की, गेल्या चार वर्षात (१९८०–८४) लष्कराला एकूण १६५० वेळेस बोलावण्यात आले, तर १९५१–७० या काळात नागरी सत्तेला मदत करण्यासाठी ४७६ वेळेस लष्कराला पाचारण करण्यात आले. भारताचा काही भाग कित्येक दिवसापासून लष्कराच्या टाचेखाली आहे. गेल्या तीस वर्षापासून नागालँड तर २० वर्षापासून मिझोराम, कित्येक वर्षापासून मणिपूर तर गेल्या एक वर्षापासून पंजाब लष्कराच्या ताब्यात आहे व तो किती दिवस लष्कराच्या ताब्यात राहील हे सांगता येत नाही, कारण लष्कर १९५६ पासून नागालँडमध्ये, १९६६ पासून मिझोराममध्ये, १९८० पासून मणिपूरमध्ये, १९८२ पासून त्रिपुरात आहे.

लष्कराचा इतक्या मोठ्या प्रमाणात होणारा वापर योग्य नाही. कारण 'कायदा व सुव्यवस्था' ठेवण्याची जबाबदारी पोलीस यंत्रणेची आहे. लष्कराचे प्रथम कर्तव्य बाह्य आक्रमणापासून देशाचे रक्षण करणे आहे व दुसरे कर्तव्य नागरी सत्तेला व सरकारला अडचणींच्या वेळी मदत करणे. लष्कराला नागरी सत्तेला कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठी अपवादाने बोलवावे, नेहमी नव्हे; पण भारतात तर लष्कराला सातत्याने बोलावले जात आहे, कारण कायदा व सुव्यवस्था ठेवणारी पोलीस यंत्रणा आज आपले कर्तव्य पार पाडण्यास असमर्थ ठरली आहे. भारतातील प्रत्येक राज्याला बिघडलेली परिस्थिती नीट करण्यासाठी लष्कराची किंवा निमलष्करी यंत्रणेची मदत घ्यावी लागत आहे.

भारतीय पोलीस यंत्रणेला काम करणे कठीण झाले आहे, कारण त्यात राजकीय हस्तक्षेप वाढला आहे. राजकीय नेते स्वतःच्या हितसंबंधांची जपणूक करण्यासाठी तिचा वापर करू लागले आहेत. पोलीस यंत्रणेत भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मुंबईतील टेपप्रकरणातून तर हे सिद्ध होते की, मोठ्या प्रमाणात पोलीस अधिकारी, स्मगलर, गुंड यांचे संबंध आहेत, त्यामुळे पोलिसांची नैतिकता पार संपलेली आहे. परिणामतः कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठी ते कुचकामी झालेले आहेत. काही कायद्यांची अंमलबजावणी जी राजकीय नेत्यांना सोयीची नसते, पोलीस अधिकाऱ्यावर दबाव आणून राजकीय नेते होऊ देत नाहीत. परिणामतः परिस्थिती पोलिसांच्या हाताबाहेर जाते व लष्कराला बोलावण्याशिवाय गत्यंतर उरत नाही. गुन्हेगारांच्या संदर्भात पोलिसांची कृती राजकीय स्वरूपाची होत चालली आहे. त्यामुळे पोलिसांवरचा लोकांचा विश्वास पार संपत चाललेला आहे. त्यामुळे ते बिघडलेल्या परिस्थितीला नियंत्रित करतील असे लोकांना वाटत नाही आणि म्हणूनच लष्कराला पाचारण करावे लागत आहे.

## पोलिसांचे नीतिधैर्य खचले

१९८३–८४ मध्ये पोलीस अधिकारी व यंत्रणा पंजाबात दहशतवादाला आळा घालू शकली नाही. कारण दहशतवाद्यांविरुद्ध कृती करणे म्हणजे संसार उध्वस्त करून घेणे अशी पोलिसांची मनोरचना झाली होती. थोडक्यात पोलिसांचे नीतीधैर्य व मनोधैर्य पंजाबात पार खचले होते व त्यामुळेच लष्कराला पाचारण करणे आवश्यक झाले. या व्यतिरिक्त १९८२ ते ८४ हा दोन वर्षाचा कालावधी भारताच्या दृष्टिकोनातून अतिशय वाईट गेला. या कालावधीत आसाम, पंजाबात अनेक खून झाले पंतप्रधानांची हत्या झाली, कायदा व सुव्यवस्था अनेकदा कोलमडून पडली. इतकेच नव्हे तर दिल्लीत झालेल्या दंगलीच्या वेळी समाजकंटकांकडे होळेझाक केली गेली निवडणुकीच्या वेळी राजस्थानातील राजा मानसिंगाचा खून झाला आणि म्हणूनच पोलिसांवर विश्वास न ठेवता लष्कराला व निमलष्कराला पाचारण करणे अपरिहार्य झाले.

पोलिसांचे नीतिधैर्य व मनोबळ आज संपूर्ण देशातच खचलेले आहे याला मोठ्या प्रमाणात राजकीय नेतेच जबाबदार आहेत. काही पोलीस अधिकाऱ्यांचा दाखला देऊन कुलदीप नायर व खुशवंतसिंग लिखित–' ट्रॅजिडी ऑफ पंजाब, ऑपरेशन ब्लू स्टार अँड

आफ्टर' या पुस्तकात म्हटले आहे की, 'पंजाबात पोलीस यंत्रणेत जातीयवादाला सुरुवात १५ वर्षांपूर्वी ग्यानी झैलसिंग पंजाबचे मुख्यमंत्री असताना झाली. कारण त्यांच्या काळात मोठ्या प्रमाणात शीख पोलीस अधिकाऱ्यांचा हुद्दा बदलण्यात आला व त्यांची पंजाबात बदली करण्यात आली. परिणामत: पंजाब पोलीस यंत्रणेतील संतुलन बिघडले, त्यातूनच त्यांच्यातील एकोप्याच्या भावनेला तडा गेला व त्याचे मनोधैर्य इतके खचले की, अमृतसरचे पोलीस महानिरीक्षक एतवाल सुवर्णमंदिराच्या पायऱ्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडलेले असताना, सुवर्णमंदिरात शिरलेल्या अतिरेकी मारेकऱ्याकडून परवानगी मिळाली नाही तोपर्यंत पोलीस एतवालचे प्रेतदेखील हलवू शकले नाहीत. पंजाबात लष्कराला पाचारण करण्यापूर्वी पंजाबची स्थिती अतिशय वाईट झालेली होती. पोलीस व केंद्रीय राखीव दल याच्यातच जातीय तेढ निर्माण झाली होती. पंजाबातील पोलीस शीख म्हणून तर केंद्रीय राखीव दल हिंदू (सीआरपी) म्हणून ओळखले जाऊ लागले. थोडक्यात, जातीयवादाचे भूत जातीयवादाला निपटून काढण्यासाठी पाचारण केलेल्या यंत्रणेतच शिरले होते व त्यामुळे पंजाबात लष्कराला पाचारण करणे आवश्यक झाले होते.'

'पंजाबात लष्कराला पाचारण करावे लागले याला मोठ्या प्रमाणात झैलसिंग व दरबारासिंग यांच्यातील दुही कारणीभूत आहे कारण पंजाबचे मुख्यमंत्री दरबारासिंग व भारताचे गृहमंत्री झैलसिंग असताना पंजाबातील पोलीस यंत्रणा गतीहीन झाली होती. मेहता चौकात पत्रकाराच्या खुनाच्या संदर्भात भिंद्रनवालेला अटक करण्यात आली होती. पण 'दिल्ली' तील सरकारने राजकीय कारणासाठी भिंद्रनवालेला सोडून दिले व पुढे इतके रामायण घडले.

## 'राजकीय' तोडगाच हवा

पोलिसाचे खचलेले मनोबल, संपलेले नीतीधैर्य, पोलीसयंत्रणेत राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप यामुळे ही यंत्रणा पार कोलमडून गेलेली आहे व त्यामुळेच लष्कराला वारंवार पाचारण करावे लागत आहे. लष्कराला वारंवार पाचारण करावे लागत आहे याला काही प्रमाणात राजकीय नेत्याची पक्षीय दृष्टिकोनातून प्रत्येक प्रश्नाकडे पाहण्याची प्रवृत्तीदेखील जबाबदार आहे. पंजाबचे माजी गृह सचिव ए. एस. पुन्नीच्या मते 'सुवर्णमंदिरातील शस्त्रास्त्राची सरकारला पूर्ण कल्पना होती. कोणत्या मार्गाने व कशा प्रकारे ती शस्त्रास्त्रे तेथे गेली याची माहिती गुप्तचर विभागाने सरकारला दिली होती. पण त्यावेळी सरकारने काहीच पाऊले उचलली नाहीत. कारण त्या वेळी अकालीचे मवाळ नेतृत्व जे विरोधी पक्षाच्या बाजूने होते ते संपवण्यासाठी भिंद्रानवालेला मोठे करणे सरकारला राजकीयदृष्ट्या आवश्यक व महत्त्वाचे वाटत होते. त्यामुळेच भिंद्रानवालेला अटक केल्यानंतर सोडून देण्यात आले होते. सरकारच्या या संधिसाधू राजकीय व राष्ट्रीयदृष्ट्या दिवाळखोर मुत्सद्दीपणाचा परिणाम आहे. आजचा पंजाबचा प्रश्न, जो सोडवण्यासाठी आजही 'राजकीय' तोडगाच काढावा लागेल. केवळ लष्कराला पाचारण करून संगिनीच्या जोरावर तो प्रश्न सुटणार नाही. आणि तरीदेखील सरकार 'लष्कर माध्यम' च प्रश्न सोडवण्यासाठी महत्त्वाचे मानते आणि म्हणून लष्कराला पाचारण करण्यावर सरकार भर देत आहे.

सामाजिक, राजकीय व आर्थिक विषयातील तज्ज्ञांच्या मते देशात अशांत परिस्थिती सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणामुळे व तिच्या अतिशय वाईट पद्धतीने झालेल्या अंमलबजावणीमुळे झालेली आहे. चुकीच्या धोरणामुळे विषमता निर्माण झाली, गरीबांचा मोठावर्ग असंतुष्ट झाला, आणि हा वर्ग कारण मिळाले की हिंसक मार्गाचा अवलंब करू लागला. त्याला दडपण्यासाठी सरकारला लष्कराला पाचारण करावे लागले. गुजरातमधील राखीव जागेच्या आंदोलनाच्या मुळाशी आर्थिक कारण आहे. सरकार रोजगार देण्यास असमर्थ आहे त्यामुळे आंदोलन आहे. या आंदोलनावर तोडगा मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र सरकार तसे न करता वारंवार लष्कराला पाचारण करून त्याच्या टाचेखाली हे आंदोलन दडपू पहात आहे. लष्कराचा अशा पद्धतीने सरकारने सुरू केलेला वापर अत्यंत धोकादायक आहे. कारण राजकीय व सामाजिक प्रश्नामुळे उफाळलेला असंतोष लष्कराच्या दमन नीतीमुळे फक्त दबला जातो. मुळात असंतोष ज्यामुळे निर्माण झाला तो प्रश्न सोडवला जात नाही आणि म्हणूनच सरकारने सतत राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक तोडगा काढावा, लष्कराला पाचारण करू नये. पण असे होत नाही. आता हेच पाहाना, अहमदाबादमध्ये लष्कराला वारंवार पाचारण करावे लागत आहे, कारण राखीव जागेबाबत सरकारने निवडणुकीवर डोळा ठेऊन घेतलेले निर्णय.

वास्तविक ज्या राणे आयोगाच्या शिफारशीवरून गुजरातच्या सोळंकी सरकारने १० जानेवारी १९८५ ला राखीव जागेच्या टक्केवारीत १०% वरून २८% वाढ केली तो राणे आयोगाचा अहवाल सरकारला ऑक्टोबर १९८३ मध्येच मिळाला होता. तेव्हा सरकारने त्यावर विचार केला नाही. मात्र १०–१–८५ ला आयोगाच्या शिफारशी सरकारने स्वीकारल्याची घोषणा केली. कारण मार्च ८५ मध्ये राज्य विधीमंडळाच्या निवडणुका होत्या. इतर पक्षानीदेखील सरकारच्या धोरणाला विरोध केला नाही. मग निवडणुकीनंतर विरोधी पक्षानी राखीव जागा विरोधी आंदोलन चालवणाऱ्या 'अखिल भारतीय नवरचना समिती'ला छुपा पाठिंबा दिला. ११ मार्चला कॉंग्रेस (आय) ला गुजरातमध्ये बहुमत प्राप्त झाले. पुन्हा सोळंकी सरकार सत्तेवर आले. राखीव जागा विरोधी आंदोलन तीव्र होते आहे, त्याचा फायदा विरोधी पक्षांना होतो आहे हे पाहून सरकारने कोलांटी उडी मारली व १६ मार्च ८५ ला सरकारने राखीव जागा वाढवण्याबाबतच्या निर्णयाची अंमलबजावणी पुढे ढकलण्यात आल्याची घोषणा केली व राखीव जागेबाबत घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्याचे आश्वासन आंदोलनकाराना दिले.

हे सर्व सविस्तर यासाठी सांगायचे की, गुजरातमधील हिंसाचार हा राजकीय स्वार्थासाठी घेतलेल्या निर्णयामुळे उफाळलेला आहे. तो शमवण्यासाठी राजकीय तोडगाच काढला पाहिजे. पण सरकार मात्र लष्कराच्या मदतीने व दमन नीतीने तो सोडवण्याचा प्रयत्न करत आहे, जे लष्करासाठी व भारतीय लोकशाहीसाठी अत्यंत धोकेदायक आहे.

विभाजनानंतर भारतात लष्कराचा वापर जम्मू व कश्मिरमध्ये

कायदा व सुव्यवस्थेसाठी झाला. त्यानंतर नागालँड, मिझोराम, मणिपूर, त्रिपुरात फुटीरवादी व दहशतवादी शक्तींचा मुकाबला करण्यासाठी लष्कराला पाचारण करण्यात आले तर दक्षिणेत भाषा प्रश्नावरून झालेल्या दंगलीच्या वेळी, पजाबी सुभ्याच्या प्रश्नावरून पजाब, हरियानात, नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी बगालमधे लष्कराचा वापर करण्यात आला. १९६६ मधे प्रथम जातीय दग्याला आवर घालण्यासाठी लष्कराला पाचारण करण्यात आले व त्यानंतर जमशेदपूर, मेरट, मोरादाबाद इत्यादी ठिकाणी लष्कराला पाचारण करण्यात आले. १९८० नतर आसाम, भिवंडी, हैद्राबाद, मुबई व आता अहमदाबाद, अमृतसर, चंदीगड व संपूर्ण पजाबात लष्कराच्याच जोरावर 'कायदा व सुव्यवस्था' ठेवली जात आहे. आध्रात एन. टी. रामारावला पदच्युत करण्याची केंद्र सरकारने केलेली चूक जर सरकारने दुरुस्त केली नसती तर संपूर्ण आध्रच लष्कराच्या ताब्यात देण्याची स्थिती निर्माण होण्याची शक्यता होती. थोडक्यात गेल्या चार वर्षात मोठ्या प्रमाणात १८ वेळेस कायदा व सुव्यवस्थेसाठी तर सहा वेळेस राष्ट्रविरोधी उठाव मोडून काढण्यासाठी लष्कराला पाचारण करण्यात आले.

लष्कराचा इतक्या मोठ्या प्रमाणात होणारा वापर बरोबर नाही. माजी लष्करप्रमुख जनरल जे. एन. चौधरीनी तर सरकारला सूचनावजा समज दिली होती की, 'लष्कराचा वापर अंतर्गत बाबीसाठी फारतर नैसर्गिक आपत्तीच्या वेळी व अंतर्गत मोठा धोका दूर करण्यासाठी कधीतरी करावा, कारण लष्कराचा नेहमी होणारा वापर हा धोकादायकच नाही तर लष्कराबद्दल लोकात असणारा आदर कमी करणारा आहे.' याचे उत्तम उदाहरण म्हणजे नागालँडमधील लोकाच्या लष्कराबद्दलच्या भावना. अमृतसरच्या सुवर्णमदिरात सैन्य घुसवण्याची बातमी नागालँडमधील लोकाना समजली तेव्हा त्यांना अतिशय वाईट वाटले. कोहिमाहून निघणाऱ्या 'ओकिंग टाइम्स' वृत्तपत्राने आपल्या अग्रलेखात पजाबातील लोकाबद्दल हळहळ व्यक्त केली. कारण नागालँडमधील लोकाना लष्कराने दिलेली वागणूक ताजी होती.

काही सवेदनाक्षम ठिकाणी, प्रामुख्याने धार्मिक, लष्कराचा वापर होऊच नये. ब्लू स्टार ऑपरेशननंतर काही शीख जवानानी केलेले बंड पाहता भारत सरकारने धार्मिक तणाव दूर करण्यासाठी, श्रद्धास्थानी लष्कराला पाचारण न करणे चागले. कारण भारतीय लष्करातील जवान भारतीय राष्ट्रासाठी तर लढतोच, त्या व्यतिरिक्त त्याच्या धर्मासाठीदेखील लढतो आणि म्हणूनच अतिम घाव करण्यापूर्वी तो स्वत.च्या धर्माचा जयजयकार करतो. उदाहरणार्थ, अंतिम घावाच्यावेळी गोरखा 'अयो गोरखाली' म्हणतो तर मराठा 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' म्हणतो, तर 'बजरग बली की जय' राजपूत म्हणतो तर 'बोले सो निहाल, सत् श्री अकाल' शीख म्हणतो. म्हणजे लष्कराला लढण्यासाठी आपण त्यांच्यातील धार्मिक तीव्रता कायम ठेवतो. तेव्हा तो फक्त राष्ट्र रक्षणार्थ लढत नाही तर धर्मरक्षणार्थदेखील लढतो आहे, ही जाणीव त्याच्यातील जोष द्विगुणीत व्हावा म्हणून आपण कायम ठेवतो; हे लक्षात घेऊन कमीत कमी लष्कराचा वापर आपण धार्मिक बाबीमुळे निर्माण झालेला तणाव दूर करण्यासाठी केला पाहिजे. अन्यथा जून ८४ मध्ये लष्करातील शीख जवानांनी केलेल्या बंडाची पुनरावृत्ती होईल.

भारतीय लष्करातील धार्मिक भावना ही काही नवीन बाब नाही, हे आपणास १८५७ च्या बडाचा दाखला देऊन सागता येईल. १८५७ ला तर फक्त काडतुसाला चरबी लावली होती व त्यामुळे ब्रिटिश सत्तेलाच भारतात हादरा बसला होता. ब्लू स्टार मधेतर त्यांच्या श्रद्धास्थानावरच आघात झाला होता. अर्थात बंड केलेल्या जवानाच्या कृतीचे समर्थन होऊच शकत नाही; पण कोणत्याही जाती धर्माच्या जवानांनी बड करू नये म्हणून त्याच्या भावनांना तडा जाईल, त्यावर आघात होईल अशी कृती लष्कराला करावयास लावू नये.

धार्मिक स्थळी लष्कर घुसवण्यापूर्वी अनेकदा त्यावर विचार व्हवा. त्याप्रमाणेच सीमावर्ती भागात लष्कराचा वापर होण्यापूर्वी प्रथम त्यावर गंभीरपणे विचार व्हावा. कारण देशाच्या दृष्टिकोनातून लष्कर जितके महत्त्वाचे आहे तितकेच सीमेलगतचे लोकदेखील महत्त्वाचे आहेत आणि म्हणूनच त्याच्या भावनांना जपणे अत्यत महत्त्वाचे आहे.

## कायदा–सुव्यवस्थेसाठी लष्कर ?

पंजाब, हा सीमावर्ती भाग आहे. तेथील लोकांना लष्कराबद्दल मोठ्या प्रमाणात सहानुभूती असणे आवश्यक आहे तरच लष्कराला दगाफटका होण्याची शक्यता नसते. आणि म्हणूनच देशाच्या संरक्षणाच्या दृष्टिकोनातून या भागात लष्कराचे जास्त दिवस वास्तव्य असू नये.

कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठी लष्कराचा सतत वापर होत गेला तर लष्करातील अधिकारी वर्ग व जवानदेखील वेगळा विचार करायला सुरुवात करतील. आपल्याच शक्तीवर नागरी, प्रशासन व सरकार उभे आहे असाही विचार लष्करात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. आणि असा विचार लष्करात बळावला तर त्याची पुढची पायरी सरकारच लष्कराने ताब्यात घेणे ही असते आणि असे होऊ शकते हे पाकिस्तान, बागलादेश व अनेक आफ्रिकन देशांच्या उदाहरणावरून आपणास कळाले आहे. लष्कराचा सतत वापर लष्कराचे अराजकीय स्वरूप सपवील, जो भारतीय लोकशाहीच्या दृष्टिकोनातून अत्यत वाईट बाब असेल. या सदर्भात निवृत्त सेनानी श्री. एस्. के. सिन्हा याचे मत अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याच्या मते 'तिसऱ्या जगात भारतीय सेना हीच एकमेव राजकारणापासून मुक्त असलेली सेना आहे. वाढत्या बेबदशाहीतील शिस्तीचे ते बेट आहे. भारतीय राष्ट्राला तिचा उपयोग झाला, होतो आहे हे अनेकदा सिद्ध झाले आहे; पण त्याचा वारवार कायदा व सुव्यवस्था यासाठी दीर्घकाळ उपयोग करून तिचा उच्च दर्जा व तिचे अराजकीय स्वरूप याना बाधा पोहचू नये.' कारण भारतीय लोकशाहीतील ती एकमेव संस्था आहे, जी प्रादेशिक, भाषिक या सकुचित विचारापासून दूर आहे. भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेचे ते एक जिवत व कार्यक्षम प्रतिक आहे आणि म्हणूनच भ्रष्ट, संधीसाधू, राजकीय नेत्याच्या स्वार्थासाठी त्याला वारवार बऱ्याकमधून बाहेर काढू नये. राजकीय नेत्यांनी सत्तासपादनासाठी केलेली घाण काढण्यासाठी तिचा वापर होऊ नये.

लष्कराचा सतत वापर संरक्षणाच्या दृष्टिकोनातूनदेखील बरोबर नाही. १९४७ मध्ये पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले. कारण त्यावेळी मोठ्या प्रमाणात भारतीय सैन्य उत्तर हिंदुस्थानात दंगली शमविण्यासाठी गुंतलेले होते. पाकिस्तानचा असा कयास होता की, भारत सैन्याची जमवाजमव करेपर्यंत कश्मिर सहज जिंकता येईल आणि म्हणूनच पाकने कश्मिरवर आक्रमण केले होते.

लष्कराचा सतत वापर लष्कराचा प्रभाव कमी करू शकतो. त्याचे अराजकीय स्वरूप नाहीसे करू शकतो. लष्कराचे कायदा व सुव्यवस्थेसाठी जास्त दिवस वास्तव्य लष्कराच्या शिस्तीवर, त्यांच्या प्रशिक्षणावर विपरीत परिणाम करू शकते आणि यामुळे लष्करावर होणारा कामाचा ताण त्यांच्यावर वाईट परिणाम करू शकतो यामुळेच लष्कराचा वारंवार होणारा वापर थांबला पाहिजे.

१९६२ मध्ये एका लढाऊ डिविजनचा उपयोग बिगर लष्करी कामासाठी करण्यात आला. परिणामतः त्याच वेळी जेव्हा चीनचे आक्रमण झाले तेव्हा नेफा (NEFA) त ही लढाऊ डीविजन चीनचा मुकाबला करू शकली नाही, हे उदाहरण लष्कराचे बिगर लष्करी काम किती धोकादायक आहे हे सांगण्यास पुरे आहे.

लष्कराचा वारंवार वापर फक्त लष्कराच्या दृष्टिकोनातूनच वाईट नाही तर लोकशाहीच्या व नागरी स्वातंत्र्याच्या दृष्टिकोनातूनदेखील वाईट आहे कारण लष्कराचे एखाद्या भागातील दीर्घकालीन वास्तव्य त्या भागातील लोकांचे स्वातंत्र्य संपवणारे असते. पोलीस कारवाईची किंवा त्यांच्या कृतीची चर्चा होऊ शकते. त्यांच्या कृतीची न्यायालयीन चौकशी व्हावी अशी मागणी करता येते. मात्र लष्कराच्या कृतीची चर्चा व त्यांनी केलेल्या अन्यायाची न्यायालयीन चौकशी होऊ शकत नाही. परिणामतः व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होतो व लष्कराची उपस्थिती असलेला भाग, लष्करी राजवट, काही वर्षासाठी का होईना, अनुभवात असतो. तेथे लोकशाही जीवन प्रणाली संपलेली असते आणि म्हणूनच लष्कराचे जास्त दिवस वास्तव्य लोकशाहीसाठी व स्वातंत्र्यासाठी देशातील कोणत्याही भागात असू नये.

नीतिधैर्य खचलेली पोलीस यंत्रणा बिघडलेल्या परिस्थितीला उपयोगी नाही; पण लष्कराचा वारंवार होणारा वापरही बरोबर नाही. यावर उपाय म्हणून भारतात काही निमलष्करी संघटना तयार करण्यात आल्या आहेत, ज्या लष्करावरचा ताण कमी करतील. १९६५ मध्ये 'बार्डर सेक्युरिटी फोर्स' ची कल्पना जनरल चौधरींनी लष्करावरचा ताण कमी करण्यासाठी मांडली. सुरुवातीला (बी. एस. एफ) बॉर्डर सेक्युरिटी फोर्सजवळ २५ बटालियन्स होत्या. आज ८० आहेत. ही निमलष्करी संघटना पंजाबात फारशी यशस्वी होऊ शकली नाही. अशाच प्रकारची 'इंडो–तिबेट बॉर्डर पोलीस' ही निमलष्करी संघटना आहे. या संघटनेवर पंतप्रधानांच्या रक्षणाची जबाबदारी होती. ज्यामध्ये ती पूर्णतः अयशस्वी ठरली. आता पुन्हा दहशतवादाला निपटून काढण्यासाठी 'नॅशनल सेक्युरिटी गार्डस्' अशा प्रकारची नवीन यंत्रणा तयार करण्याचा विचार चालू आहे. या व्यतिरिक्त काहींच्या मते नवीन यंत्रणा काढण्यापेक्षा राज्यराखीव दले, केंद्र राखीव दल यांनाच कोणत्याही दहशतवादाला निपटून काढू शकतील असे प्रशिक्षण द्यावे व एक प्रभावी निमलष्करी यंत्रणा उभी करावी.

थोडक्यात लष्करावरचा ताण कमी करण्यासाठी, त्यांच्यातील लढाऊपणा कायम ठेवण्यासाठी त्यांचा बिगर लष्करी कामासाठी उपयोग थांबला पाहिजे. त्याचबरोबर त्यांचे (लष्कराचे) अराजकीय स्वरूप कायम ठेवण्यासाठी त्यांचा वारंवार वापर थांबला पाहिजे. कारण लष्कराचा वारंवार व दीर्घकालीन वापर त्यांच्या अराजकीय स्वरूपावर परिणाम करत असतो. आणि एकदा का लष्कराचे अराजकीय स्वरूप संपले की, कसल्या प्रकारची शासनपद्धती येते हे आपल्या शेजारी राष्ट्रात आपण पाहात आहोत आणि म्हणूनच भारतीय लष्कराचे अराजकीय स्वरूप कायम ठेवणे आवश्यक आहे; पण त्यासाठी पूर्व अट आहे लष्कराचा सर्रास, वारंवार व एखाद्या भागात लष्कराचे दीर्घकालीन वास्तव्य थांबविण्याची.

---


डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला 'माणूस' केले. मनुष्यात 'ईश्वरी' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.

म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

# चार्ल्स डार्विन

**व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती**

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार विवेचनासह प्रकाशित झालेली पहिली आवृत्ती.


**किंमत : रुपये बत्तीस**

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ३०.

# मानस प्रतिमांची छायाचित्रे



● प्रा. व. वि. अकोलकर ●

मनश्चक्षूंपुढे आलेल्या प्रतिमा, तसेच माणसाचे विचार चर्मचक्षूंना न दिसणारे आकार घेत असतील काय? साध्या डोळ्यांना आदृश्य असले तरी काहीएक रूप विचारांना असते काय? माणसाच्या मनापुढे असलेल्या प्रतिमा (mental images) व त्याच्या मनातील विचारांचे ज्ञान काही जणांना होऊ शकते असे आपण ऐकतो. परंतु विज्ञाननिष्ठेच्या आजच्या काळात, वरील प्रश्नाचे उत्तर कॅमेराचे साहाय्याने ठरवता आले पाहिजे असे वाटणे साहजिक आहे. जर मनात आलेल्या विचारांचा कॅमेऱ्यातील फिल्मवर / काचेवर काही परिणाम होऊ शकतो असे दिसून आले तर विचार हा उर्जात्मक असतो, किंवा उर्जा प्रक्षेपित करू शकतो ह्या कल्पनेस आधार मिळेल. जर मानसप्रतिमा कॅमेऱ्यातील फिल्मवर येऊ शकत असतील तर त्यांच्या ठायी भौतिक परिणामकारकत्व असते असे म्हणावे लागेल. क्षणखीही एकदोन गोष्टी होतील. जर मंत्रयोग्यांच्या दृष्टीस 'दिसणाऱ्या' ऋषिमंडळींची छायाचित्रे कॅमेरा टिपू शकला तर अशा अनेक चित्रांमध्ये साम्य आढळते काय हे पहाता येईल व त्या मानसप्रतिमा केवळ व्यक्तीसापेक्ष असतात, की ती खरोखरीची 'दर्शने' असतात, ह्या प्रश्नावर प्रकाश पडेल. दुसरी एक गोष्ट म्हणजे 'मृतात्म्यांच्या छायाचित्रां' विषयी. तथाकथित, 'मृतात्म्यांची छायाचित्रे' परदेशात प्रसिद्ध झालेली आहेत. कै. विष्णुपंत क्षीरसागर (नाशिक) यांनीही त्यांच्या 'परलोकविद्या' या पुस्तकात त्यांच्या बैठकांचे वेळी आलेली समर्थ रामदास, रामकृष्ण परमहंस स्वत च्या मातुःश्री इत्यादींची छायाचित्रे प्रकाशित केली आहेत. अशी छायाचित्रे त्या वेळी दिवंगतांनी खरोखरीच देहरूप धारण केल्यामुळे आलेली असतात की, त्यावेळी उपस्थित असलेल्यांच्या मनश्चक्षूपुढे आलेल्या त्या दिवंगतांच्या प्रतिमांची असू शकतील हा प्रश्न निर्माण होईल. ही पर्यायी उपपत्ती अपुरी ठरत असेल अशीच 'मृतात्म्यांची छायाचित्रे' मरणोत्तर अस्तित्वाविषयीच्या प्रश्नाच्या संदर्भात विचारार्ह म्हणून शिल्लक राहातील.

वर उपस्थित केलेल्या प्रश्नास होकारार्थी उत्तर म्हणून मानता येईल असा प्रयोगसिद्ध पुरावा नमूद आहे.

### विचारमूलक छायाचित्र (Thoughtography) जपानमधील प्रयोग

जपानमध्ये १९१०–१६ या कालावधीत टोकीयो विद्यापीठातील मानसशास्त्रज्ञ प्रा. टी. फुकुराइ यांच्या आढळात अतिंद्रियदर्शनक्षमता (क्लेअरवॉयन्स) असलेल्या काही 'माध्यम' व्यक्ती (mediums) आल्या व त्यांच्या ते चाचण्या घेत होते. श्रीमती नागाओ ही त्यांपैकी एक. प्रा. फुकुराइ एक दिवस तिला म्हणाले, 'कॅमेऱ्यातील फोटोफिल्मवर मानसप्रतिमा (images) आणण्याचा मी प्रयत्न करतो. त्या प्रतिमा तुमच्या अतिंद्रिय दृष्टीस दिसतात काय ते पहा.' तिने त्या वर्णन केल्या जेव्हा ती फिल्म धुतली तेव्हा ती एक्स्पोज झाल्याप्रमाणे काळी पडली होती असे आढळले. नागाओ हिने त्या फिल्मवर मन केंद्रित केल्याचा तो परिणाम असावा असे फुकुराइंना वाटले. त्यानंतर त्यानी कॅमेरा न वापरता तिच्यावर प्रयोग केले. काळ्या कागदी वेष्टनात पक्क्या लपेटून व सीलबंद करून फोटो-काचा तिच्या हाती दिल्या व त्यावर वर्तुळ, फुली किंवा अमुक अक्षरे आणवून दाखव असे तिला सांगितले. नागाओ त्या काचेवर ध्यान लावत असे, व ती ती आकृती किंवा अक्षरे उमटल्याचे दिसून येऊ लागले. काही प्रयोगांत तर फुकुराइंनी एकाच काळ्या कागदी वेष्टनात तीन काचा घालून तिच्या हाती दिल्या व त्यांपैकी मधल्या काचेवर आकृती किंवा अक्षर उमटवून दाखव असे तिला सांगितले. तोही प्रयोग यशस्वी झाला ह्या प्रयोगांचा इंग्रजी भाषेतील अहवाल फुकुराइंनी १९३१ मध्ये Clairvoyance and Thoughtography ह्या ग्रंथरूपाने प्रसिद्ध केला आहे.

### Ted Serios वरील अमेरिकेतील प्रयोग

शिकागो येथील टेड सिरिऑस ह्या इसमाने १९६० च्या सुमारास नामवंत संशोधकांचे लक्ष वेधून घेतले. कोठे तरी दूर स्थळी





**सिरिऑस–योहानेस**

असलेल्या इमारतींची तसेच वस्तूंची चित्रे त्याने 'पोलराइड' कॅमेऱ्यातील फिलमवर आणवून दाखवली आहेत. पोलराइड कॅमेऱ्यातून फिल्म बाहेर ओढल्यावर केवळ १० सेकंदात तेथल्या तेथेच ती डेव्हलप होते व प्रिंट तयार होतो. त्यामुळे लबाडीचा संशय घेण्यास वावच नसतो.

१९१८ मध्ये जन्मलेल्या टेड सिरिऑसचे शिक्षण आठव्या इयत्तेपर्यंतच झाले. १९३२ च्या जागतिक मंदीच्या काळात त्याने जी मिळतील ती कामे केली. १९३९–४५ च्या महायुद्धात तो सैन्यात असताना जायबंदी झाला व पुढे त्याची प्रकृतीही खालावत गेली. १९५३ साली त्याची व योहानेस नावाच्या संमोहकाची – हिप्नॉटिस्टची – गाठ पडली. योहानेस हा अटलांटिक महासमुद्रात पूर्वी बुडालेल्या स्पॅनिश जहाजाचा व त्यावरील खजिन्याचा शोध घेऊ पहात होता. त्याने सिरिऑसला संमोहित करून 'त्या काळात' नेले. जेव्हा सिरिऑसच्या तोंडून 'मी ती जागा शोधतो आहे' असे आले तेव्हा योहानेसने त्याला संमोहन–सूचना (सजेशन) दिली की,


'त्या जागेचा सायकिक फोटो तू घेऊ शकशील' आणि त्याच्यावर कॅमेरा रोखला. दोघांनाही अपरिचित अशा ठिकाणांची काही चित्रे आतील फिलमवर उमटल्याचे आढळले. तेव्हापासून सिरिऑसला संमोहित अवस्थेत नेऊन व त्याच्यावर कॅमेरा रोखून सुमारे तीनशे फोटो काढण्यात आले.

परंतु त्यानंतर सिरिऑस स्वतःवर उपचार करून घेण्यासाठी म्हणून एका संमोहन चिकित्सा करणाऱ्याकडे गेला असता, त्या संमोहकाने त्याच्या मनात अशी समजूत पेरली की, 'पूर्वीचे ते फोटो वगैरे सारा प्रकार फसवणुकीचा होता.' त्यामुळे सिरिऑस त्याच्या आईस व भावास तसेच सांगू लागला. कालांतराने मात्र, संमोहित अवस्थेत करून दिलेल्या त्या समजुतीचा प्रभाव ओसरला. अशी काही तरी क्षमता स्वतःच्या ठिकाणी आहे या कल्पनेने त्याच्या मनात पुन्हा उचल खाल्ली. 'इंटरनॅशनल गिल्ड ऑफ हिप्नॉटिस्टस्'चे श्री. स्टॅनले मिचेल यांचेकडून त्याला १९६१ मध्ये प्रोत्साहन मिळाले आणि १९६२ मध्ये शिकागो येथे श्री. डेविड टेक्टर (इलिनॉय सोसायटी फॉर सायकिकल रिसर्च), श्रीमती पॉलाइन ऑक्लर ( ochler ) आणि इतरजणांच्या समक्ष, मुद्दाम पोलराइड कॅमेरा वापरून प्रयोग सुरू झाले


स्वतःचा उजवा हात कॅमेऱ्याच्या भिगाजवळ नेला तर प्रकाश अटतो म्हणून सिरिऑस ७/८ इंच लांबीची व ३/४ इंच व्यासाची कागदी पुंगळी ('gismo') भिंगावर टेकवू लागला व तसे करण्याची त्याला सवयच जडली. जेव्हा तो कॅमेऱ्यातील फिलमवर प्रतिमा आणण्याचा प्रयत्न करी तेव्हा त्याचे डोळे लाल व चेहऱ्यावरील आणि शरीराचे स्नायू तंग होत.


एका प्रयोगात, खुर्चीवर बसलेल्या सिरिऑसच्या हातात E–11 ला फोकस केलेला पोलराइड कॅमेरा देण्यात आला. कॅमेऱ्यामध्ये प्रयोगकर्त्यांनी स्वतः विकत आणलेली फिल्म भरली होती व तिच्यावर उपस्थित मंडळींचे एक छायाचित्रही घेतले होते. १५० वॅटचे तीन दिवेही लावलेले होते. खुर्चीमागील भिंतीवर काही एक नव्हते सिरिऑसने हातातील कॅमेरा स्वतःच्या धडावर रोखला. प्रथम त्याच्या शर्ट व नेकटायचे छायाचित्र आले. नंतरच्या छायाचित्रात मात्र एका इमारतीचा काही भाग आला.

१९६२ च्या जानेवारीत भारताचा नकाशा सिरिऑसच्या पाहण्यात आला होता. त्या महिन्यात, श्री. स्टॅनले मिचेल यांच्या समक्ष, त्याने स्वतःच्या मस्तकावर रोखलेल्या पोलराइड कॅमेऱ्यातील फिलमवर पुढील चित्रे आली. तपासांती फत्तेपूर शिक्रीचे प्रवेशद्वार आणि लाल किल्ल्याचा प्रवेशमार्ग यांच्याशी ती चित्रे जुळतात असे आढळले.



□ **प्रयोग करताना सिरिऑस** □






फत्तेपूर–शिक्रीचे प्रवेशद्वार आणि मानसप्रतिमा

## डॉ. आइझेनबुड यांनी घेतलेल्या सिरिऑसच्या चाचण्या

डॉ. यूल आयझेनबुड (डेन्वर, कोलोरॅडो, अमेरिका) एक विख्यात मनोविश्लेषक–सायको अॅनॅलिस्ट असून परामानसशास्त्राच्या क्षेत्रातही प्रसिद्ध आहेत. त्यांनी १९६३ ते १९६७ दरम्यान टि. व्ही. कॅमेरा वापरून सिरिऑसवर अनेक प्रयोग केले व The World of Ted Serios (१९६७) हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. Journal ASPR (जुलै १९६७) व बी. बी. वोलमन संपादित Handbook of Parapsychology (१९७७) मध्येही त्यांनी त्यांच्या प्रयोगांविषयी लिहिले आहे.

काही वेळा सिरिऑसचा चेहरा फोटोत येण्याऐवजी, प्रथम एक अस्पष्ट आकृती, नंतर जराशी स्पष्ट आकृती, नंतर अधिक स्पष्ट आकृती अशी चित्रे आली. काही वेळा, 'अमुकअमुक इमारतीचे चित्र आणव' असे डॉ. आयझेनबुडनी त्याला अगदी आयत्यावेळी सुचवले. नेमक्या त्या इमारतीचे चित्र आले नाही; परंतु आलेली चित्रे मात्र घरांची व छपरांची होती. एका चाचणीचे वेळी त्याच्या संपूर्ण शरीरावर रबरी घट्ट पोशाख चढवल्यानंतर त्याच्या हातात धातूच्या डबीत सीलबंद असलेली फिल्म देण्यात आली. त्या फिल्मवरही चित्र आले. शर्यतीच्या मोटारी व विमाने त्याला विशेष आवडत, त्यांची चित्रे काही वेळा आली. एकदा त्याला 'फॅरडे पिंजऱ्यात' बसवले व त्या बाहेर असलेल्या माणसाचे हातात कॅमेरा दिला. तेव्हाही काही चित्रे उमटली.





दिल्ली लाल किल्ल्याचे द्वार

□

डॉ. आयान स्टीवन्सन व डॉ. गेथर प्रॅट यांनी पोलराइड कॅमेऱ्याच्या साहाय्याने सिरिऑसच्या वर्जिनिआ विद्यापीठात चाचण्या घेतल्या. दरवेळी त्यांनी स्वतः विकत आणलेली नवी कोरी फिल्म कॅमेऱ्यात भरली होती. तसेच दरवेळी स्वतः २ इंच लांब व १ इंच व्यासाची नवी पुंगळी (gismo) बनवून सिरिऑसच्या हाती दिली होती. पुंगळीत एखादी मायक्रोफिल्म सिरिऑसने ठेवून देण्याचा संभवच नव्हता. कारण काही पुंगळ्यांचे एक तोंड सेलोफेन टेपने बंद केलेले होते. कॅमेरा प्रत्येक वेळी डॉ. स्टीवन्सनच्या किंवा डॉ. प्रॅटच्या हातात होता. सिरिऑसच्या पाठीमागील भिंतीवर एक चित्र होते. ह्या प्रयोगांमध्ये काही फिल्मवर त्याचा चेहरा व काहींवर अर्धवट चेहरा व भिंतीचा भाग आला. काही फिल्म अगदी काळ्या निघाल्या. तथापि एकूण २७ वेळा मात्र अनपेक्षित चित्रे–abnormal prints आली. १० सेकंदात प्रिंट तयार झाल्याबरोबर त्यावर स्टीवन्सन व प्रॅट सह्या करून ठेवीत व त्यांनी भरलेल्या फिल्मचाच बॅच नंबर त्या प्रिंटवर असल्याची खात्री करून घेत.

एकदा स्टीवन्सन यांनी सिरिऑसच्या नकळत वर्जिनिआ विद्यापीठाच्या मध्यवर्ती इमारतीचे–Rotunda चे छापील चित्र घेऊन ते स्वतःच्या ताब्यात ठेवून दिले व 'मी जे कोणते चित्र निवडले आहे ते कॅमेऱ्यातील फिल्मवर आणून दाखव' असे त्याला म्हटले.




**डॉ. यूल आयझनबुड**

□

एकूण ६ फोटोंमध्ये स्तंभासारख्या शुभ्र रेषा, त्यांच्यामागे वस्तू आणि प्रयोग खोलीचा काही भाग अशी चित्रे आली. त्यापैकी हे एक :

एके दिवशी सिरिऑस म्हणाला, 'थॉमस जेफर्सनच्या लिहिण्याच्या मेजाची प्रतिमा मी फिल्मवर आणणार.' त्या घराचे चित्र हॉटेलातील त्याच्या खोलीत त्याने पाहिलेले होते. त्या दिवशीच्या प्रयोगात एका फिल्मवर आलेली प्रतिमा व जेफर्सनच्या अभ्यासिकेचा घेतलेला फोटो पहा :(पृष्ठ १७)




**डॉ. प्रॅट**

डॉ. स्टिवन्सन व प्रॅट यांनी छापील चित्रात मेजावरील कागद व क्विल्स (पिसांच्या लेखण्या) जशा ठेवलेल्या आहेत त्यापेक्षा निराळ्या स्थितीत कॅमेऱ्यातील फिल्मवर आल्या. अर्थात सिरिऑसने त्या अभ्यासिकेच्या छापील चित्राची मायक्रोफिल्म त्याच्या कागदी पुंगळीत घातली असेल ह्या शंकेस वाव नाही. (संदर्भ : जर्नल, अमे. सोसा. सायकिकल रिसर्च, एप्रिल १९६८)

## जादूगारांचे वक्तव्य

१९६७ मध्ये डॉ. आयझेनबुडनी केलेल्या प्रयोगांचे वेळी जादूगार श्री. पर्सी डायाकोनिकस दुसऱ्या एका जादूगारासह हजर होते. सिरिऑसची झडती घेण्याजोगे काही घडले असले पाहिजे असा त्यावेळी त्यानी दावा केला नाही. ११ वर्षानंतर १९७८ मध्ये science ह्या नियतकालिकाच्या जुलै अंकात त्यांनी लिहिले की, सिरिऑसने त्याच्या कागदी पुंगळीची (gismo) हातचलाखी करून वासलात लावली असली पाहिजे. एखाद्या स्त्रीने स्वतःवर बलात्कार झाल्याचा ओरडा ११ वर्षांनी करावा असाच हा प्रकार होय असे आयझेनबुडनी म्हटले. त्यांनी पाठवलेला प्रत्युत्तरात्मक लेख science ने छापला नाही. तो लेख १९७९ मार्चमध्ये जर्नल ऑफ पॅरासायकॉलॉजीत प्रसिद्ध करण्यात आला आहे. प्रयोगकर्त्याच्या हाती पोलराइड कॅमेरा, त्यात त्यानेच घातलेली नवी कोरी फिल्म, त्याने स्वतः बनवून दिलेली छोटी पुंगळी अशा प्रयोगस्थितीमध्ये जादूगारांनी प्रयोगकर्त्यांची नजर चुकवून व मायक्रोफिल्म वापरून कॅमेऱ्यातील फिल्मवर फोटो आणवून दाखवावा असे आव्हान डॉ. आयझेनबुडनी दिले. परंतु १९७७ पर्यंत तरी कोणीही जादूगार किंवा टीकाकार ते स्वीकारण्यास तयार झाला नाही. सिरिऑसने प्रात्यक्षिके दिली त्या २० वर्षांच्या कालावधीत त्याला लबाडी करताना पाहिल्याचे एकाही जादूगाराने म्हटलेले नाही.





**डॉ. स्टिवन्सन**

रेनॉल्डस व आयझेन ट्राथ यांनी Popular Photography खंड ६१ (१९६७) मध्ये, फ्लॅशलाईटच्या भिंगास मायक्रोफिल्म चिकटवून, अथवा ते भिंग व मायक्रोफिल्म कागदी पुंगळीत ठेवून फोटो येऊ शकतो हे दाखवले आहे. परंतु जी जी दक्षता बाळगून सिरिऑसवर प्रयोग करण्यात आले ती ती दक्षता बाळगली असताना तसे फोटो आल्याचा दावा या लेखकांनी मुळीच केलेला नाही.

## विली श्वानहोल्झ वरील प्रयोग

सिरिऑसशी ह्या गृहस्थाचा परिचय करून देण्यात आला, कारण स्वतःच्या टेपरेकॉर्डवर काही विचित्र आवाज ध्वनिमुद्रित होत व नंतर कसे कोण जाणे पुसलेही जात असे हा गृहस्थ सांगे. पोलराइड कॅमेऱ्यावर तो काही प्रतिमा आणवू शकतो काय हे पहाण्यासाठी सिरिऑसने प्रयोग करून पाहिला त्यावेळी काही अपरिचित अशा व्यक्तींची व स्थळांची चित्रे आली. म्हणून सिरिऑसने त्याची डॉ. आइझेनबुड यांच्याशी गाठ घालून दिली व चाचण्या सुरू झाल्या. एका प्रयोगाचे वेळी एक पदार्थ वैज्ञानिक, एक मानसशास्त्र–प्राध्यापिका, एक मनोवैद्य, इत्यादी मंडळी हजर होती त्या वेळी प्रयोगकर्त्यांनी स्वतःच्या दोन पोलराइड कॅमेऱ्यांमध्ये स्वतः खरेदी केलेल्या फिल्म भरल्या होत्या. एक कॅमेरा सिरिऑसने व दुसरा विलीने हातात घेतला. सिरिऑस प्राध्यापिकेस म्हणाला, 'मनश्चक्षूंपुढे काही आणा बरे.' बाईंनी मनातल्या मनात टोकदार कान असलेल्या त्यांच्या मांजराचे चित्र आणले. सिरिऑस म्हणाला, 'पिरॅमिडची आकृती माझ्या डोळ्यासमोर येतेय !' त्याने कॅमेरा स्वतःवर रोखला. तेवढ्यात 'मीही प्रयत्न करून पहातो' असे म्हणून विलीने स्वतःच्या हातातला कॅमेरा चालवला. फिल्म बाहेर





जेफर्सनच्या अभ्यासिकेचा घेतलेला फोटो

ओढल्याबरोबर त्याने ती मागून घेतली व अर्धा मिनिटपर्यंत स्वतःच्या कपाळावर दाबून धरली. त्या प्रिंटवर पिरॅमिडसारखी छोटी आकृती दिसून आली.

ह्या लेखाच्या आरंभी म्हटल्याप्रमाणे, 'मृतात्म्यांच्या छायाचित्रां'च्या बाबतीत 'मानस छायाचित्रे'– ( सायकिक फोटोग्राफ्स अथवा थॉटोग्राफ्स ) ही पर्यायी उपपत्ती विचारात घ्यावी लागते. ह्या पर्यायी उपपत्तीस वाव नाही, अशी 'मृतात्म्यांची छायाचित्रे' जर असतील तर मरणोत्तर अस्तित्वाचा पुरावा ह्या नात्याने अशी छायाचित्रेच विचारार्ह ठरतील. त्यांची विचारार्हता वाढेल असे आणखी एक संशोधनक्षेत्रही आहे. ते म्हणजे व्यक्तीचे पार्थिव शरीर नाश पावल्यावर व्यक्तित्वाचा काही अंश शिल्लक राहत असणे ( Survival ) संभवनीय आहे की नाही, या प्रश्नाचा पाठपुरावा म्हणून गेल्या काही वर्षांत, देह–बाह्य अवस्थांच्या अनुभवांचा ( Out–of–Body Experiences होत असलेला अभ्यास, आणि देहबाह्य अवस्था विषयक प्रयोग.

डॉ. आयझेनबड, डॉ. प्रॅट व डॉ. स्टीवन्सन यांनी केलेले सिरिऑसवरील प्रयोग त्यांच्यासारखीच क्षमता असल्याचा दावा करणाऱ्या कोणी व्यक्ती असतील तर त्यांच्यावरही करून पहावयास हवेत. किंवा सामान्य व्यक्तींवर देखील त्यांना संमोहित करून व 'कॅमेऱ्यातील फिल्मवर आता तुम्हाला परिणाम घडवून आणता येईल' असे संमोहनसूचन करून देखील या प्रकारचे प्रयोग करून पहाता येतील. सिरिऑस सारख्यांच्या लहरी सांभाळूनच प्रयोग करावे लागतात त्याला इलाज नाही. परंतु अमुकच प्रकारचा कॅमेरा, कॅमेऱ्याच्या भिंगावर टेकवलेली पुंगळी, इत्यादीसारख्या गोष्टी टाळून जर प्रयोग करता आले तर ते अधिक इष्ट होय. कारण त्यामुळे, हातचलाखी किंवा फसवणुकीची शंका घेण्यास वाव राहणार नाही.

सिरिऑसवरील हे प्रयोग म्हणजे 'स्थिर वस्तूंवर मनाचा प्रभाव'–सायकोकायनेसिस ऑन स्टॅटिक आब्जेक्टस याविषयीच्या प्रयोगाच्या दिशेने टाकलेले, व घरंगळणाऱ्या फाशांसारख्या गतिमान वस्तूंवर जे प्रयोग झाले आहेत त्यांच्यापुढे टाकलेले पाऊल होय असे डॉ. जे. बी. ऱ्हाइन यांनी म्हटले आहे तथापि हे प्रयोग आणखीही एका दृष्टीने महत्त्वाचे आहेत असे मला वाटते जर मनश्चक्षूसमोर येणारी प्रतिमा ( image ) कॅमेऱ्यातील फिल्मवर उमटत असेल तर व्यक्तीचे विचार व त्यांच्याशी संबंधित अशी मानसचित्रे आपल्या साध्या डोळ्यांना न दिसणारे असे भौतिक आकार घेत असतील काय, हा प्रश्नही विचारता येईल. या प्रश्नाचे जर कधी काळी होकारार्थी उत्तर निष्पन्न झाले तर व्यक्तीवर परिणाम करणाऱ्या वातावरणीय घटकांमध्ये इतरांनी मनातल्या मनात आणलेल्या सुष्ट–दुष्ट विचारांचाही समावेश करावा लागेल.

□

# पुस्तके

## 'स्वरमयी'

### स्वरप्रभेची आनंदगाथा

**स्व**रांची वीणा नजाकतीने छेडणाऱ्या अंगुलींना शब्दांचीही वीणा त्याच नजाकतीने छेडता येईलच असं नाही. किंबहुना ही किमया जमणं जरा मुश्किलच. 'स्वरमयी' हे पुस्तक वाचलं आणि जाणवलं की या सिद्धकंठ गायिकेला स्वरलालित्याबरोबरच शब्दलालित्याचेही वरदान शारदेनं मुक्तहस्तानं दिलेलं आहे. स्वरात रमलेल्या गायकाला किंवा वादकाला आपल्या स्वरविलासाचा आणि स्वरप्रवासाचा आलेख नेमकेपणाने आणि अलिप्तपणाने रेखाटणे जमतेच असे नाही; पण प्रभा अत्रे यांचे 'स्वरमयी' हे पुस्तक वाचताना त्यांनी ही अवघड कामगिरी लीलेने पार पाडली आहे हे जाणवते.

या पुस्तकात प्रभाताईंच्या सांगीतिक जीवनावर ज्यांच्या गायनाचा खोल ठसा उमटला अशा चार व्यक्तींची सुरेख नादचित्रे आहेत. सुरेशबाबू, हिराबाई, बडेगुलाम अलीखां आणि अमीरखां यांची ही व्यक्तिचित्रे म्हणजे ललितलेखांचा उत्तम नमुनाच आहेत त्यातल्या त्यात सुरेशबाबूंचे व्यक्तिचित्र अप्रतिम उतरले आहे. सुरेशबाबू माने हे जितके थोर गायक होते तितकेच, किंबहुना काकणभर जास्तच असे थोर शिक्षकही होते. हे या लेखावरून लक्षात येते आदर्श गुरू आपल्या शिष्याला कोणत्याही साच्यात बंदिवान न करता त्याला गगनभरारी घेण्यासाठी आवश्यक ती शक्ती त्याच्या पंखांना देतो हेच मनावर ठसते. 'त्यांच्या

शिकविण्यात पाठीमागून चालणं नव्हतं, शिष्यानं समातर चालण्याचा आग्रह होता' अशा सुदर वाक्यात प्रभाताईंनी त्याच्या शिकविण्याच वर्णन केल आहे. रागदारी शिकवीत असतानाच शिष्याला चित्रपट-संगीत, नाट्यसंगीत, ठुमरी इत्यादी अन्य संगीत प्रकारातीलही सौंदर्यस्थळे दाखवून त्याचेही रसग्रहण करायला लावून, शिष्याला स्वरश्रीमंत करणारा बाबूरावांच्यासारखा गुरू लाभणे हे प्रभाताईंचे भाग्यच म्हणावे लागेल. एखाद्या रागातले नीरस पलटे महिनेन्‌महिने घोकायला लावून संगीताच्या रसाळ बागेला लाकडे फोडणाऱ्या वखारीची कळा आणणाऱ्या आजच्या तथाकथित गुरूंना या लेखावरून बरेच काही शिकण्यासारखे आहे.

हिराबाई-मोठया आई हा लेख तर प्रेमपूर्ण भक्तीन चिब भिजलेला आहे. हिराबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलू या लेखात तेजाळून गेले आहेत. हिराबाईंच्या षड्जाचं वर्णन करताना 'पौर्णिमेच्या चंद्राच तेज असलेला षड्ज' असं त्या सहजपणे लिहून जातात आणि त्या तेजाची सुखद शीतलता वाचकाच्या मनापर्यंत पोहोचवितात.

खासाहेब बडेगुलामअलीखा याच्या आवाजाचं वर्णन केल्यानतर 'अशा कलाकाराकडून रियाज कसा करावा, हा गुरुमंत्र घेता आला तर कलासाधनेतील किती तरी अपघात टळतील' असे मोठे अर्थपूर्ण वाक्य त्या लिहून जातात.

खांसाहेब अमीरखां याच्या गाण्याच अतिशय समर्पक आणि सुरेख वर्णन प्रभाताईंनी केल आहे. त्याचबरोबर त्यांच्या गाण्याचा आपल्यावर प्रभाव कसा पडला हेही त्यांनी मोकळेपणान कबूल केल आहे. 'गुरू नव्हे पण गुरू समान' असं प्रांजलपणे त्यानी सांगितल आहे. मात्र 'त्यांनी तराण्याला अर्थ दिला होता, भाव दिला होता.' एवढच लिहून त्या थाबल्या आहेत. प्रभाताईंसारख्या विचारवंताकडून याविषयी विवेचनाची अपेक्षा होती. शब्दार्थ आणि भावार्थाची चौकट मोडून निरर्थक शब्दाच्या सहाय्याने केवळ स्वरांचीच आकृती निर्माण करून मुक्त स्वरानद देणं यासाठी तराणा निर्माण झाला. मौखिक संगीतातला हा Abstract form. वाद्यसंगीताचा हेवा करीत त्याच्या जवळ जाणारा. त्या तराण्याला अर्थ आहे अस म्हणणे म्हणजे स्वातंत्र्याकडून बंधनाकडे असा उलटा प्रवास नव्हे काय? नितात गुरुभक्ती ही स्वतंत्र विचाराला बाधक होते याचे हे उदाहरण मानावे लागेल.

या चार व्यक्तिचित्रानंतर येतात सतरा विविध लेख. अभ्यासपूर्ण टिपणे आणि व्यक्तिगत चिंतन असे या लेखाचे स्वरूप आहे. पं. भीमसेन जोशी यांच्याबरोबर सवादही आहे. या सर्वच लेखातून प्रभाताईंचं चिंतनशील व्यक्तिमत्त्व दिसून येतं यादृष्टीने ख्यालातील आधुनिकता, सरगमचे राग-संगीतातील स्थान, माझी मैफिल-माझा कलाविचार, कलाकार-समीक्षक सामंजस्य, माझे जीवन-गाणे हे लेख फारच चागले उतरले आहेत. अर्थात या लेखातले सर्वच विचार पटतीलच असे नाही. उदाहरणार्थ समीक्षकांबद्दल लिहिताना त्या म्हणतात की, संगीत समीक्षा हा त्यांचा साईड बिझनेस असतो. पण नोकरी करून मैफिलीचा साईड बिझनेस करणारे कलावंत काय थोडे आहेत? स्वतः प्रभाताई सुद्धा प्राध्यापिकेची नोकरी करून मैफिली करतातच की. समीक्षकाला मच प्रदर्शनाचा अनुभव हवा अस त्या म्हणतात. आमटीत मीठ जास्ती पडलंय अस म्हणणाऱ्याला स्वयंपाकाचा अनुभव हवा असं म्हणण्यासारखच आहे हे. समीक्षकासाठी त्यानी बऱ्याच सूचना केल्या आहेत. अशाच सूचना एखादा समीक्षक कलाकाराच्यासाठीही करू शकेल. प्रभाताईंना समीक्षक या प्राण्याविषयी भलतीच भीती वाटते असा समज होण्याची शक्यता आहे. समीक्षा वाचून श्रोते मैफिलींना गर्दी करतात किंवा त्या ओस पाडतात अशी त्याची कल्पना दिसते. पण सुदैवाने तस काही नाही. ज्याचं नाणं खणखणीत आहे त्याला कोणताही समीक्षक काहीही करू शकत नाही.

'सरगमचं राग संगीतातील स्थान' हा लेख मात्र अप्रतिम उतरला आहे. सरगमवर इतके खोल चिंतन आणखी कोणी केले असेल असे वाटत नाही मात्र सरगम करण्याच्या नादात बोलतानाचे सौंदर्य अलीकडे पूर्णपणे दुर्लक्षिले जात आहे याचाही उल्लेख हवा होता.

कायदा आणि संगीत या लेखात त्या म्हणतात, स्वर म्हणजे दिक् (स्पेस) आणि लय किंवा ताल म्हणजे काल (टाईम). वास्तविक पहाता स्वर जन्मतो तोच मुळी कालाच्या प्रवाहात. आणि जन्म घेतानाच तो अगभूत लय घेऊनच येतो. तेव्हा स्वर म्हणजे दिक् याचा खुलासा हवा होता.

अमेरिकेतील भारतीय शास्त्रीय काव्यसंगीत हा लेख परदेशात मैफिली करू इच्छिणाऱ्या कलावंताना मार्गदर्शक ठरेल. त्याचप्रमाणे राष्ट्रीय सास्कृतिक धोरण: संगीत: एकटिपणी हा लेख अभ्यासपूर्ण आणि उपयुक्त आहे.

माझे जीवन गाणे, हा अत्यंत रसाळ लेख आहे मात्र एका ठिकाणी त्या म्हणतात की, 'मैफलीत श्रोत्याची आवड वेगळी असते, समज वेगळी असते. सर्वांना बरोबर घेऊन आनंदयात्रेची दिंडी खांद्यावरून न्यायची असते. अर्थात यासाठी कुठे तरी थोडी तडजोड करावीच लागणार हे उघडच आहे.' पण लगेच पुढे त्या म्हणतात, 'संगीताच्या वाटचालीत तडजोड करायची माझी इच्छा नसते.' असे काही किरकोळ दोष सोडले तर हा लेख म्हणजे उत्तम रसपूर्ण आत्मनिवेदनाचा एक नमुना आहे. भरतनाट्य शास्त्राविषयी त्यानी केलेले विधानही वादग्रस्त आहे. (पृष्ठ ६५)

या उणिवाकडे दुर्लक्ष करून हे पुस्तक वाचताना वाचकाला एका स्वरमय आनदयात्रेचा अनुभव निश्चितच येईल. एका वेगळया प्रकारच्या ग्रंथाची भर घालून प्रभाताईंनी मराठीतील संगीताचे दालन समृद्ध केले आहे. त्याबद्दल त्यांना शतशः धन्यवाद!

—अरविंद गजेंद्रगडकर

## वेठबिगारीतून बेकारीकडे?

महार, अस्पृश्य, हरिजन, दलित, बी सी. जमात एकच, पण नावे मात्र पाच पिढयात पाच झाली नावाबरोबर समाजाचे भाग्य बदलले का? पाच पिढयापूर्वीचा महार गावात वेठबिगारी करीत असे सध्याचा बी सी. (बॅकवर्ड क्लास) शहरात बेकारीला तोंड देत आहे. गावकी-भावकीला रामराम ठोकला शहरात आलो. शिकलो-सावरलो तरी आपण एका

कीच, या भावनेने वैफल्यग्रस्त होऊन सध्याची दलित पिढी विद्रोहाकडे वळली आहे.

'वेठबिगार आणि विद्रोह' या पुस्तकात सुखराम हिवराळे यांनी दलितांच्या पाच पिढ्यांची वेठबिगारीकडून विद्रोहाकडे झालेली वाटचाल नीटसपणे दाखवली आहे. बाबासाहेब आंबेडकरांची पिढी मधली. तिच्या मागच्या दोन पिढ्या रामजी व मालोजी आंबेडकरांच्या. बाबासाहेबांनंतर भैय्यासाहेबांची पिढी चौथी आणि सध्याची पिढी पाचवी. या पाच पिढ्यांच्या शे-सव्वाशे वर्षांच्या काळात झालेल्या प्रगतीबद्दल लेखकाने या पुस्तकात 'मुक्त चिंतन' केले आहे

मालोजींची पिढी अल्पसंतुष्ट व गतानुगतिक होती. 'गावकी देईल ते निमूटपणे घ्यावे, भावकी म्हणेल तसे आपापसात वाटून खावे.' पण आपल्या मुलांनी तरी वेठबिगारीतून बाहेर पडावे, या इच्छेने त्या पुढच्या पिढीला शाळेत घातले.

रामजींची पिढी 'व्ह. फा.' पर्यंत शिकली. तिने फौजेत, गोदीत, गिरणीत चाकरी धरली. चाकरीनिमित्त त्यांना गावापासून व कुटुंबापासून दूर राहावे लागले. त्यांनी गावकीशी बारीक-सारीक संघर्ष केले खरे; पण शेवटी सामोपचाराने घेतले. मुले आपल्यापुढे शिकली पाहिजेत, या हेतूने त्यांनी वसतिगृहे उभी केली.

बाबासाहेबांच्या पिढीने उच्चशिक्षण घेतले. तिने विखुरलेला दलित समाज एकत्र आणण्यासाठी वाणी-लेखणीने जागृती केली. हक्कांची भाषा केली राजकीय पक्ष स्थापला. धर्मांतरसुद्धा केले. धर्मांतरामुळे गावोगावचे वातावरण स्फोटक बनले. आता गावात राहायचे नाही. शिकून 'साहेब' बनायचे, हे उद्दिष्ट ठरले.

भैय्यासाहेबांच्या पिढीतले लोक प्राध्यापक झाले, वकील झाले, 'जेपी' झाले, 'दलितमित्र' झाले; पण ते गावाला कायमचे मुकले. 'शहरातली झोपडपट्टी परवडली; पण गावातले स्वतःचे चुनेगच्ची घर नको,' अशी त्यांची वृत्ती बनली. यातून ते आत्मकेंद्रित झाले. आपण बरे, आपली नोकरी बरी, समाजाचे आपल्याला काय? अशी भावना बळावली. गटबाजीच्या राजकारणामुळे इकडे पक्षाच्या चिरफळ्या उडाल्या.

आणि आता चालू पिढी. लेखक म्हणतो, ही शिकून-सवरूनसुद्धा बेकारीत आहे. 'बीसी' म्हणून आपली हेटाळणी चालू आहे, असे तिला वाटते. ही पिढी एकाकी, संत्रस्त, आक्रमक आणि विद्रोही बनली आहे.

या विद्रोहाचे लेखक स्वागत करतो आहे. पण सगळ्या वाचकांना ते मान्य होईल का? विद्रोह कुणाविरुद्ध आहे? भांडण कुणाशी आहे? बेकारी सार्वत्रिक आहे. ती फक्त दलितांच्या वाट्याला आली आहे, असे नाही. एकाकीपणाची भावना केवळ दलितांनाच नव्हे तर प्रत्येक शहरवासियाला व्यापून राहाते. लेखक म्हणतो, 'विद्रोहाच्या नौबती चौफेर झडत आहेत. लोकशाही दृढमूल करण्यासाठी, देशाच्या एकतेसाठी तरुणमन धडपडत आहे. नवे रक्त नव्या भारताचे चित्र रेखाटत आहे.' पण हा आशावाद, लेखकाने रंगवलेल्या शेवटच्या दोन पिढ्यांच्या चित्राशी विसंगत वाटतो.

अशा आशावादाऐवजी कदाचित धोक्याचे इशारे अधिक उपयुक्त ठरतील. वेठबिगारीपासून बेकारीपर्यंतच्या प्रवासात 'विकास' नेमका किती झाला? सध्याच्या विद्रोहाचे रुपांतर विधायक कार्यात कसे करता येईल? अशा प्रश्नांचा 'अभ्यास' करण्याऐवजी लेखकाने 'मुक्तचिंतना' चा सोपा मार्ग धरला आहे. या चिंतनात बाबासाहेबांविषयी व्यक्तिपूजा आहे. लिखाणात शब्दबंबाळपणा आहे मांडणीत भावविवशता आहे.

दलितांच्या पाच पिढ्यांचे चित्रण करण्याबरोबर लेखकाने त्यातून काही ठोस निष्कर्ष काढले असते तर पुस्तकाची उपयुक्तता नक्की वाढली असती.

—सुरेश परांजपे

वेठबिगार आणि विद्रोह
सुखराम हिवराळे
प्रसार प्रकाशन, कोल्हापूर.
पृष्ठे ६० किंमत रु. २०.

## मूल्यशिक्षण समीक्षा

मूल्यशिक्षण हाच खऱ्या शिक्षणाचा गाभा आहे. यावर दृढ विश्वास ठेवून कोल्हापूरच्या श्री. महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालयाने १४-१२-१९८४ रोजी विनामूल्य मर्यादित वितरणासाठी हे संस्थेचे सुवर्ण महोत्सवी प्रकाशन प्रसिद्ध केलेले आहे. आपल्या देशात शिक्षणाला आलेला बहर ही वाढ नसून सूज आहे आणि त्यात नैतिक शिक्षण किंवा मूल्यशिक्षण उपेक्षिले गेले आहे हे सगळेच जाणतात. अशाही परिस्थितीत काही शाळा मूल्यशिक्षणाचा प्रयत्न सातत्याने करतात त्यांची दखल घेण्यासाठी म. ता. अध्यापक महाविद्यालयाने मूल्यशिक्षणाची व्यावहारिक शक्याशक्यता आणि तशा प्रयत्नांचे फलित हा आपल्या अभ्यासाचा विषय बनवला. साहजिकच मूल्यांबाबत तात्त्विक लिहिण्यापेक्षा त्याच्या क्रियात्मक भागावर



भर दिला. शिक्षक मूल्यशिक्षणाबाबत कसकसे प्रयत्न करतात व विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंक्रमण कसे घडते हे पाहण्याच्या दृष्टीने १९८२–८३ पासून त्यांनी हाती घेतलेल्या मूल्यशिक्षण प्रकल्पामध्ये शालेय व्यवहाराच्या संदर्भात मूल्याचा स्त्रोत कसाकसा आणि कोठून येतो याचा विचार केला गेला. या पुस्तिकेसाठी मात्र विषयसंकोच करणे अपरिहार्यच होते. त्या दृष्टीने मराठी आणि इतिहास हे दोन मूल्यगर्भ विषय अध्यापनाच्या चर्चेसाठी निवडले गेले. क्रमिक पुस्तकातले धडे वाचणे, त्यातील शब्दार्थ सांगणे आणि आधारित प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना लिहून देणे किंवा पाठ करून घेणे ही ढोबळ पद्धत सगळेच शिक्षक अवलंबतात पण भाषेच्या फुलोऱ्यात लपलेले मूल्य, संदर्भांची समृद्धी, अधिक वाचन, या मूल्यांची स्थलकालसापेक्षता आणि सार्वकालिकता या अंगांनी विचार करायचा झाला तर प्रत्येक धडा हे एक आव्हान ठरेल. शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी माहितीचे भारे वाहाणे आणि शिक्षकांनी ती ओझी विद्यार्थ्यांच्या पाठीवर चढवायला मदत करणे या रूढ कल्पनेच्या खूपच पुढे जावे लागेल. या पुढे जाण्याची दिशा आणि व्याप्ती समजण्याच्या दृष्टीने इयत्ता आठवीच्या मराठी व इतिहासाच्या क्रमिक पुस्तकांमधल्या काही पाठांची व त्यासंबंधात काही शाळांनी केलेल्या प्रयत्नांची तपशीलवार माहिती दिलेली आहे. मूल्यसंक्रमणासाठी पन्नास–साठ विद्यार्थ्यांपुढे घडाघडा तोंडी शिकवणारा शिक्षक पुरेसा होणार नाही. चर्चा, कृतिसत्रे, परिसंवाद, बुद्धिमंथन नाट्यीकरण, मूकाभिनय अशी अनेक साधने वापरावी लागतील. या सामूहिक अध्यापन पद्धतींची दिशाही प्रस्तुत पुस्तिकेत दाखवली आहे. शालेय शिक्षणाव्यतिरिक्त अनेक उपक्रम किंवा सहशालेय कार्यक्रम आज सर्वत्र केले जातात; पण त्यात विवेकापेक्षा दिखाऊ झगमगाट,.उत्साही वृत्ती, विद्यार्थ्यांचे वय व पार्श्वभूमी यांच्याकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे मूल्यशिक्षणाच्या गंभीर प्रयत्नाला उथळ करमणुकीची जोड मिळते विद्यार्थ्यांच्याही मनावर त्याचीच पकड जास्त बसते. याबाबतीत फार जाणीवपूर्वक क्रमिक शिक्षणातले मूल्यशिक्षण आणि सहशालेय उपक्रमातून होणारे मूल्यसंक्रमण यांची सांगड घालावी लागेल. त्या दृष्टीने वेगवेगळ्या शाळांनी घेतलेल्या सहशालेय मूल्यशिक्षणात्मक उपक्रमांची माहिती पुस्तिकेत करून दिलेली आहे. आणखी एका प्रकरणामध्ये मूल्यशिक्षणातली शालेय प्रशासनाची भूमिका हा विषय हाताळला आहे. आजच्या शिक्षणपद्धतीत क्रमिक विषय, अभ्यासक्रम आणि परीक्षा–मार्क यांचा एवढा ताण शालेय प्रशासनावर असतो की त्यातून मूल्यशिक्षणासाठी वेगळा वेळ काढणे कठीण होऊन बसते. मग मूल्यशिक्षणासाठी पाठ्यपुस्तक हवे काय, त्याचा अभ्यासक्रम–परीक्षा हव्यात का, स्वतंत्र तासिका-स्वतंत्र पाठ असावेत का हा प्रश्न येतो. यावर पुस्तिकेमध्ये असे सुचवले आहे की मूल्यशिक्षण हा वरून घ्यायचा डोस किंवा जादूची कांडी नाही तर त्यासाठी खरी आवश्यकता आहे ती विशिष्ट वातावरणाची. याबाबतीत संस्थाचालक व संस्थाप्रमुख यांची जबाबदारी सर्वात जास्त आहे. शिक्षकांचे आचार, शिक्षण व्यवहार, मूल्यसंस्कारांना जितका अनुकूल होईल तितकंच मूल्यशिक्षण अनौपचारिक, सहज होईल.

अशाप्रकारे विचार या पुस्तिकेत अगदी सोपे करून सांगितले आहेत. याबाबत कोणाचाही तात्विक मतभेद होणं शक्यच नाही. प्रश्न आहे तो कार्यवाहीचा. श्री. म. ता. अध्यापक महाविद्यालय व त्याच्या प्राचार्या लीला पाटील यांनी पुस्तिकेच्या पुढे जाऊन या कार्यवाहीच्या बाबतीत ठोस सूचना, कार्यक्रम सुचवायला पाहिजेत. नाहीतर एकतर मूल्यांबाबत शाब्दिक बुडबुडे राहतील किंवा आधी कोंबडी की आधी अंडे या प्रश्नाप्रमाणे आधी मूल्यसापेक्षी शिक्षक की आधी मूल्यसंपन्न विद्यार्थी हा प्रश्न कायमच राहील, याबाबतीत संबंधित सर्व स्तरांमध्ये खूप मूलभूत बदल व्हावे लागतील. समाजाकडून शिक्षक, शिक्षकाकडून विद्यार्थी जे आणि जसं घेतील त्यांच्यातून पुन्हा उद्याचा समाज उद्याचे शिक्षक बनतील. आजच्या आपल्या शिक्षणपसाऱ्यात या विषयाकडे इतके सक्रीय लक्ष दिल्याबद्दल आणि वाचकांचे लक्ष वेधल्याबद्दल लीलाताई पाटील यांचे अभिनंदन !

— मंगला गोडबोले

# शब्दांचं अंगण

## बालवाङ्मय

आशा कर्दळे

सध्याची लहान मुलांची पिढी चांगलीच तेज असल्याने बालवाङमयाची निर्मिती करताना निश्चितच विचार करावा लागेल. आताची मुले राजा–राणीच्या गोष्टी आणि परीकथा यावर समाधान मानणारी नाहीत. बदल म्हणून एखादे वेळी ते या गोष्टी स्वीकारतात. पण हल्लीची मुले अक्षरशः हजारो गोष्टींच्या संपर्कात येत असतात. जगात काय चालू आहे याचे त्यांना भान असते. अवकाशात कोणत्या राष्ट्राचा कोणता उपग्रह आहे, त्याचे कार्य कसे चालते, भारताजवळ विनाशिका किती, लढाऊ विमाने किती, कॉम्प्युटर म्हणजे काय, आकाशातल्या ग्रहांची माहिती, पक्षी ओळखणे अशा असंख्य गोष्टी त्यांना येत असतात, त्यांची माहिती असते. सगळ्या आंतरराष्ट्रीय खेळांचेही नुसतेच आकर्षण नसते, तर नियमही माहीत असतात ती केवळ टी. व्ही. बघतच नाहीत तर वेळ पडली तर किरकोळ दुरुस्तीही करतात. विज्ञानाचे त्यांना वेडच असते असे म्हटले तरी चालेल. तेव्हा अशा चौफेर बुद्धी आणि कुतूहल धावणाऱ्या मुलांसाठी पुस्तकेही अशीच निघायला हवीत की, जी त्यांचे मनोरंजन करण्याबरोबरच ज्ञानही मिळवून देतील.

एका विशिष्ट वयात मुलांना गोष्टींचे आकर्षण असतेच. जोवर मुले स्वतः वाचू शकत नाहीत, तोवर रोज नवी गोष्ट सांगण्याची अवघड जबाबदारी आई किंवा आजीवर असते. ही समस्या बरीच सुटते रामायण, महाभारत, हितोपदेश, पंचतंत्र,

इसापनीती यातील गोष्टींमुळे. मुलांना वाचायला यायला लागले की मग हल्लीची मुले बहुधा कॉमिक्स वाचतात. पण मराठीतून मुलांना चांगले वाचन पुरवले आहे अमर चित्र कथानी पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक क्षेत्रातल्या प्रसिद्ध व्यक्तींचा सुरेख परिचय त्यातून घडतो. मुलानी अवश्य वाचावीत अशी पंचतंत्र, हितोपदेश आणि इसापनीती ही पुस्तके, श्री. आनंद साधले यानी मागच्या वर्षी मुलांसाठी पंचतंत्र–भाग एक आणि दोन आणि हितोपदेश–भाग एक आणि दोन ही पुस्तके तयार केली. त्याआधीच त्यानी इसापनीतीचेही दोन खंड तयार केले. ही सर्व प्रकाशने मॅजेस्टिकची आहेत. पंचतंत्रात खास कुमारांच्या दृष्टीने काही संस्कार आहेत. विष्णुशर्म्याने सर्व शास्त्रांचे सार काढले आणि ते सुंदर ग्रंथात गोवले. राजनीती आणि व्यवहारनीतीचे सुगम पाठ या ग्रंथाद्वारे मिळतात. हितोपदेशात लोकरितीबद्दलच्या कथांचा संग्रह आहे. कथांमध्ये अनेक सुभाषिते आहेत. त्यामुळे जगात वागावे कसे याचे चांगले संस्कार मुलांवर होतात.

पृथ्वी प्रकाशनने ज्ञान – विज्ञानमालेत श्री. वसंत शिरवाडकर याचे 'अवकाशाचा शोध' हे पुस्तक गेल्या वर्षी प्रसिद्ध केले. यात शास्त्रज्ञांनी केलेल्या अवकाशसंशोधनाची माहिती दिलेली आहे. शिवाय चंद्र, चांदण्या, ग्रह, तारे, किती मोठे आहेत, त्यांच्यावरचे वातावरण कसे आहे, या प्रश्नांना मुलांची जिज्ञासा शमेल अशा पद्धतीने, आकडेवारीच्या जंजाळात न शिरता उत्तरे दिलेली आहेत जोडीला रंगीत छायाचित्रे आहेत. त्यामुळे पुस्तक आकर्षक झाले आहे.

याच मालिकेतील याच लेखकाची आणखी दोन पुस्तके आहेत. 'माणूस कसा झाला' आणि 'सागराच्या उदरात' ही पृथ्वी प्रकाशनेच आहेत. पहिल्या पुस्तकात डार्विनच्या उत्क्रांती सिद्धांतानुसार पृथ्वीवर प्राणीजीवनाची वाटचाल कशी झाली, मानव केव्हा, कसा अवतीर्ण झाला, त्याच्या प्रगतीतील टप्पे कोणते या इतिहासाची ओळख सोप्या पद्धतीने करून दिली आहे. आपलाच इतिहास आपल्यालाच सांगण्यात आणि वाचण्यात मुलाना गंमत वाटेल. 'सागराच्या उदरात' या पुस्तकात समुद्राची आणि समुद्रामधल्या जीवसृष्टीची माहिती दिलेली आहे विश्वास बसणार नाही, असे विलक्षण चमत्कार सागराच्या तळाशी घडतात. माशांचा जीवनक्रम, अंतःप्रेरणा, सवयी, शरीररचना याची माहिती मुलाना निश्चितच उद्बोधक वाटेल.

## समृद्ध साहित्य

श्री. हेमंत जोशी यानी कुमारासाठी अद्भुतरम्य कादंबरी लिहिली आहे. तिचे नाव 'तूफान'. सुपर्ण प्रकाशनने ती गेल्या वर्षी प्रसिद्ध केली. त्याच्या 'चंडांशू आणि सुवर्ण गरूड' या पहिल्याच कादंबरीचा महाराष्ट्र साहित्य परिषदेने पारितोषिक देऊन गौरव केला. हीही कादंबरी मुलाना निश्चित आवडेल. राष्ट्रीय बुद्धिमत्ता स्पर्धेत प्राविण्य मिळालेल्या पाच कुमाराना हिमालयाची भ्रमंती घडवून आणण्याच्या उद्देशाने निघालेले भारत सरकारचे 'तूफान' हे विमान एकाएकी नाहीसे होते या बेपत्ता मुलावर कोसळलेली संकटाची मालिका, त्या संकटावर मात करण्यासाठी मुलानी केलेली अचाट साहसे, आणि त्याच्या सुटकेसाठी हिमालयातील अद्भूत यतीने त्याना केलेली मदत अशी ही चित्तथरारक कथा आहे. जी मुले इंग्रजी वाचू शकतात, ती ठराविक वयात साधारण ११–१२ व्या वर्षापासून 'एनिद ब्लिटन' वाचायला सुरुवात करतात. त्यातील पाच धाडसी आणि उद्योगी मुलाची टोळी त्यांना फार आवडते. मराठीतही अशा अनेक कादंबऱ्या लिहिल्या जाव्यात.

भारतीय स्वातंत्र्यलढयाविषयी आणि एकूणच इतिहासाविषयीही मुलाना आत्मीयता वाटते. ती जाण अधिक सुजाण करणे शक्य आहे. अशाच छोटया छोटया पुस्तकांच्याद्वारे कोल्हापूरच्या मीनल प्रकाशनने, श्री. दा. वि. कुलकर्णी लिखित तीन पुस्तके गेल्या वर्षी प्रकाशित करून चांगले काम केले आहे. महान क्रांतीवीर भगतसिंग, मेवाडचा सूर्य राणा प्रताप, राजयोगी स्वामी विवेकानंद, ही तीन पुस्तके आहेत. ऐतिहासिक पुरुषाप्रमाणेच मुलाना आपल्या संतपरंपरेची ओळख व्हावी म्हणून श्री गो.नी.दांडेकर यांनी संत नामदेव, एकनाथ, ज्ञानेश्वर आणि रामदास अशी चार पुस्तके लिहिली. ती मॅजेस्टिकने प्रकाशित केली. मुलांना चटकन वाचता येतील अशी ही छोटी पुस्तके दांडेकरांच्या खास नाटयमय शैलीने नटलेली आहेत. श्री. गो. नि. दांडेकर यानी मुलासाठी इतरही मौलिक लिखाण केले आहे. त्यांची 'भिल्ल वीर कालिंग' ही कादंबरी तर प्रसिद्धच.

बाल आणि कुमार वाङमयनिर्मितीत ज्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल असे दोन लेखक आहेत. एक श्री भा. रा. भागवत आणि दुसरे यदुनाथ थत्ते. श्री. गोपीनाथ तळवलकर याचेही नाव अवश्य आठवेल. ज्ञान आणि मनोरंजन हे भा. रा. भागवत यांचे गाजलेले आणि कुमारप्रिय पुस्तक. मॅजेस्टिकने आतापर्यंत त्याच्या चार आवृत्त्या काढल्या. श्री. यदुनाथ थत्ते यानी कुमारासाठी उद्बोधक लिखाण केले आहे. बालवाङमयाच्या क्षेत्रात त्यांची विशेष अशी कामगिरी आहे. लहान मुलांची समजशक्ती फार असते. त्याना केवळ राजाराणीच्या गोष्टी सांगून आपण कमी लेखतो असे त्याना वाटते. त्यापेक्षा मुलाना विचारप्रवृत्त करणारे, त्याच्यावर सद्‌गुणाचे संस्कार करणारे आणि त्यांचे ज्ञान वाढवणारे लिखाण त्यांना दिले तर मुले ते आवडीने वाचतात. म्हणून श्री. थत्ते यानी अक्षयपात्र, अमृतधारा, भाग्यविधाता अणू, एका रात्रीत देऊळ, समर्थ व्हा, संपन्न व्हा! जगूबाबा, अशी अनेक सुरेख पुस्तके लिहिली. हा पाया रचला श्री. साने गुरुजींनी. सुसंस्कार हे त्यांचे ध्येय होते. डोळयातून पाणी गाळत गाळत साने गुरुजींची पुस्तके वाचण्याचेही एक विशिष्ट वय असते.

बालनाटये ही बालवाङमयाची स्वतंत्र शाखा. तीही बऱ्यापैकी फोफावते आहे असे म्हणायला हरकत नाही. कारण सुट्टयांच्या दिवसात या नाटकांना पूर येतो. मुलेही चिक्कार गर्दी करतात. नाटक ही दृश्य आस्वादाची बाब असल्याने, आणि तांत्रिक अंगाच्या विकासामुळे मुले त्यांचा आनंद पुरेपूर उपभोगतात. सई परांजपे, सुधा करमरकर, रत्नाकर मतकरी यांच्यासारखी मातब्बर मंडळी बालरंगभूमीला लाभल्याने तिचे भवितव्य आशादायकच म्हणायला हरकत नाही. गेल्या वर्षी मॅजेस्टिकने 'अज्ज्यात मज्ज्यात ऑटोच्या राज्यात' हे नीता भट्ट–माडगूळकर याचे नाटक प्रसिद्ध केले. या नाटकात एक यंत्रमानव आहे. त्याचे नाव ऑटो. खरे हृदय हवे म्हणून तो तक्रार करतो.

त्याला खरे हृदय मिळाले तर काय धमाल येईल त्याचे चित्रण यात आहे. हे युग यंत्र-मानवाचे आहे. नाटकाच्या माध्यमातून मुलाना असे अद्यावत ज्ञान मिळाले तर ते स्वागतार्हच म्हणावे लागेल. जादूने भारलेल्या अद्‌भुतरम्य वातावरणातून मुलांना बाहेर काढण्याचा लेखिकेचा प्रयत्न आहे

बालसाहित्य आणि कुमारसाहित्य संमेलने यामुळे बालवाङमयाला चांगले दिवस येतील. बालवाङमयाच्या स्वरूपात आणि प्रकृतीत जो बदल घडून येऊ बघतो आहे, त्या प्रक्रियेला यामुळे चालनाच मिळेल. त्यातून काही चागले बाल लेखक आणि कवीही तयार होतील. इंग्रजीतून 'चिल्ड्रेन्स नॉलेज बॅंक' या शीर्षकाखाली पाच खंड दिल्लीच्या 'पुस्तक महाल'ने प्रकाशित केलेत. त्या धर्तीवर मराठीतही प्रयत्न व्हायला हरकत नाही. त्यात हजारो प्रश्न तयार करून मुलाना समजतील अशी उत्तरे चित्रांसह दिली आहेत. जरा मोठ्या मुलाचे ज्ञान त्यामुळे वाढेल. खास आणि केवळ मुलांसाठी वाचनालय असावे असे वाटते. तिथे इंग्रजी, हिंदी, मराठी भाषामधले फक्त बाल आणि कुमारसाहित्य असावे. त्यामुळे मुलांच्या वाचनाला अफाट वाव मिळून त्यांचे वाचन अनेकागी होईल. अशी लाखो पुस्तके भरतील. बालसाहित्याची चागली जोपासना मुलासाठी असलेल्या मासिकामधून होते हे आवर्जून सांगायला हवे. किशोर, बालवाडी, चांदोबा, चपक ही मासिके मुलाची वाचनाची गरज चांगल्याप्रकारे भागवतात.

मुलांचा अत्यंत प्रिय आणि लाडका माणूस म्हणजे बिरबल. बिरबलाचे किस्से ऐकताना मुले मनापासून रममाण होतात. बिरबलावर मराठीत अनेक पुस्तके निघाली. बिरबलाच्या नावावर अशा लाखो कल्पित कथाना काही वाण नाही. त्यापैकी एक उल्लेखनीय पुस्तक म्हणजे मॅजेस्टिकचे श्री. र. गं. विद्वास यांनी लिहिलेले 'बिरबल' याच नावाचे. निखळ आनंदाचा आणि विशुद्ध विनोदाचा प्रत्यय त्यातून येतो. हे पुस्तक दोन भागात आहे.

लहान मुलाना कोडी फार आवडतात. कोडी आणि आकड्याच्या गणिती करामती या विषयाची ३–४ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यापैकी एक 'बुद्धिरंजन' हे अनिल चौबळ याचे 'बुद्धिरंजन' हे पुस्तक मॅजेस्टिक प्रकाशनचे. त्याचप्रमाणे श्री. मनोहर चपानेरकर यांची दोन पुस्तके मॅजेस्टिकने प्रसिद्ध केली. त्यातले एक '१११ गणित गमती' या नावाचे आणि दुसरे 'गणित चातुर्य आणि चमत्कार' या दोन्ही पुस्तकांमध्ये अंकाच्या करामती आणि गणिती कोडी आहेत. अशा प्रकारच्या पुस्तकांमध्ये रमायला मात्र मुलाना त्याची गोडी हवी आणि थोडी विचारशक्ती व बौद्धिक पातळी हवी. है असेल तर मुले या पुस्तकांमध्ये तासन्तास रमतील. मनोरंजनाबरोबर मुलाच्या बुद्धीचा विकास व्हावा हा या लेखकाचा हेतू आहे. भूमितीतल्या काही गमतीदार समस्या, आगपेट्याच्या काड्याची काही उदाहरणे आणि जादूचे चौरस यामुळे हे पुस्तक लहानाबरोबरच मोठेही वाचतील.

श्री. दिवाकर बापट यांची दोन पुस्तके मॅजेस्टिकनेच काढली आहेत. 'ज्ञान आणि मनोरंजन' आणि दुसरे 'छंद, कला आणि क्रीडा'. चागले छंद जोपासण्यासंबंधी मार्गदर्शन, कलाची जोपासना आणि विकास मुलांमध्ये कसा होईल याचेही मार्गदर्शन आणि टी. व्ही., रडार, फ्रीज, फोन वगैरे साधनाची माहिती इत्यादीमुळे ही पुस्तके मुलांनी जवळ बाळगावीत अशी आहेत.

अगदी नवीन अशी बरीच पुस्तके बाजारात आली आहेत. एकूणच बालवाङमयाची निर्मिती भरपूर प्रमाणात होते आहे हे पाहिले म्हणजे या क्षेत्रातली जागृतीची लाट लक्षात येईल. तरीही स्वरूप थोडे बदलणे आवश्यक वाटते. एकाच विषयाची पुनरावृत्ती न होता, आधुनिक, नवे विषय हाताळले तर विषयाची व्याप्ती वाढेल.

उषा एकताटे – संतांची कहाणी – प्रपंच प्रकाशन.

अशोक भोरे – नंदनार – शिल्पा प्रकाशन.

मोरेश्वर वाळिंबे – भक्तध्रुव – उत्कर्ष प्रकाशन.

मोरेश्वर वाळिंबे – राजर्षी भीष्म – उत्कर्ष प्रकाशन.

मुमताज रहिमतपुरे याचे 'आकाशातील चांदण्या व इतर नऊ पुस्तिका' (प्रचार प्रकाशन कोल्हापूर) हे पुस्तक बालाचे आकर्षण ठरावे श्रीमती रहिमतपुरे यांच्या 'रमीजा' या पुस्तकाला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला आहे. तसेच 'इंदिरा प्रियदर्शिनी'– शेवडे गुरुजी (लेखक आणि प्रकाशक) हे पुस्तक, समयोचित म्हणावे लागेल. 'कथा ही अद्‌भुत सागराची' हे पढरीनाथ रेगे याचे प्रसाद प्रकाशनने प्रसिद्ध केलेले पुस्तक समुद्राची माहिती देणारे. राज्य सरकारने पुरस्कार देऊन गौरवलेली 'अनमोल कथा – विजय भागवत, राष्ट्रसंत तुकडोजी – र. सी. कढवे, गंमतगाव– लीला दीक्षित' ही पुस्तके अवश्य वाचावीत अशी आहेत.

□

## ऐलमा पैलमा, शिक्षणदेवा

**लीला पाटील**

# मुक्त शिक्षण

### शेवटी तिथंच ना !

अलीकडे काही उब्द अथवा phrases तुम्ही वरचेवर वापरले की तुम्ही प्रागतिक ठरू शकता. 'तळागाळातले लोक', 'सामाजिक बांधिलकी' असे शब्द पुढारी, सामाजिक कार्यकर्ते व स्वतःला प्रागतिक समजणारे काही लोक वापरत असतात. शिक्षणातही हल्ली 'अनौपचारिक शिक्षण', 'मुक्त शाळा', 'मुक्त विद्यापीठ' असे बरेच शब्द वापरले जाऊ लागले आहेत. कित्येकदा तर सधिसाधू लोक असे शब्द वापरून स्वत:चा सनातनीपणा त्याखाली लपवतात. काही लोकाना मात्र 'मुक्त शाळा', 'मुक्त विद्यापीठ', 'अनौपचारिक शिक्षण' नेमकं काय वेगळं आहे हे उमजत नाही. परवा आमच्या-

कडं श्री. बाबा आढाव आले होते. मुक्त शिक्षण आणि शिक्षण संस्थांत दिलं जाणारं शिक्षण यात काय फरक आहे असं त्यांना विचारायचं होतं. ते म्हणाले, 'मुक्त शाळेत काय अन् नेहमीच्या शाळेत काय आपण पुनः तिथंच येतो. तेच गणित, तीच भाषा, तेच व्याकरण शिकवतो ना?' बाबांसारख्या एका समाजकार्यकर्त्यानं विचारलेल्या या प्रश्नात त्यांच्या अज्ञानापेक्षा मला बोलकं करण्याचा भाग अधिक आहे हे ओळखून मी म्हटलं, 'इतरांनी जमवून दिलेलं लग्न, प्रेमविवाह, आंतरजातीय विवाह अथवा आंतरखंडीय विवाह ह्या साऱ्या विवाहप्रकारांत नवरा-बायको तिथंच येतात. तेच घर करणं, स्वयंपाक करणं आणि एकत्र झोपणं; पण म्हणून का हे सारे विवाहप्रकार एकाच मापानं मोजायचे?' मला वाटतं बाबा आढाव गडबडीत होते. त्यामुळे ते हसले आणि कामासाठी उठले पण या प्रसंगानं मी मात्र विचार करू लागले की मुक्त शिक्षण (open education) म्हणजे नेमकं काय बरं?




केवळ रचनाच महत्त्वाची मानायची तर मुक्त शिक्षणात इयत्तांच्या चाकोऱ्या असत नाहीत असं म्हणता येईल; पण इयत्तांच्या पाट्या काढून टाकल्यानं शिक्षण मुक्त ठरू शकेल?

या चित्रातलं पोरटं सांगत आहे, 'मी निर्वर्ग पद्धतीच्या शाळेतील तिसऱ्या वर्गात आहे.' या चित्राचा अर्थच असा की केवळ नव्या पाट्या लावून-'निर्वर्ग शिक्षण', मुक्त शाळा म्हणून सुरू होत नाही.

## अशा अनेक बेंड्या

मंडळी, आपण परंपरागत शिक्षणाच्या व्यवस्थेत इयत्ता गृहीत धरलेल्या आहेत. इयत्ता १ ते ४ पर्यंत प्राथमिक शिक्षण, इयत्ता ५ ते १० पर्यंतचं माध्यमिक शिक्षण, नंतर इयत्ता ११ वी व १२ वीचं उच्च माध्यमिक शिक्षण...इत्यादी इत्यादी; पण केवळ या इयत्तांमुळं आपण आणखी काय काय गृहीत धरलं माहीत आहे?

(१) प्रत्येक इयत्तेचा प्रत्येक विषयातील अभ्यासक्रम ठरलेलाच असावा लागतो.

(२) प्रत्येक विषयाचा अभ्यासक्रम दिलेल्या ठराविक तासिकांत संपतो.

(३) प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती, अवधानाची कक्षा, स्मरणाची ताकद, आणि विषय समजून घेण्याची पद्धती एकच असते.

आपण इयत्तांनुसार शिक्षण यंत्रणा बनविली आणि वरील सर्व बाबी त्यामुळं आपोआप आल्या, वेळापत्रकं आली. त्या वेळापत्रकात कोणत्या विषयाचे तास सामान्यपणं शाळेच्या कोणत्या वेळात टाकायचे हे ठरतं. शिक्षकानं वर्गात येऊन शिकविलं की वर्गातील साऱ्या साठ-पासष्ठ मुलांना ते सारख्याच प्रकारे समजतं हे मान्य झालं आणि मग साऱ्या विद्यार्थ्यांची एकाच प्रकारे परीक्षा घेणंही आपोआपच आलं.

## मुलं स्वतः शिकू शकतात

केवळ इयत्तांच्या पाट्या लावून आपण शिक्षण किती प्रकारे बंदिस्त केलंत हे पाहिलंत? शाळेतील वर्गांची रचनासुद्धा आपल्या बंदिस्तपणाचा नमुना आहे. सगळे विद्यार्थी एकामागे एक बसलेले असतात. माणसांच्या पाठी एकमेकांशी काय संवाद साधणार? कप्पाळ? परंतु विद्यार्थ्यांनी एकमेकांशी संवाद, चर्चा करावी हे मुळी बंदिस्त शिक्षणात अपेक्षितच नाही. शिक्षकानं 'ज्ञानदान' करायचं आणि दान घेणाऱ्यानं दात्याला सन्मुख व्हायचं! आपल्या आजच्या शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थ्यानं विषयाचा काही भाग स्वतःच शिकावा (self study) अशी अपेक्षाच नाही. स्वाभाविकच शाळेच्या संपूर्ण इमारतीत असा एकही भाग नसतो की तिथं बसून विद्यार्थ्यांना या विषयासंबंधीची अनेक पुस्तकं, संदर्भ पुस्तकं, नकाशे, प्रतिकृती पाहता येतील, हाताळता येतील. त्या विषयावर उपलब्ध असणाऱ्या स्लाइड्स पाहता येतील. टेप्स ऐकता येतील. अशी ठिकाणं-अध्ययन केंद्रं-शालेय इमारतीत अगर त्या इमारतीच्या बाहेरही असू शकतात. ज्या विद्यार्थ्याला ज्या विषयाचा अभ्यास करावासा वाटतो तो विद्यार्थी त्या विषयाचं अध्ययन तिथं करेल. त्याचं शिक्षण मुक्त असेल.

## सहाध्यायांकडून अध्ययन

स्वयं-अध्ययनाची सोय आपण विद्यार्थ्यांना जशी उपलब्ध करून देत नाही तशीच एकमेकांपासून शिकायचीही (Peer learning) संधीही न देऊन आपण मुलांच्या विकासाची आणखी एक वाट बंद करतो. मुलांनी एकमेकांपासून शिकणं हे शिक्षकांकडून शिकण्यापेक्षा अधिक सहज रीतीनं व विनाताणावाच्या (tension free) स्थितीत घडते. शिवाय शिकवीत असता शिकणाऱ्या विद्यार्थ्यालाही तो भाग अधिक सुस्पष्ट होत जातो. वर्गातील श्रीमंत-गरीब, खानदान-दलित,

हुषार–मागास अशा ज्या अनेक अदृश्य पण बळकट भिंतींनी वर्गातले विद्यार्थी विभागले गेलेले असतात त्या ढासळायलाही सहाध्यायानी एकमेकांपासून शिकण्यानं मदत होते. आजकालच्या साठ–ऐंशीच्या वर्गसंख्येत तर वर्गातील निम्म्याहून अधिक विद्यार्थी काय करीत आहेत हेच शिक्षकाला समजू शकत नाही. स्वत:चं अज्ञान उघड होऊ नये यासाठी विद्यार्थी सर्वतोपरी काळजी घेतात आणि विद्यार्थ्यांचं अज्ञान आपल्याला दिसू नये अशी शिक्षकाचीही इच्छा असते. त्यामुळे एका इयत्तेतून दुसऱ्या इयत्तेत विद्यार्थी ढकलले ( promote ) जात असले तरी त्यांच्या अज्ञानाचा ढीग वाढतच जातो. Peer learning चा वापर केल्यास अज्ञान उघडकीला येते. स्वाभाविकच अज्ञान हा इलाज शोधण्याचा एक प्रश्न बनतो, ज्याची लाज वाटून झाकून ठेवावी अशी बाब ठरत नाही. तसच प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची गती, अवधानाची कक्षा, स्मरणाची ताकद लक्षात घेऊन हुषार विद्यार्थी (प्रत्येक विषयात तो हुषार असतो असे नाही) मागास विद्यार्थ्याला मदत करतो.

आपल्या परंपरागत पद्धतीनं एक–दोन विषयात मागास असलेल्या विद्यार्थ्यावर 'मागास' असा छापच बसतो. मात्र peer learning मध्ये गणितात मागास असलेला बिपीन, नितीनकडून गणित शिकत असला तरी तोच नितीनला चित्रकला शिकवतो. यामुळंच नितीन आणि बिपीन हे वेगवेगळ्या विषयात 'हुषार' आहेत हे वर्गातील विद्यार्थ्यांच्या व शिक्षकाच्याही लक्षात येते. नितीनचा आत्मविश्वास ढासळत नाही. तो चित्रकलेतील यशामुळ गणिताचा अभ्यासही हुरूपानं करतो.

**Drop Outs**

प्रत्येक इयत्तेत कोणते विषय शिकायचे हे ठरलेलं असतं ते जवळ जवळ सारेच विषय सर्वांना शिकावे लागतात. मुलाच्या विकासासाठी ते सर्व विषय त्यानं शिकलेच पाहिजेत अशी आपली धारणा असते. मुलाच्या ओठांवर लव दिसू लागली की ती जशी डाव्या व उजव्या अशा दोन्ही बाजूस दिसते तसंच मूल शाळेत जाऊ लागलं की, त्या इयत्तेचे सारेच विषय शिकण्याची क्षमता व आवड त्याच्यात आहे अस आपण मानतो आणि या आपल्या धारणेमुळं वर्गात आणि वर्गाबाहेरही प्रचंड प्रमाणात Drop outs तयार होतात. नापासीमुळं अथवा शिक्षणात रस न वाटल्यामुळं जे विद्यार्थी शिक्षण संस्थेबाहेर फेकले जातात, त्यांना तात्त्विक भाषेत Drop outs असं म्हणतात. पण मला वाटतं इथं आपली थोडी गलती होते आहे. वर्गातही अनेक Drop outs असतात. अध्ययनाच्या प्रवाहाच्या बाहेर ते फेकले गेलेले असतात. शिक्षकाच त्यांच्याकडं लक्ष नसतं. त्याच्या हातात वह्या, पुस्तकं असली तरी ती वह्या-पुस्तकं त्याना आकर्षित करीत नाहीत. कोणत्याही वर्गातील निम्म्याहून अधिक विद्यार्थी अशा रीतीनं वर्गात असूनही Drop outs असतात. मला तर वाटतं वर्गातील हे Drop outs अधिक चिंतेचा विषय आहेत.

आजच्या शिक्षणाबद्दल एवढं सगळं आपण एकमेकांशी बोललो. त्याची सुरुवात कशावरून झाली? 'मुक्त शिक्षण' (open education) या शब्दप्रयोगावरून. वर्गाच्या चार भिंतींत चालणारं शिक्षण closed असतं आणि झाडाखाली चालणारं शिक्षण open असतं. इयत्तांच्या पाट्या लावलेल्या असल्या, इयत्तावार ठराविक अभ्यासक्रम असला, घटेच्या टोलाबरोबर शिकावयाचे विषय बदलत असले म्हणजे शिक्षण बंदिस्त झालं आणि या गोष्टी नसल्या म्हणजे शिक्षण मुक्त झालं, अस सामान्यपणे मानलं जात या आपल्या मानण्यामुळच 'तुमचं मुक्त शिक्षण पुन्हा त्या तिथच येतं' ह्या डॉ. बाबा आढावांच्या वाक्यापाशी आपण येतो. शिक्षणात मुक्तता openness कितपत आहे यावर शिक्षण मुक्त की बंदिस्त हे ठरवायला हवं. जे शिकायला हवं असं तुम्हा–आम्हाला वाटतं आणि ज्या पद्धतीनं ते शिकवायला हवं असं वाटतं ते विषय त्या पद्धतीनं शिकणं म्हणजे शिक्षण ही संकल्पना बदलायला हवी. विद्यार्थ्याला जे काही शिकावंसं वाटतं ते शिकण्याची मुभा त्याला असायला हवी. त्याचं बरचस अध्ययन –शिकण–हे त्याच्या स्वत:च्या प्रयत्नातूनच व्हायला हवं. वाचून, निरीक्षण करून, शोधून काढून, चर्चा करून व जरूर तिथं शिक्षकाचं मार्गदर्शन घेऊन विद्यार्थ्यानं शिकणं अशी मुभा त्याला असावयास हवी. शिकत असता सभोवारचं वास्तव, स्वत: विद्यार्थी आणि शिकायचा विषय याचा अधिकाधिक घनिष्ट संबंध येत गेला पाहिजे. आणि, त्यामुळं विद्यार्थी जसजसा शिकत जाईल तसातसा तो विषयाशी अधिक एकरूप, सामाजिक प्रश्नांशी बांधील व वास्तवाचं प्रखर भान असणारा बनत गेला पाहिजे. ज्या ज्या प्रक्रिया विद्यार्थी व शिक्षक याचे संबंध अधिक मोकळे ( open ) करतात, शिकण्याची प्रक्रिया यमनियमांनी जखडून ठेवीत नाहीत, हु र आणि मागासपणाची ठोकळेबाज मोजमापं ठेवीत नाहीत अशा प्रक्रिया शिक्षणात –अध्ययनात–शिकण्यात मुक्तता आणतात. मुक्ततेला वाव देणारं शिक्षणच मुक्त शिक्षण.

आपल्या या साऱ्या चर्चेचा शेवट करताना मी वाचलेली एक छोटी कविता तुमच्याबरोबर पुन्हा वाचावी म्हणते. वाचू या ?

Greeting his pupils,  
the master asked  
What would you learn of me ?  
And the reply comes :  
How shall we care  
for our bodies ?  
How shall we rear our children ?  
How shall we work together ?  
How shall we live  
with our fellow men ?  
How shall we play ?  
For what ends shall we live ?  
And the teacher pondered  
these words,  
and sorrow was in his heart,  
for his own  
learning touched not  
these things.

या कवितेवर भाष्य करायच म्हणजे closed education चाच नमुना ! वरील कविता आपण वाचलीच आहे तुमची तुम्ही ती शिकालच. पण मंडळी, नुसती तुम्ही शिकू नका. तुम्ही जे शिकाल ते शिकण्याची संधी तुमच्या मुलांना / विद्यार्थ्यांना द्या.

# ९९ वर्षांचे गोंधळी कलाकार राजाभाऊ कदम यांचा हृद्य सत्कार

वि. भा. देशपांडे

शनिवार दिनांक ८ जूनला भरत नाट्य मंदिरात सायंकाळी एक हृद्य सत्कार संपन्न झाला. सत्कार होता राजारामभाऊ कदम गोंधळी यांचा. पेशाने गोंधळी असलेले राजारामभाऊ परभणीचे. त्यांचे वय नव्याण्णव (९९) आहे हे सांगूनही खरे वाटणार नाही. या गुणी कलावंताचा सन्मान दिल्लीच्या संगीत नाटक अकादमीने नुकताच केला. पुढल्या महिन्यात हा 'तरुण' कलाकार पॅरिस येथे चालू असलेल्या भारत–फ्रान्स महोत्सवासाठी जात आहे. आपला गोंधळाचा कार्यक्रम पेश करण्यासाठी.

चार–पाच वर्षांपूर्वी मुंबईच्या इंडियन नॅशनल थिएटर या संस्थेने एक मोठा भक्तीसंगीत महोत्सव आयोजित केला होता. त्यामध्ये राजारामभाऊंना मी प्रथम पाहिले. अनेकांच्या नजरेत ते भरले. त्यानंतर नुकताच गेल्या मार्चमध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने सोलापूरला लोककला महोत्सव आयोजित झाला होता. त्याही वेळी कदमांचा कार्यक्रम झाला होता. त्याच वेळी मनाशी पक्के केले की, या कलावंताचा कार्यक्रम पुण्यात करायचा आणि त्यांचा यथायोग्य सन्मानही करायचा. या संबंधात पुण्यातल्या काही लोकांशी बोलणे झाले आणि ॲक्टिव्ह थिएटर्स या संस्थेने सत्काराची कल्पना उचलून धरली. प्रत्यक्षात ती उतरवली.

राजारामभाऊ कदम यांचे घराणे गोंधळी समाजातले. पिढ्यान्‌पिढ्या त्यांच्या घरातील लोक गोंधळाच्या कार्यक्रमावर आपला उदरनिर्वाह करीत आहेत. गोंधळी लोकांमध्ये दोन प्रकार प्रामुख्याने असतात. एक म्हणजे पोतराज गोंधळी आणि दुसरा प्रकार म्हणजे आख्यानी गोंधळी. कदम हे दुसऱ्या प्रकारातले गोंधळी आहेत. आरंभीचे देवीचे स्तवन झाल्यावर ते एखादे आख्यान लावतात. राजारामभाऊंना जेव्हा मी सोलापूरला विचारले की, तुम्ही पुण्याला आलात तर किती वेळाचा कार्यक्रम करू शकाल? तेव्हा ते सहजपणे म्हणाले की, तुम्ही म्हणाल तितका वेळ, किमान सहा ते आठ तास मी सहज आख्यान लावीन! यावर अवाक् होण्यापलीकडे मी काहीच करू शकलो नाही!

पण ते जे म्हणाले, त्याचा प्रत्यय शनिवारच्या पुण्याच्या कार्यक्रमात झाला. त्यांनी तास सव्वातासच आपला गोंधळाचा कार्यक्रम केला; पण शेकडो प्रेक्षकांना शब्दशः मंत्रमुग्ध केले. त्यांचा कार्यक्रम पाहाताना राजारामभाऊ हे नव्याण्णव वर्षांचे असतील असे सांगूनही खरे वाटत नव्हते. कारण त्यांचे शरीर ज्या पद्धतीने रंगमंचावर हालत होते ते पाहून वयाचा विसर केव्हाच पडला होता. रंगभूमीच्या संदर्भात नेहमी असे म्हटले जाते की वादक आणि वाद्य ही दोन्हीही नटच असतो. त्याचे शरीर सर्वात महत्त्वाचे माध्यम. त्याच्या शरीराची, आविष्काराची भाषा ही रंगभूमीची भाषा. याचा प्रत्यय त्यांचा अभिनय पाहताना येत होता. त्यांनी केलेला पदन्यास, डोळ्यांचा, मुद्रेचा केलेला मूकाभिनय हे शब्दांपेक्षा खूप काही सांगून जात होते. त्यांचा एकूणच रंगाविष्कार पाहात असताना असे सतत वाटत होते की, अभिनयासंबंधी जे जे म्हणून काही ग्रंथकाराने, सिद्धांतकाराने लिहिले गेले आहे त्यातली अनेक तत्त्वे–सिद्धांत हा अनपढ माणूस लिलया आपल्या समोर सर्मूत करीत आहे. कलेच्या क्षेत्रात अभ्यासाने, विचाराने, परिश्रमाने किंवा शिक्षणाने काही गोष्टींचे आकलन होते, भान येते हे तर खरेच आहे; पण दुसरा कलावंतांचा वर्ग असा आहे की तो उपजतच सारे काही करतो. त्याला शास्त्राचे भान वेगळ्या अर्थाने असते. तो स्वयंभू, स्वयंपूर्ण असतो. कदम त्यातले आहेत.

या कलावंताच्या सन्मानासाठी तितकाच महत्त्वाचा माणूस बोलावणे अगत्याचे होते. कदमांचे वय ध्यानी घेता त्यांच्यापेक्षा वडीलधारा माणूस निदान कलाक्षेत्रात मिळणे अवघड. म्हणून अनेक अर्थांनी सन्मानित झालेले विजय तेंडुलकर यांना पाचारण केले. सत्कारानिमित्ताने तेंडुलकर जे बोलले ते खरोखरीच मननीय, चिंतनीय होते. ते म्हणाले '...राजारामभाऊ कदम यांची अद्भुत कला पाहिली तेव्हा कलाकाराची कुठल्या ना कुठल्या मूल्यांवर श्रद्धा हवी, कलाकारात मूल्यांची प्रतिष्ठापना झाली पाहिजे याचे प्रत्यंतर येते.' कदमांच्या गुणांचा गौरव करून तेंडुलकरांनी एका मुद्द्यावर विशेष भर दिला, तो म्हणजे राजारामभाऊंची देवीवर अपार श्रद्धा आहे. कलेचा आविष्कार तीच करवते अशी त्यांची भावना आहे. प्रत्येक ज्येष्ठ कलाकाराच्या अंतरंगात एक देवी असते, मग तिला नाव कोणतेही असेल. हे देवीचे अधिष्ठान मग तिला काही श्रद्धा म्हणोत वा चैतन्य, ती कलेच्या आविष्कारातून दिसत असते. धार्मिकतेकडे आपण तुच्छतेने बघतो; पण धार्मिकता डोळसपणाही देऊ शकते. श्रद्धाही डोळस असावी मोठ्या कलावंताचा सत्कार समुदायाने, रसिकांनी करायचा असतो, त्यांनी दिलेली दाद हाच त्याचा सत्कार असतो. असे त्यांचे सत्कार प्रत्येक ठिकाणी होतच राहणार आहेत.'

तेंडुलकर म्हणाले ते खरेच आहे. त्या दिवशीही रसिकांनी उदंडपणाने दाद देऊन

राजारामभाऊंना अभिवादन केले. पुनःपुन्हा टाळ्या वाजवून, हारतुरे देऊन सन्मानित केले. कार्यक्रमानंतर तर त्यांच्याभोवती गराडा पडला. हा सोहळा अनुभवीत असताना सतत वाटत होते की, ॲक्टिव्ह थिएटर्सने या निमित्ताने मोठे काम केले. (राजारामभाऊबरोबरचे त्यांचे साथीदार त्यांचा मुलगा, पुतण्या, नातू-रामकृष्ण कदम, दिगंबर कदम, पांडुरंग कदम आणि सूत्रधार रामकृष्ण ढेरे यांचाही सत्कार झाला.) पण अशा कलावंतांच्या कार्यक्रमासाठी, सत्कार–सोहळ्यासाठी कायमची यंत्रणा हवी, संस्था हवी.

राजारामभाऊ कदम खाजगीत बोलताना म्हणाले की, 'परभणीच्या मातीत (उकिरड्यात) पडलेले हे रत्न लोकांच्या ध्यानात यायला वयाची ९२–९३ वर्षे घालवावी लागली... !' मी निरुत्तर झालो. यावर काय बोलणार ? □

चित्रपट

# पाताल भैरवी

## मनोरंजनासाठी आता जादूचा आधार

जितेंद्र, श्रीदेवी, जयाप्रदा, कादरखान, भप्पी लाहिरी अशा मंडळींना हाताशी धरून त्याग, हिंसाचार, प्रेम, आणि थोडा आचरटपणा या सगळ्यांची खिचडी असलेला दक्षिणी फॉर्म्युला पडद्यावर आणण्यात आला. प्रथम 'हिंमतवाला' यशस्वी ठरल्यावर आणि 'मवाली', 'तोहफा' अशा चित्रपटांनीही भरघोस यश मिळवल्यावर या प्रकाराचे भरमसाट चित्रपट आले. जितेंद्र या सगळ्या चित्रपटांचा हुकुमी एक्का होता. कादरखाननेही या चित्रपटांसाठी त्याच कथा, संवाद लिहिण्यात आणि भप्पी लाहिरीने त्याच पद्धतीच्या चाली देण्यात धन्यता मानली; पण गेल्या काही महिन्यात या फॉर्म्युलानेच तयार केलेले 'हकीकत', 'बलिदान' 'सरफरोश' हे चित्रपट बॉक्स ऑफिसवर धडाधड कोसळले. त्यामुळं हेच सगळे लोक घेऊनही आपण नवं काही तरी मनोरंजक देतोय असं भासवायचा प्रयत्न पद्मालय पिक्चर्सनं आपल्या 'पाताल भैरवी' त केला आहे.

वरवर पहाता 'जादूटोणा' 'हातिमताई' अशा प्रकारच्या चित्रपटांच्या रांगेत शोभेल अशी 'पाताल भैरवी' ची जातकुळी आहे. त्यातली जादू, नेत्रदीपक सेटस् यामुळं बालप्रेक्षकांचीच तो अधिक करमणूक करतो. अर्थात हा मुलामा असला तरी नेहमीच्या फॉर्म्युलाचे 'गुण' यातही आहेतच.

उज्जैनच्या राजांची (प्राण) इंदुमती (जयाप्रदा) ही एकुलती एक, सुंदर मुलगी. राज्यात दरवर्षी आपलं शौर्य दाखवायची संधी दसऱ्याच्या दिवशी तरुणांना मिळत असते. रामू (जितेंद्र) आपलं साहस दाखवून राजकुमारीच्या हस्ते बक्षीस मिळवतो. आता आपल्याच राज्यातल्या इतक्या साहसी तरुणाच्या प्रेमात राजकुमारीनं पडणं हे ओघानंच येतं. पुन्हा तो राजाच्या माळ्याचा मुलगा म्हणजे गरीब–श्रीमंत असा तथाकथित संघर्ष दाखवायचीही सोय झाली.



राजकुमारीच्या सावत्र आईचा (बिंदू) भाचा चंचल (अमजदखान) हा राज्याचा महामंत्री असतो. त्यालाही राजकुमारीशी लग्न करायची इच्छा असते. पण रामूमुळं त्याचा सगळाच बेत धुळीला मिळतो. खुद्द राजालाही राजकुमारी आणि रामू यांचं प्रेमप्रकरण पसंत नसतं. त्यामुळं रामू जेव्हा इंदूशी लग्न करायची इच्छा व्यक्त करतो तेव्हा राजा त्याला तिच्यायोग्य होण्यासाठी काही तरी बनून दाखव असा सल्ला देतो.

आता रामू तसा वयानं बराच मोठा दिसत असला तरी तो आणि त्याचा मित्र हनुमान (शक्ती कपूर) हे भटकण्याशिवाय काहीच उद्योग करत नसतात. त्यामुळं राजाच्या अटी कशा पूर्ण कराव्यात हा गहन प्रश्न असतोच. तो सोडवण्यासाठी दिग्दर्शकानं एका मांत्रिकाची योजना केली आहे. हा मांत्रिक (कादरखान) जादूविद्येत पारंगत असला तरी त्यात प्रभुत्व मिळविण्यासाठी त्याला पातालभैरवी नामक देवीची कृपा संपादणं आवश्यक असतं. तिला बळी देण्यासाठी योग्य अशा तरुणाच्या शोधात असतानाच त्याला रामू भेटतो.

त्याला फसवून बळी देण्यासाठी म्हणून मांत्रिक त्याला पातालभैरवीच्या गुहेत घेऊन जातो; पण रामूला त्याचा बेत कळल्यानं तोच मांत्रिकाचा वध करून पातालभैरवीची मूर्ती घेऊन परततो. तिच्या साहाय्याने तो महाल, अफाट वैभव मिळवतो आणि राजकन्येशी त्याचा विवाहही ठरतो.

पण एवढ्यात चित्रपट आटपला तर १९ रीळात काय दाखवणार ? म्हणून दिग्दर्शकानं मांत्रिकाला परत त्याच्या शिष्याच्या साहाय्यानं जिवंत केलाय. तो बरोबर रामू आणि राजकन्येच्या लग्नाच्या दिवशीच तिला त्याच्या महालासकट पळवून नेतो.

अर्थात रामू सर्वगुणसंपन्न असल्यानं तो अनेक देवतांच्या आशीर्वादानं आणि जादूचा गरुड, शाल, चढाव यांच्या साहाय्यानं या सगळ्यावर मात करून पुन्हा आपलं वैभव मिळवतो.

'पाताल भैरवी' चं वैशिष्ट्य म्हणजे

त्यातले नेत्रदीपक सेटस्. राजवाडा,मांत्रिकाची गुहा, पाताल भैरवीची गुहा हे सगळं अतिशय भव्यपणे उभारण्यात आलं आहे. असे सेटस् आणि जादूच्या निरनिराळ्या वस्तू यामुळं हा चित्रपट पाहताना बालप्रेक्षकांची चांगलीच करमणूक होत असल्याचं जाणवत होतं. लहान मुलांसाठी आपल्याकड मनोरंजक चित्रपट नाहीत अशी तक्रार आता तरी कोणी करायला नको !

चित्रपटाचं संगीत अर्थातच भप्पी लाहिरीचं आहे. जितेंद्र–जयाप्रदाला तसंच इतरानाही कवायतीपूर्ण नृत्य करता यावं अशा पद्धतीनं त्यानं चाली बांधल्या आहेत. या चित्रपटातलं येसूदासच्या आवाजातल एकच गाणं असं आहे की, ज्यावर नृत्य नाही. किंबहुना *त्याच्यावर नृत्य करायला वावच* नाही. डिंपल कापडियाच्या तोंडी असलेल गाणं सलमा आगानं म्हटलेल आहे हे एक विशेष. कारण यापूर्वी दुसऱ्या अभिनेत्रीसाठी तिने आपला आवाज दिलेला नाही.

रामूचं काम जितेंद्रनं केलं आहे. या वयातही तो छान नाचू शकतो आणि तरुण असल्याचा आभास यशस्वीपणे निर्माण करू शकतो हे विशेष. जयाप्रदा राजकुमारी इंदूच्या भूमिकेत सुंदर दिसते. शक्तीकपूरनं या वेळेस थोडा बदल म्हणून खलनायकाऐवजी नायकाच्या मित्राच काम केल आहे. अर्थात तिथही त्यानं नेहमीसारखा आचरटपणा केलेलाच आहे.

चंचलच्या भूमिकेत अमजदखान आहे. त्याच्यासारख्या अभिनयाची क्षमता असलेल्या कलाकारानं इतकी वाईट भूमिका स्वीकारावी याचं खरोखर वैषम्य वाटतं. इतर भूमिकात प्राण, बिंदू, असरानी, निरूपा रॉय आहेत. पाहुणी कलाकार म्हणून डिंपल एका गाण्यापुरतीच दिसते; पण त्यात विलक्षण आकर्षक दिसल्यानं ती आपली छाप पाडून जाते.

—सीमा कुलकर्णी

विज्ञान

# मोती : खरे आणि खोटे

स्वाती नक्षत्राच्या पावसाचे थेंब सागराच्या तळाशी असलेल्या शिपल्यामध्ये पडले की त्यापासून मोती तयार होतात, ही प्राचीन भारतीय वाङ्मयातील कविकल्पना झाली. अनेक देशातील पुराण कथामध्ये पावसाच्या थेंबापासून शिपल्यामध्ये मोती तयार होतात असेच उल्लेख आढळतात. प्रत्यक्षात पावसाचे थेंब सागरपृष्ठावर पडले की ते सागरात विलीन होऊन जातात, शिवाय ज्या शिपल्यामध्ये मोती तयार होतात ते शिपले समुद्राच्या तळाशी असलेल्या खडकांना घट्ट चिकटलेले असतात. पावसाचे थेंब झेलण्यासाठी हे शिपले सागरपृष्ठावर येण्याची शक्यता नसते. तेव्हा पावसाचे थेंब शिपल्यात पडण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मोत्यांची निर्मिती शिपल्यामध्ये होते ही मात्र वस्तुस्थिती आहे टपोऱ्या चमकदार मोत्याची माळ पाहताच क्षणभर का होईना हरवून न जाणारी स्त्री जगात शोधून सापडणार नाही. त्यातही अमेरिकन स्त्रियाना मोत्याच्या दागिन्याचे फारच वेड आहे.

समुद्रातील शिपले आणि कालवे यामधील मृदुकाय प्राणी नेकर नावाचा क्रीमसारखा पदार्थ निर्माण करतात. शिपला बाहेरून कितीही ओबडधोबड आणि अनाकर्षक असला तरीही त्याची आतली बाजू मात्र चमकदार व आकर्षक असते प्रत्येक शिपल्यामध्ये निर्माण होणारे नेकर हे त्या शिपल्याच्या आतल्या बाजूच्या रंगाचे व तेवढेच चमकदार असते. नेकरमुळेच शिपल्याची आतील बाजू चकाकणारी बनते. शिपल्यामध्ये किंवा कालवामध्ये एखादा रेतीचा कण किंवा सूक्ष्म प्राणी प्रवेश करतो तेव्हा या बाह्यपदार्थाचा सल शिपल्यातील मृदुकाय प्राण्याला जाणवू लागतो. शिपल्यातील नेकर निर्माण करणाऱ्या पेशी क्रियाशील बनतात व नेकरची निर्मिती सुरू होते. रेतीचा कण किंवा सूक्ष्म प्राण्याभोवती नेकरची पुटे चढू लागतात. कित्येक वेळा नेकरची पुटे चढू लागताच सूक्ष्म प्राणी शिपल्यातून सुटका करून घेतो परंतु एकदा क्रियाशील बनलेल्या पेशी नेकरची निर्मिती चालू ठेवतात नेकरची अनेक पुटे एकावर एक निर्माण होऊन शेवटी मोती निर्माण होतो. शिपल्याच्या आतल्या बाजूला जो रंग व ज्या प्रकारची चकाकी असते त्या रंगाचे व तशाच प्रकारची चकाकी असलेले मोती तयार होतात.

मोत्याचा रंग केवळ पांढरा शुभ्र असतो असे नाही तर गुलाबी, नारिंगी, राखाडी, निळसर आणि हिरवट अशा विविध छटाचे मोती तयार होतात. काही मोत्याचा रंग चक्क *काळा असतो. काळ्या मोत्याना* सर्वात जास्त चकाकी असते व त्यामुळे ती सर्वात जास्त मौल्यवान असतात. साहित्यिकांनी सुंदर दंतपंक्तीचे वर्णन करताना केवळ ‘मोत्यासारखी’ एवढेच विशेषण वापरून चालणार नाही, तर रंगसुद्धा नमूद करणे आवश्यक आहे. तथापि मोत्याचे रंग व आकार यामधील विविधतेमुळे कोणत्याही दंतपंक्तीना मोत्याच्या माळेची उपमा द्यायास हरकत नाही.


उत्तम दर्जाचे चमकदार मोती तयार होण्यासाठी ज्या प्रकारचा नेकर निर्माण व्हावा लागतो तो फक्त समुद्रातील ‘पर्ल आयस्टर’ या कालवामध्येच तयार होतो. तर शिपल्यात निर्माण होणाऱ्या मोत्याना म्हणावी तशी झळाळी नसते. पर्ल आयस्टरच्या अनेक जाती असतात. लॅमीलीब्रँकीया, पिंक्टाडा, मेलियाग्रीना आणि युनिओ इत्यादी शिपल्यात चांगले मोती तयार होतात. यापैकी युनिओ हा गोड्या पाण्यातला शिपला ब्रिटनच्या उत्तर भागात सापडतो. *पिंक्टाडाच्या अनेक उपजाती* अमेरिकेचा पॅसिफिक किनारा, ऑस्ट्रेलियाचा उत्तर किनारा, कॅलिफोर्नियाचे आखात, पर्शियन आखात इत्यादी ठिकाणी सापडतात. भारतीय पर्ल आयस्टर (पिंक्टाडा व्हल्गॅरिस)

प्रामुख्याने कच्छचे आखात, खंबायतचे आखात व मानारच्या आखातामध्ये सापडतात. मौल्यवान मोती हे समुद्रात सापडणाऱ्या कालवामध्ये निर्माण होत असले तरीही मिसिसिपी नदीतील शिंपले व उत्तर ब्रिटनमधील गोड्या पाण्यातील शिंपल्यामध्येसुद्धा दर्जेदार मोती निर्माण होतात असे आढळून आले आहे. मिसिसिपीमधील शिंपल्यात गुलाबी रंगाचे मोती आढळतात.

सर्वसामान्य शिंपले आणि पर्ल आयस्टरमध्ये फरक असतो. इतर शिंपल्यांची बाहेरची बाजूसुद्धा स्वच्छ व चमकदार असते तसेच त्यांच्या दोन्ही शिंपल्या सारख्याच असतात. पर्ल आयस्टरचा एक शिंपला मोठा व दुसरा लहान असतो. शिवाय बाहेरच्या बाजूने पर्लआयस्टर खडबडीत व बेढब दिसतो. त्याच्या कडा लाटा-लाटांसारख्या नागमोडी असतात. पृष्ठभागावर लाटांसारख्या रेषा असतात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे इतर शिंपले हालचाल करतात, एका ठिकाणाहून दुसरीकडे जावू शकतात; पण पर्लआयस्टर खडकाला अथवा दगडांना घट्ट चिकटून राहतो.

एखादे मोती कापून सूक्ष्मदर्शकाखाली त्याचा छेद तपासला तर मोत्यामध्ये अनेक पुटे किंवा थर आढळतात. हे थर अरगोनाइट या खनिजाच्या सूक्ष्म स्फटिकांचे असतात. हे सर्व स्फटिक कांचिओलीन या द्रव्याने एकत्र जोडलेले असतात. अरगोनाइट हा कॅल्शियम कार्बोनेटचा खनिज प्रकार आहे. शुद्ध अरगोनाइट पांढरे शुभ्र असते. अशुद्धतेमुळे त्याला वेगवेगळ्या रंगछटा प्राप्त होतात. मोत्यामधील अरगोनाइटच्या सूक्ष्म स्फटिकावर प्रकाश किरण पडल्यावर त्यांचे वक्रीभवन होऊन बदलत्या रंगछटा दिसतात व त्यामुळेच मोत्यांना झळाळी प्राप्त होते. या गुणधर्माला जवाहिरे 'ओरिएंट' असे म्हणतात. इतर शिंपल्यामध्ये आकाराने मोठे व विविध रंगांचे मोती तयार होत असले तरीही केवळ पर्लऑयस्टरमध्ये निर्माण होणाऱ्या मोत्यांमध्येच 'ओरिएंट' हा गुणधर्म आढळतो. मोत्यामध्ये रासायनिक विघटन केल्यावर ८२ ते ८४ टक्के कॅल्शियम कार्बोनेट, १० ते १४ टक्के कांचिओलीन व २ ते ४ टक्के पाणी आढळते.

समुद्राच्या तळाशी असलेल्या शिंपल्यामध्ये योगायोगानेच रेतीचा कण किंवा अन्य बाह्य पदार्थ जातो व त्यामुळे मोती निर्माण होतात. असे अनेक शिंपले बुडी मारून काढावेत तेव्हा त्यातल्या काही शिंपल्यात मोती आढळतात



इंडियन पर्ल ऑयस्टर

व त्यातले फारच थोडे मोती मौल्यवान असतात. म्हणजेच या सर्व खटाटोपामध्ये योगायोगाचा भाग जास्त असतो. त्यामुळे कृत्रिमरित्या मोती तयार करण्याचा मानवाने प्रयत्न केला नाही तरच नवल. बाराव्या शतकामध्ये सर्वप्रथम चिनी लोकांनी कृत्रिम मोती तयार करण्याची कला प्राप्त केली; परंतु ती फारच चिकट व न परवडणारी होती. नंतरच्या काळात स्विडीश वनस्पती शास्त्रज्ञ कॅरोलस लिनस याने कृत्रिम मोती तयार करण्याच्या दृष्टीने पुढचे पाऊल टाकले. परंतु इ. स. १८९६ मध्ये जपानमधील टोबा येथील कोकीची मिकिमोटो याने मोठ्या प्रमाणावर कृत्रिम मोती तयार करण्यात यश मिळविले. त्यानंतर आर्थिकदृष्ट्या किफायतशीर अशी कृत्रिम मोती तयार करण्याच्या दृष्टीने जपानमध्ये मोठ्या प्रमाणावर संशोधन होऊन इ. स. १९०९ मध्ये 'जापनीज ब्यूरो ऑफ फिशरीज' मधील टी. निशिकावा या संशोधकाने पूर्ण गोलाकार व टपोरे मोती तयार करण्याचे तंत्र विकसित केले. आज कृत्रिम मोती तयार करण्याच्या व्यवसायात जपानची मक्तेदारी आहे. अमेरिकेच्या संयुक्त संस्थामध्ये मोत्यांना मोठ्या प्रमाणावर मागणी असल्यामुळे त्या देशाने कृत्रिम मोती तयार करण्याच्या बाबतीत अनेक वेळा प्रयत्न केले; परंतु ते आर्थिकदृष्ट्या अयशस्वी झाल्यामुळे सोडून देण्यात आले.

कृत्रिम मोत्यांना कल्चर्ड मोती असेही म्हणतात. कृत्रिम मोती निर्मितीची प्रक्रिया नैसर्गिकच असते, परंतु त्यासाठी कृत्रिम परिस्थिती निर्माण केली जाते व त्यावर मानवाचे नियंत्रण असते. लहान लहान पर्ल आयस्टर्स खास तयार केलेल्या आयस्टर–बेडस्‌मध्ये तीन वर्षेपर्यंत ठेवून त्यांचे संगोपन केले जाते. त्यानंतर प्रशिक्षित तज्ज्ञ प्रयोगशाळेमध्ये आयस्टर्सचे शिंपले काळजीपूर्वक उघडून त्यामध्ये अलगदपणे शिंपल्याचा सूक्ष्म तुकडा सोडतात. असे ऑयस्टर्स नंतर खास तयार केलेल्या पिंजऱ्यामध्ये रचून हे पिंजरे किनाऱ्याजवळच्या शांत समुद्रात बुडवून ठेवतात. दर दोन वर्षांनी पिंजरे बाहेर काढून त्यातील पर्ल आयस्टर्स स्वच्छ केले जातात. पिंजऱ्यात वाढलेल्या पाणवनस्पती काढून टाकल्या जातात व पिंजरे पुन्हा समुद्रात बुडवून ठेवले जातात. सात वर्षांनंतर आयस्टर्संचे शिंपले उघडून त्यामधून मोती बाहेर काढले जातात. सुमारे वीस शिंपले उघडावेत तेव्हा एक मौल्यवान व गोल आकाराचा मोती मिळतो. मोत्यांना पॉलीश करून त्यांची झळाळी खुलविली जाते. त्यांचे वर्गीकरण करून विक्री केली जाते. कल्चर्ड मोती तयार करण्याची प्रक्रिया किती कष्टाची व प्रदीर्घ आहे हे लक्षात येईल. कष्टाळू व प्रयत्नामध्ये चिकाटी व सातत्य ठेवणाऱ्या जपान्यानाच ती शक्य आहे. कल्चर्ड मोत्यांपैकी ७५ टक्के मोत्यांना अमेरिकेच्या संयुक्त संस्थानामध्ये खप असतो.

मोत्यांची माळा बनविण्यासाठी टपोरे व गोल आकाराचे मोती आवश्यक असतात. अशा मोत्यांना जास्त किंमत येते. त्याखालोखाल बटणाच्या आकाराचे मोती व पाण्याच्या थेंबाच्या आकाराचे मोती महत्त्वाचे असतात. कर्ण–आभूषणे तयार करण्यासाठी त्यांचा वापर केला जातो. इतर वेड्यावाकड्या आकाराच्या मोत्यांना व्यापारीदृष्ट्या महत्त्व नसते व त्यांना किंमत येत नाही. वेड्यावाकड्या आकाराचे असंख्य मोती जपान हिणकस माल म्हणून खोल समुद्रात फेकून देऊन दर्जा व किंमत यावर नियंत्रण ठेवतो

कल्चर्ड मोती नैसर्गिकरित्या पर्लआयस्टरमध्येच तयार होतात तर बनावट मोती मात्र पूर्णपणे कृत्रिमरित्या तयार केले जातात. पर्ल इसेन्स नावाचा चमकदार पदार्थ माशांच्या खवलापासून तयार केला जातो. काचेच्या लहान लहान गोलकावर या पर्ल इसेन्स क्रीमची अनेक पुटे कृत्रिमपणे चढविली जातात व खोटे अथवा बनावट मोती तयार केले जातात. गेल्या काही वर्षांमध्ये अनेक प्रकारचे सिंथेटिक पर्ल इसेन्स प्रयोगशाळेत तयार करण्यात यश आले आहे. काचेच्या अथवा प्लॅस्टिकच्या लहान गोलकावर त्यांचे थर देऊन टपोरे व चमकदार बनावट मोती तयार केले जातात. सर्वसामान्यांचा मोत्यांच्या आभूषणांचा शौक पुरा करतात ते हेच खोटे मोती.

–डॉ. सुभाषचंद्र सारंग

## सांस्कृतिक डोंबिवली

पृष्ठ ३ वरून

आकडा असतो वर अशा ठिकाणी काही शेकड्यांवा भाव फुटतो. त्यातील काही भाग्यवतांना गुणवत्तेनुसार, इतर सामान्य पामरांना न कळणाऱ्या महत्त्वाच्या कारणांनुसार प्रवेश मिळतो. त्यात काही धावरलेले धायकुतीला आलेले पालक भेटतात. 'अहो माझ्या मुलाला–मुलीला ऐंशी टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले पण त्याचे–तिचे नाव यादीत नाही.' मोठ्या मिनतवाऱ्या करून मुख्याध्यापकांची भेट घेतली तर त्यांनी सांगितले, 'तुमच्या पाल्याचे नाव यादीत कसे असेल? अहो तुमचा अर्ज वाऱ्याने उडून गेऽला' (ही वस्तुस्थिती आहे विनोद नाही). दुसऱ्याला उत्तर मिळाले, 'तुमचा अर्ज गहाळ झाला.' काय करणार बिच्चारे शाळाचालक? मग एखाद्याला प्रवेश देण्याचे भरघोस आश्वासन मिळते तर दुसऱ्याला सांगितले जाते 'तुम्हाला जिल्हा परिषदेकडूनच प्रवेश मिळवावा लागेल. आम्हाला जितक्या जागा भरावयाची परवानगी होती तितक्या भरल्या. ज्यादा जागाची परवानगी जि. परिषदेकडून मिळवा' तो पालक मग जिल्हा परिषदेचे केंद्र जूनमध्ये–एक महिना पालक-पाल्य अधातरी, गॅसवर–केव्हा, कोठे सुरू होणार त्याची वाट बघत राहतो.

देणगी कशी घेतली जाते? हुशारीने, गुपचूप, शहाजोगपणे, चारचौघा पालकादेखत, ह्या सर्वांचे मिश्रण करून जो आविर्भाव निर्माण होईल त्या पद्धतीने. पालक अगतिक असतो. तो साऱ्यालाच तयार असतो. काही ठिकाणी बाकी साऱ्या पावत्या–प्रवेश फी, अनामत रक्कम इ.–मिळतात; पण नेमकी देणगीची पावती मिळत नाही. ती मिळणार असते व्यासपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर. व्यासपौर्णिमा म्हणजे गुरुपौर्णिमा – म्हणजे गुरुदक्षिणेची म्हणून पावती. लक्षात घ्या हा मुहूर्त कधी कधी विकास निधी अशा गोंडस नावाची ही पावती असते. काही ठिकाणी पावतीचा पत्ताच नसतो. तेरी बी चूप मेरी बी चूप. सारा कश्रा एकमेकावरच्या गाढ विश्वासाचा मामला जमून जातो तरीसुद्धा काहीजण म्हणतातच की 'विश्वास पतन पावला पानीपती.' देणगीशिवाय प्रवेश नाही आणि देणगीशिवाय शाळा चालविता येणेच शक्य नाही असे सांगितले जाते. त्यातून मार्ग काढावयाचा कोणी?

डोंबिवलीसारख्या ठिकाणी सारेच पालक देणगी देऊ शकणारे नाहीत. एक कमावणारा आणि चार–सहा खाणारे अशी पांढरपेशी कुटुंबे आहेत. त्याचप्रमाणे घरोघर जाऊन धुणी–भांडी करणाऱ्या, रोजदारीवर काम करणाऱ्या, हातावर ज्याचे पोट आहे अशा पालकांची संख्या कमी नाही. त्यांनी काय करावयाचे? जिल्हा परिषदेच्याच शाळेत त्यांनी आपल्या मुलांना का पाठवायचे? त्यासुद्धा धड आणि पुरेशा कोठे आहेत? त्या पालकाना वाटत असते की आपल्या मुलामुलींने चांगल्या शाळेत जाऊन शिकावे, त्याच्यातरी वाट्याला आपल्यासारखे जीणे येऊ नये. त्यांच्याकडे देणगी देण्यासाठी एवढी रक्कम नसते आणि घरातील, आजूबाजूची परिस्थिती, वातावरण, शिक्षणाला पोषक, अनुकूल नसते. त्यामुळे त्या मुलाची शैक्षणिक प्रगती टक्केवारीच्या दृष्टीने जेमतेमच असते. अशा मुलाचे काय? त्यांच्या वर्तमान आणि भविष्याचे काय? घरची परिस्थिती साधारण आहे आणि शिक्षणातही फारशी गती नाही त्याचे काय?

'इतके पैसे मोजले तरच प्रवेश' 'पैसे देऊन पावती मिळणार नाही,' हे सारे संवाद त्या मुलाच्या ऐन आयुष्याच्या सुरुवातीला त्याच्यासमोरच चालतात. ते वैतागलेले पालक त्या कोवळ्या मुलासमोर (ज्याच्यासाठी शोभा भागवत 'गाराचा पाऊस' लिहितात आणि लीला पाटील 'ऐलमा पैलमा' लिहितात तीच ही मुले) त्या शाळांचा अस्सल वेचक, इरसाल शब्दात उद्धार करतात. ज्याचे बालपण अशा तऱ्हेच्या संस्कारापासून सुरू होते त्यांच्या जडणघडणीत व्यक्तिमत्त्व विकास होत असताना हे विष हळूहळू मिसळू, भिनू लागते त्याचे काय? उद्याची सांस्कृतिक पातळी कशी असेल हे सांगायला होरारत्नाची गरज नाही. हा प्रश्न फक्त डोंबिवलीकरांचाच आहे असे नाही तर साऱ्या मोठा आकार घेऊ पाहाणाऱ्या शहरांचा, नगरांचा आणि महानगरांचाही आहे. दिव्याखालील-ज्ञानाला ज्योत म्हणतात ना–अंधार वाढतो आहे. तो दूर करण्याचा प्रयत्न कोणीच करीत नाही. ह्या देशातील सर्वात दुर्लक्षित विषय म्हणजे शिक्षण आणि आजच्या युगातील प्रगतीचा मूलमंत्र, सर्वात महत्त्वाचा विषय म्हणजेही शिक्षणच. ह्या देशात ही सांगड कशी घालणार? कोण घालणार? काळपुरुष समाजापुढे असंख्य प्रश्न उभे करतो आहे. त्याची सोडवणूक करण्याची आपली तयारी नाही, इच्छा नाही हाच त्याचा इत्यर्थ.

— चंद्रशेखर राजे

सांस्कृतिक धुळे

# 'आनंदयात्रा'

धुळे येथे 'सार प्रतिष्ठान' ह्या संस्थेतर्फे दहा ते पंधरा ह्या वयोगटातील मुलांकरिता 'गुणवत्ता संवर्धन शिबीर' घेण्यात आले. सुमारे पाचशे वेगवेगळी पुस्तके होती. वक्तृत्वस्पर्धा, निबंधस्पर्धा, स्मरणशक्तीस्पर्धा अशा अनेक स्पर्धा घेण्यात आल्या. सुमारे नव्वद मुले शिबिरात सहभागी होती. १५ एप्रिल ते २ जून हे शिबीर सुरू होते. त्याचा समारोप दोन जूनला त्या संस्थेच्या व्यंकटेश सभागृहात घेण्यात झाला. त्यानिमित्ताने सौ. प्रभा बेंकर ह्यांचा त्या कार्यक्रमाचा आढावा घेणारा हा लेख.

ती सुरम्य संध्याकाळ. सनईच्या मजुळ स्वरानी व्यंकटेश हॉल 'नादावला' होता. पाखरासारखी मुलं किलबिलत होती. दुडदुडत होती. कुजबुजत होती. खुदखुदु हसत होती. तर मध्येच मोठ्यांची उपस्थिती जाणवून गप्प होत होती. ओठातल्या ओठात मिस्कील हसत होती. जणू काही बालकवींच्या 'आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे' या कवितेतला आनंदच सारीकडे भरून ओसडत होता. 'या बालांनो, या रे या, लवकर भरभर सारे या' म्हणत एकमेकांचा हात धरून चिमणी पावलं हलकेच आत येत होती नि त्यांच्या मागोमाग उत्सुक चेहऱ्याचे पालक ... काही निमंत्रित इ. इ. काय

चालल होत तिथ ? तर 'सार प्रतिष्ठानन' दीड महिना चालवलेल्या गुणवत्ता सवर्धन शिबिराचा आज समारोप होता !

अलीकडे शासनाच्या कृपेन चालणाऱ्या विविध योजनामुळे काही शब्दांचा मूळचा अर्थ अगदी लोपत चालला आहे. उदा. शिबीर म्हटलं की, आणि गुणवत्ता संवर्धन ? बाप रे, ही काय भानगड ?. गुणवत्ता–शोधायची कशी ती ? आणि कोणामधली ? आपले तर 'सगळे गुण' उधळून झालेले असतात ! सवर्धन ? आम्ही भलत्याच गुणाचं 'सवर्धन' करीत असतो. कारण एकच–आम्ही आता 'घोडे' झालेले आहोत. वाळल्या मातीच्या गोळ्याला आकार देता येत नाही. वाढलेल्या झाडाच्या फाद्या वळवता येत नाहीत. तशा जन्माच्या सवयी–भल्या वा बुऱ्या मरेपर्यंत जात नाहीत. मग ? कुणाच्या गुणांच संवर्धन करायचं ? 'आम्ही बी घडलो, तुमी बी घडाना–की (बिघडाना ?)' म्हणत कुणाला घडवायच ? उगवत्या–लसलसत्या कोवळ्या अकुरांना– ज्यांच्या हरणासारख्या काळ्याभोर आणि गाईसारख्या निष्पाप डोळ्यात अजून रगीबेरंगी स्वप्न तरळताहेत, ज्याच्या गुलाबी, कोवळ्या तळव्यावरच्या रेषा अजून गडद व्हायच्या आहेत, ज्याची दुडदुडणारी गोजिरवाणी पावलं रस्ता शोधताहेत त्या चिमणुल्या बालगोपालाना ! माय गॉड ! केवढं कठीण काम आहे हे ? घरातल्या घरात प्रयोग करून पहा, चिरंजीवाना एक तासभर तरी एका जागेवर बसवता येईल का ? ही तर चैतन्याला जाग आलेली बाळं ? असंख्य प्रश्नचिन्हाच प्रतीक, हातापायाला अखंड उद्योग हवा असतो, मेंदूला खुराक हवा असतो, डोळे भिरभिरत असतात, पाहिलेल्या न पाहिलेल्या असंख्य गोष्टीचं कुतूहल फसफसून वाहत असत. तर हे अत्यत अवघड अस आव्हान लीलया पेललं मीरा–मुकुंद या 'घडपडणाऱ्या' जोडीनं ('घडपडणाऱ्या मुलात' या जोडीचा समावेश अवश्य करायला हवा. त्याचं हे 'घड–पडणं' मात्र अतिशय सुदर आहे.) आणि– 'बाई ग ? आता शाळाना सुट्या लागल्या. ही मुलं दिवसभर नुसती हुदडणार, उंडारणार आणि भंडावून सोडणार ! कारण अभ्यासाला बसा म्हणण्याची सोयच नाही.' अस म्हणणाऱ्या पालकांनी या शिबिरात आपली बाळं अडकवून सुटकेचा निश्वास सोडला. मुलांसाठी मनोरंजन, ज्ञान, कलाविकास वगैरे वगैरे भरगच्च कार्यक्रम करता यावेत या दृष्टीनं त्यानी शिबीराची योजना केली.

मुलांना वाचनाची गोडी लागावी आणि त्यातूनच संस्कार घडावे यादृष्टीनं आजकाल दुर्मिळ असलेल्या 'श्यामची आई'पासून सावरकर, टिळक इत्यादी देशभक्तांवरील सर्व 'साहित्याची जत्रा' भरवली कधी मुलानीच, हार्मोनियमवर सुरेल सगीत सादर केले. कधी प्र. अ. पुराणिकाच कथा–कथन, सुषमा गरूड याच नृत्यनाट्य, किशोर पाठक यांचं काव्यगायन अशा अनेक गुणी बालमध्ये समरस होणाऱ्या 'बाल–मित्राना' बोलावून बालकाना त्यांचा सहवास घडवला, तर कधी मुलाकडून जादूचे प्रयोग तर कधी विज्ञानाचे प्रयोग, करवून घेतले. कधी पॅराशूटची, पर्वतारोहणाची माहिती ऐकवली. अशा प्रकारे ज्ञान, विज्ञान, तत्रज्ञान, नृत्य, नाट्य, संगीत, साहित्य, चित्रकला अशा जीवनाच्या विविध कला–दालनातून सुप्तावस्थेतल्या कलाकाराना प्रवेश मिळवून दिला आणि आपापले रस्ते शोधायला मदत केली. चाचपडणाऱ्या त्या पावलाना आपली पाऊलवाट सापडली का ? योग्य दिशा मिळाली होती का ? याचं सुखद प्रत्यतर त्या समारोपाच्या दिवशी अनुभवायला मिळाल. गधाली धाराशिवकर या चिमुकल्या लेखिकेन चक्क 'भाडणाच नाटक' लिहिल होत. एवढंच नव्हे तर त्यात भाग घेऊन अभिनयाची चुणूकही दाखवली. शिवाय आपल्या मधाळ आवाजात प्रॉम्प्टिंगची कुबडी न घेता त्या कार्यक्रमाच संचलनही यशस्वीपणे साभाळलं होत. ऋषिकेश शहा–बालकवी–स्वप्नाळू डोळ्याचा हा मुलगा कपाळावरचे केस सावरीत परीच्या सोबतीनं थेट आभाळात गेला आणि इंद्रधनुष्याच्या झुल्यावर बसून आनदानं झुलू लागला. अतिशय सकोचत, लाजत पण स्पष्ट शब्दात, कवितेची लय साभाळत त्यानं स्वरचित कविता ऐकवल्या आणि श्रोत्याना मंत्रमुग्ध करून टाकलं. महेशन नाट्यछटा या अस्तगत होत जाणाऱ्या कलेचं पुनरुज्जीवन करीत 'आता काय करावं' ही नाट्यछटा प्रभावीपणे सादर केली, तर महेंद्र सोनवणेने 'मूकाभिनय' करून दाखवला. काही मुलानी गोष्टीही लिहिल्या होत्या, तर एका निलेश काबरे या व्यंगचित्रकाराचाही मीराताईंना शोध लागला होता. (चला 'श्याम जोशी' नतर 'कादे पोहे' कोण बनवणार ? हा प्रश्न धुळेकरानी आताच सोडवला म्हणायचा !) आणि या साऱ्या कार्यक्रमाची सुरेख लय अगभर भिनत असतानाच आणखी 'एकच प्याला' झोकावा तसा किशोर पाठक यांचा 'माझ्या सगे गाणी गा' हा स्वर, शब्द आणि टाळ्यांचा सुरेख सगम असणारा, कळस चढवणारा कार्यक्रम !

किशोर पाठक– वयानं वाढलेलं हे गुणी बाळ नावाप्रमाणं अजून 'किशोर'च आहे, 'प्रौढत्वी निज शैशवास' जपणारा कवी आहे, याची साक्ष बाळाच्या रूपान त्यांनी कवितेतून विचारलेल्या प्रश्नावरून पटली. चिमुकल्या बाळाच्या आगमनापासून शाळेतल्या बाई, हेडमास्तर, परी इतकेच नव्हे तर पावसाच्या शाळेत जाणाऱ्या चांदण्यापर्यंत सर्वांची हजेरी घेतली गेली आणि रिंग रिंग रिंगण...अशा नादमय शब्दातून मजेदार उखाणीही त्यानी ऐकवली. वर–कडी म्हणून की काय 'उत्तर देतील ते हुशार, न देतील ते शहाणे' असं म्हणून आम्हा मोठ्यांनाही अडचणीत टाकलं ! मी अर्थातच 'शहाणी' म्हणून मूग गिळून बसले !

पण छे; बसलं होतं ते माझं जड शरीर; बालगोपालांच्या त्या आनंदयात्रेत, उद्याच्या कलाकारांसमवेत मी केव्हाच सहभागी झाले होते. फुलपाखरासारखी तरल होऊन भिरभिरत होते. केव्हा टाळ्या पिटत होते, हसत होते, तर केव्हा भान हरपून माझी पावलं नाचत होती. जल्लोष वाढत होता–पैंजण रूमझुमत होते – माझे– त्याचे ... आणि... सर्वांचेच !

–प्राजक्ता

# कुणी कोडे माझे उकलील का?

यदुनाथ थत्ते

राज्य परिवहन मंडळाच्या गाडीने प्रवास करणे माणसाला अटळ असते.

स्थानकावर अनेकविध दर्शने घडतात आणि न कळत प्रबोधन होते.

काही वेळा एस्. टी. च्या गाडीत काही नादुरुस्ती होते आणि स्थानकावर बराच वेळ वाट बघत राहावे लागते.

त्या दिवशी मला जुन्नरला जायचे होते. राजगुरूनगरच्या स्थानकावर चालकाला बसमध्ये काही तरी बिघाड असावा, अशी शंका आली.

दुरुस्तीसाठी अर्धा–पाऊण तास लागणार होता.

प्रवासी एकमेकांचे समाधान करत होते. 'नादुरुस्त गाडी मध्ये बंद पडली तर पंचाईत. त्यापेक्षा इथे थोडा उशीर झालेला परवडला' असा समंजस विचार.

'स्थानकातून बस निघण्यापूर्वी तिची नीट तपासणी का झाली नाही ? असा भलता प्रश्न कोणी विचारला नाही !

लघुशंकेसाठी स्वच्छता गृहात गेलो तो बाहेर त्यालगत त्याच आवारात एक गॅसप्लँट दिसले. ते पाहून बरे वाटले.

वाया जाणाऱ्या मलमूत्रादी राष्ट्रीय संपत्तीचा असा विनियोग करण्याची सद्‌बुद्धी, शाळा, सिनेमा थिएटरे, एस् टी. स्थानके इत्यादी ठिकाणी सुचली तर सहज लोकांना नवविज्ञानाची ओळख होईल.

माझे कुतुहल जागे झाले; पण इतर कोणाला काही वाटल्याचे दिसले नाही.

महाराष्ट्रात इतकी एस्. टी. ची स्थानके मी पाहिली, पण अशी योजकता कुठेच आढळली नव्हती.

गॅसप्लँटचे निरीक्षण केल्यावर माझा उत्साह काहीसा ओसरला. कारण त्याची अवस्था चांगली नव्हती !

गॅस वापरला जातो असे चिन्ह नव्हते. त्यातून जी खतद्रव्ये द्रवरूपाने बाहेर पडतात त्यांच्या विनियोगाचीही धड व्यवस्था दिसली नाही.

गॅसप्लँटसाठी खर्च झालेली रक्कम हीही उधळपट्टीच ठरली की काय ? अशी शंका मनात आली.

चांगल्या योजनेचे वाटोळे करण्यात इतके वाकबगार लोक जगाच्या पाठीवर इतर कुठे असतील तर देव जाणे !

तडक स्थानक व्यवस्थापकाच्या ऑफिसात चौकशीसाठी गेलो.

माझ्या चौकशीचे सर्वांनाच मोठे आश्चर्य वाटले ! असली चौकशी करणारा वेडापीर मी बहुधा पहिला असणार.

अशा प्रकारचे गॅसप्लँट आहे, याचीही दखल कोणाला दिसली नाही.

सौजन्य सप्ताह नसूनही माणसे सौजन्यशील होती. व्यवस्थापक म्हणाले, 'आगार व्यवस्थापकांना कदाचित माहिती असेल, पण ते तर आज इथे नाहीत !'

मी माझा पत्ता लिहून दिला व कळवायला सांगितले. 'पत्रकार नगर ह्या पत्त्याची जादू न कळत काम करून गेली असावी. त्यामुळे पुन्हा एकदा सौजन्यपूर्ण खेदप्रदर्शन झाले !

एस. टी. च्या कोणा सेवकालाही याबाबत काही माहिती असल्याचे आढळले नाही.

पुढे या गोष्टीचा पाठपुरावा कसा करावा, याचा विचार मी करत होतो.

एवढ्यात आगार व्यवस्थापकाचे पत्र आले. आश्चर्याचा आणखी एक धक्का. पत्रातला मजकूर असा–

'आपण रा. प. राजगुरूनगर स्थानकावर असलेल्या गॅसप्लँटबाबत केलेल्या चौकशीबाबत आपणास कळविण्यात येते की, सदर गॅस प्लँटचा काय उपयोग केला जातो याबाबतच्या उत्तरासाठी या कचेरीकडून मा. विभाग नियंत्रक रा. प. पुणे, शंकरशेट रोड, पुणे ४११ ०३७ याचे मार्फत आपणास कळवणेस विनंती करणेत येत आहे. आपणास उत्तर न आल्यास आपण कृपया विभाग–नियंत्रक याजकडे संपर्क साधावा. चौकशी सूचनेबद्दल धन्यवाद.'

सौजन्यपूर्ण पण सर्वस्वी निरर्थक उत्तर ! नोकरशाही लाल फितीचा हा एक अजब नमुना होता. गॅसप्लँट राजगुरूनगरच्या स्थानकाच्या हद्दीत; पण त्याचे उत्तर विभाग नियंत्रक पुण्यातून देणार !

मी अद्याप धीर सोडलेला नाही. कदाचित सरनियंत्रकांकडे चौकशी करण्याचे पत्र विभाग नियंत्रकाकडून येईल.

हा विचार माझ्या मनात औरंगाबाद स्थानक पाहिले तेव्हा आला. हजारो लोकांचे मूत्र तिथून गटारीत जाते. शेजारीच सिद्धार्थ उद्यान आहे. त्या उद्यानाला जर मूत्रखत–ज्याला हीराखत असे संबोधले जाते. दिले तर उद्यानातील वृक्षांचा झपाट्याने विकास होईल.

औरंगाबादच्या संबधित मंडळींना मी तसे पत्र पाठवले. त्याचे सौजन्यपूर्ण उत्तर अद्याप आलेले नाही.

वर्ध्याच्या ग्रामोपयोगी विज्ञान केंद्राच्या मंडळींशी मी या प्रश्नाबाबत चर्चा केली. शाळा, थिएटरे, एस्. टी. स्थानके या ठिकाणी हजारो गॅलन मूत्र रोज सहज जमा होते. त्याचा विनियोग करता आला पाहिजे.

मूत्रात ठराविक प्रमाणात पाणी मिसळून त्याचा खत म्हणून उपयोग करता येईल, असे त्या तज्ञाचे मत दिसले.

खतासाठी दाही दिशा फिरणाऱ्या देशात विज्ञान–तंत्रज्ञान आणि चोख व्यवस्थापन याची जोड झाली तर अशा वाया जाणाऱ्या किती तरी संपत्तीचा चांगला वापर करता येईल. सामाजिक वनीकरण व जळणाचा दुष्काळ असा उभय लाभकारी प्रकल्प यातून निर्माण होऊ शकेल.

आमच्या शाळा–कॉलेजात विज्ञान विभाग आहेत. तात्विक विज्ञानाच्या शिक्षणाबरोबर असे काही उपयोजित विज्ञानाचे प्रयोग,त्यांची का हाती घेऊ नयेत ?

निर्धूम चुलीचा प्रचार आता चालला आहे. मगनवाडीच्या ग्रामोद्योग केंद्राने महात्मा गांधींच्या सूचनेवरून त्याबाबत तीन तपांपूर्वीच मूलभूत संशोधन व प्रयोग केले होते.

दरिद्री असूनही उधळे, असे आपले वर्णन करणे चांगले आहे काय ?

ज्या ज्या शाळा सामाजिक वनीकरण, सोलर कुकर गॅस प्लँट, मलमूत्राचा योग्य विनियोग करतील त्यांना शासनाने विशेष अनुदान का देऊ नये !

राजगुरुनगरच्या बस स्थानकाला जोडून गॅस प्लँट बसवण्याची ज्या कोणाला कल्पना सुचली व ज्याने ती अमलात आणली, त्याच्या शताश तळमळ जर सेवकात असती तर असा नामुष्कीचा प्रसंग ओढवला नसता.

राजगुरुनगरच्या गॅस प्लँट बाबतची निरीक्षणे व टिपणे प्रसिद्ध झाली तर योजनेची व्यवहार्यता समजेल.

कुणी कोडे माझे उकलील का ? □

# तरुणपण म्हणजे काय ?

संवेदनशीलता, धडाडी, नवा विश्वास, नवी क्षितिजं हुडकून सर करण्याची उमेद, बेहिशेबीपणानं मांडलेला कर्तृत्वाचा जुगार .... हे आणि असं बरंच काही.

पण सहजपणे सापडतं का कधी असं रसरशीत तरुणपण, जे लहान–मोठ्या सगळ्यांना सहज आपल्याबरोबर ओढून नेईल. . . .

असं उत्फुल्ल तारुण्य कधी कधी तुमच्या आमच्यामधेच लपून बसलेलं असतं. निसर्ग कोशासारखं अवघड काम आपल्यातलीच काही विशी-पंचविशीतली तरुण मुलं हातात घेतात. त्यांना वेडं करणारा पशू-पक्षी-किटक-मानवांचा निसर्ग त्यांना अभ्यासातून पुढे ठेवायचा असतो आणि तो सुद्धा ' मराठी ' भाषेत. आणि ते सुद्धा नेहमीच्या मराठी प्रकाशनासारखं नाही.

उत्तम कागद, उत्तम छपाई, उत्तम लिखाण आणि शेकड्यांनी रंगीत छायाचित्र. . . . छे ! छे ! मूर्खपणाचा कळसच. ठरलेल्या वेळी, ठरलेल्या पद्धतीनं निसर्ग कोषाचा पहिला खंड प्रसिद्ध होतो तो भल्याभल्यांना चपराक देत आणि मराठी प्रकाशनव्याव्यवसायाचं साचेबंद रूप झुगारून देत. . . .

हे कसं शक्य झालं ?

विवेक म्हणतो . . . .

## तरुणपणामुळं

या रसरशीत तारुण्याचा अविष्कार माणूस तरुण-तरुणी विशेषांकात. निसर्गकोषाच्या निर्मितीतील प्रमुख–विवेक परांजपे याच्या मुलाखतीवर आधारित विशेष लेख.

**–मेधा राजहंस**

**याशिवाय**

विशेषांकाचं आणखी एक आकर्षण–एका वेगळ्या व्यावसायिक संस्कृतीची ओळख करून देणारी राजेंद्र बर्वे यांची नवी कादंबरी

**शार्पएज**

खास तरुणांचे विषयही या अंकात आहेतच. लहान वयात मोठ्या पदावर चढणाऱ्या कर्तबगार तरुण-तरुणींविषयी

**—गिरीश प्रभुणे**

तरुण मुलामुलींना आकर्षित करणाऱ्या एका नव्या क्षेत्राविषयी

**—ललिता बर्वे**

स्वतंत्र जाहिरातकंपनी चालवणाऱ्या एका तरुण व्यावसायिकाची मुलाखत

**—शुभदा रानडे**

ट्रेकिंगचे संवेदनशील मनानं टिपलेले हळुवार आणि थरारक क्षण—

**—अस्मिता दीक्षित, अभय कुलकर्णी**

आजच्या तरुणपणाचा पोत उलगडून दाखवणारं एका तरुणानंच केलेलं मुक्त चिंतन

**—विनय हर्डीकर**

' जनरेशन गॅप ' की ' जनरेशन टक्कर ' असा प्रश्न विचारणारा पिढ्यांमधील तणावाबद्दलचा खुसखुशीत विनोदी लेख

**—मंगला गोडबोले**

' पंचविसाव्या वर्षापेक्षा आज पन्नाशीतच मी जास्त तरुण आहे ' असं सांगणारा, तरुणपण म्हणजे काय याचा विचार करायला लावणारा, एका संपादकाने लिहिलेला विशेष लेख.

**—विद्या बाळ**

आणि

खास तरुणांचं भावविश्व साकार करणारी कथा

**—विनया खडपेकर**

**कविता—**

नारायण कुलकर्णी—कवठेकर, रवींद्र लाखे, राजन कल्याणकर, भारती बिर्जे, हेमंत जोगळेकर

**व्यंगचित्रं—विजय पराडकर**

**पंचविसाव्या वर्षातली रसरशीत तारुण्याचा आविष्कार घडविणारी प्रसन्न भेट—**

## तरुण—तरुणी विशेषांक : जुलै महिन्यात प्रसिद्ध होणार

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28


# राजहंसची दोन नवीन प्रकाशने

मराठी माणसाला "नाटक" हा आणखी एक अवयव विधात्याने बहाल केला आहे. असे अनेक कलावंत आहेत की आपली वहिवाटीची वाट सोडून नाटकाच्या बिकट वाटेकडे वळले आहेत. म्हणूनच आपली मराठी रंगभूमी एक वेगळाच घाट घेऊन मानाने मिरवीत आहे. रंगभूमीच्या या हृद्य आठवणी अगत्याने सांगण्याचा हेतु इतकाच की, आजच्या पिढीला आपल्या पूर्वसुरींची ओळख व्हावी, आठवण रहावी नि त्यांच्याबद्दल सदैव कृतज्ञता वाटावी.

साप्ताहिक माणूस मधील
गाजलेल्या लेखमालेचा संग्रह

## नाट्यपंढरी

**गो. रा. जोशी**

**किंमत वीस रुपये**

श्री. कुलकर्णी यांनी या पुस्तकात ऊर्जेच्या प्रश्नासंबंधी माहिती, आपल्या देशाच्या संदर्भात दिली आहे आणि तिच्या वापरासंबंधी सर्वांची जबाबदारी काय आहे याविषयी चांगले विचार मांडले आहेत. निरंतर मिळणाऱ्या ऊर्जेच्या उपयोगासाठी माणसाचे काय प्रयत्न चालू आहेत आणि भावी काळात त्यांची दिशा काय राहील याचेही चांगले दर्शन मिळते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही सर्व शास्त्रीय माहिती व आकडेवारी, किचकट न करता, सुलभ भाषेत सांगितली आहे. विद्यार्थ्यांना आणि सर्वसामान्य वाचकांना, ऊर्जेची आजची समस्या, त्याची कारणे आणि त्यावरील उपाय याविषयी सोपी परंतु मूलभूत माहिती या पुस्तकाद्वारे होईल, असे वाटते.

**वि. ग. भिडे**
कुलगुरु
पुणे विद्यापीठ

## ऊर्जा प्रश्न
### आशा उद्याच्या

**प्रि. खं. कुलकर्णी**

**किंमत पंचवीस रुपये**

## राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०
फोन : ४४३४५९

C/o श्री. वा. र. गोडे ४१, भवानी शंकर रोड, चितळे पथ कॉर्नर
जोशी वाडी, दादर (प.) मुंबई ४०० ०२८ फोन : ४२२५४५५